# गोविंदराव वारजूकर महाविद्यालय, नागभीड

## राज्यशास्त्र विभाग

# राजकीय सिद्धांत

B.A. भाग 2 (सेम.iii)

**प्रा.मंगेश टी.देवढगले**


# राजकीय सिद्धांताचे स्वरूप व महत्व:-

## राजकीय सिद्धांताचा अर्थ :-

- राजकीय सिद्धांत या संकल्पनेचा अर्थ समजून घेण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे सिद्धांत व राजकीय या संकल्पनांचा प्रथम अर्थ समजणे होय. इंग्रजी भाषेतील 'थिआ' शब्दासाठी मराठीत 'सिद्धांत' ही संज्ञा वापरली जाते. ग्रीक भाषेतील 'थिआ' या शब्दापासून 'थेअरी' हा शब्द तयार झाला आहे. त्याचा अर्थ चष्मा असा होतो. म्हणून 'थेअरी' म्हणजे वस्तुस्थितीकडे पाहण्याचा विशिष्ट असा चष्मा किंवा दृष्टिकोन होय.
  - सिद्धांताची निर्मिती ही एक बौद्धिक प्रक्रिया आहे. त्या प्रक्रियेत पद्धतशीर प्रश्न विचारून त्यांची उत्तरे शोधणे याचा समावेश होतो. म्हणजेच पद्धतशीरपणे ज्ञान प्राप्त करणे म्हणजे सिद्धांत होय. दुसऱ्या शब्दात कार्यकारणभावाचे स्पष्टीकरण म्हणजे सिद्धांत होय. परिणाम आणि त्याचे कारण या दोघांतील संबंध स्पष्ट करण्याचे कार्य सिद्धांत द्वारे होत असते. उदा. झाडावरचे फळ जमिनीवर पडणे हा परिणाम आहे तर त्याचे कारण गुरुत्वाकर्षण शक्ती आहे. यावरून न्युटनचा गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत तयार झाला आहे. परिणाम व कारण यांच्या संबंधातून सिद्धांत कसे तयार होतात हे पुढील तक्त्यातील नैसर्गिक शास्त्र (विज्ञान) व राज्यशास्त्र यांच्या उदाहरणावरून लक्षात येईल.



This Photo by Unknown Author is licensed under CC BY




This Photo by Unknown Author is licensed under CC BY-SA-NC

| क्र. | परिणाम | कारण | सिद्धांत |
| --- | --- | --- | --- |
| १ | झाडावरील फळ जमिनीवर पडणे. | पृथ्वीमधील गुरुत्वाकर्षण शक्ती. | न्युटनचा गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत |
| २ | काठोकाठ भरलेल्या पेल्यात दगड टाकल्यास पेल्यातील पाणी बाहेर पडते. | प्रत्येक वस्तू, पदार्थ जागा व्यापते. | आर्किमिडीज चा आकारमानाचा सिद्धांत |
| ३ | जुलमी व अन्याय राजवट | सत्तेचे केंद्रीकरण. | मॉन्टेस्क्यूचा सत्ता विभाजनाचा सिद्धांत |
| ४ | मनमानी, अन्यायी राज्यकारभार. | बुद्धिमान व्यक्तीकडे राज्यकारभार नसणे. | प्लेटोचा तत्त्वज्ञ शासकाचा सिद्धांत |
| ५ | निसर्गावस्थेतील 'बडी तो कानपीडी' अवस्था | सार्वभौम सत्तेचा अभाव. | हॉब्जचा सामाजिक करार सिद्धांत. |

वरील विवेचनावरून ‘सिद्धांत’ या संकल्पनेचा अर्थ समजून घेतल्यानंतर 'राजकीय' या संकल्पनेचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. राज्य आणि शासन संस्थेचा राज्यकारभार यांची निगडित असणाऱ्या सर्व बाबींना ‘राजकीय’ असे म्हणतात.

दोन्ही सज्ञांच्या अर्थावरून असे म्हणता येईल की, **राजकीय बाबींचे पद्धतशीरपणे ज्ञान प्राप्त करणे म्हणजे राजकीय सिद्धांत होय.**किंवा **राजकीय बाबींच्या कार्यकारणभावाचे स्पष्टीकरण म्हणजे राजकीय सिद्धांत होय.**

## व्याख्या:-

बऱ्याच विचारवंतांनी राजकीय सिद्धांताच्या व्याख्या मांडल्या आहेत त्यापैकी काही महत्त्वाच्या पुढील प्रमाणे,

१)अँड्र हॅकर, “राजकीय सिद्धांत म्हणजे माणसाने आपल्या समूह जीवनाचे व संघटनेचे प्रश्न जाणीवपूर्वक समजून घेण्याचा व सोडवण्याचा केलेला प्रयत्न होय. याचाच अर्थ असा की, राजकीय प्रश्नांचा शिस्तबद्ध शोध म्हणजे राजकीय सिद्धांत होय.

२)सेबाइन, “राजकीय समस्यांचा जाणीवपूर्वक आणि शिस्तबद्ध शोध म्हणजे राजकीय सिद्धांत होय.

3) दांते जर्मिनो,"माणसाच्या सामाजिक अस्तित्वासाठी आवश्यक आणि उपयुक्त अशा व्यवस्थेसंबंधीच्या तत्त्वांचा चिकित्सक अभ्यास म्हणजे राजकीय सिद्धांत होय.

४) कुकर, “जनतेच्या इच्छा व मते विचारात घेऊन शासन संस्थांचा पद्धतशीर अभ्यास जेथे केला जातो, त्यास राजकीय सिद्धांत असे म्हणतात.

५) पोलॉक, “राजकारणासंबंधीचे शास्त्र म्हणजे राजकीय सिद्धांत होय.”

वरील व्याख्यावरून राज्यशास्त्रीय अभ्यास विषयाबाबत पद्धतशीर व शिस्तबद्ध असे ज्ञान देणाऱ्या सामान्य नियमांना ‘राजकीय सिद्धांत’ असे म्हणतात.

# राजकीय सिद्धांताचे स्वरूप :-

इसवी सन पूर्व चौथ्या शतकापासून म्हणजेच राज्यशास्त्राच्या उदय काळापासून राज्यशास्त्रात सिद्धांत निर्मितीची प्रक्रिया सुरू आहे. या सुमारे 2500 वर्षाच्या कालखंडात असंख्य सिद्धांताची निर्मिती झाली आहे. या सर्व राजकीय सिद्धांताचे स्वरूप एकसारखे नाही तर ते संकलन पद्धती, मांडणी, दृष्टिकोन संशोधन पद्धती व तंत्रे आदी सर्वांमध्ये आधुनिक काळात बरेच बदल झाले आहेत. म्हणून राजकीय सिद्धांताचे स्वरूप योग्य प्रकारे समजून घेण्यासाठी त्यांचे विभागणी दोन भागांमध्ये केली जाते.

१) पारंपरिक किंवा आदर्शवादी राजकीय सिद्धांत
२) आधुनिक किंवा अनुभववादी राजकीय सिद्धांत

या दोन्ही प्रकाराचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

# राजकीय सिद्धांताचे स्वरूप

## पारंपारिक/आदर्शवादी

१)आदर्शावर भर

२)मुल्याधिस्टीतता

३)राजकीय स्वरूप

४)औपचारिक अध्ययन

५) सर्वसमावेशक स्वरूप

६) तत्वज्ञानात्मक स्वरूप

७) नैतिक स्वरूप

## आधुनिक/अनुभववादी

१)अनुभवज्यन्य संशोधन व अभ्यासाव

२) मूल्यनिरपेक्ष विश्लेषणावर भर

३) आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनाचा अवलंब

४) औपचारिक सह अनौपचारिक पद्धतीच्या अध्ययनावर भर

५) सुसंबंद्ध, निश्चित, स्पष्ट व काटेकोर स्वरूप


राजकीय सिद्धांताची व्याप्ती
अनुभवनिस्ठ संशोधनाचा अभ्यास
अभिजात राजकीय साहित्याचा अभ्यास
राजकीय व्यवस्थांचे अध्ययन
राजकीय विचारप्रणालीचा अभ्यास

# राजकीय सिद्धांताची वैशिष्ट्ये

- **पारंपारिक** राजकीय सिद्धांत व आधुनिक राजकीय सिद्धांत
- राजकीय आणि आंतरविद्याशाखीय स्वरूप
- मुल्यसापेक्ष आणि मुल्यनिरपेक्ष
- औपचारिक व अनोपचारिक अध्ययनावर भर
- सर्वसमावेशक स्वरूप आणि विशिष्ट व विशेषित स्वरूप
- नैतिक स्वरूप आणि वास्तववादी स्वरूप
- तत्वज्ञानात्मक स्वरूप आणि अनुभववादी स्वरूप

## राजकीय सिद्धांताचा ऱ्हास यासंबंधीचा वाद :-

राजकीय वर्तन आणि राजकीय प्रक्रिया हेच आता राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे विषय आहेत, आदर्शवादी राजकीय सिद्धांत हा पूर्वीसारखा राज्यशास्त्राचा अभ्यास विषय राहिला नाही, असे अमेरिकेत 1925 पर्यंत वाटायला लागले आणि राजकीय सिद्धांताचा ऱ्हास होत आहे का ? असा प्रश्न निर्माण झाला राज्यशास्त्राचा अभ्यास विषय, अभ्यास विषयक दृष्टिकोन आणि अभ्यासाची भूमिका या तीनही बाबतीत होत असलेल्या महत्त्वपूर्ण बदलाचे वारे वाहू लागले होते.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काही घडामोडींमुळे या वाऱ्यांना अधिक चालना मिळाली. त्यामुळेच राजकीय सिद्धांताच्या उपयुक्तते संबंधी वाद निर्माण झाला. दुसऱ्या महायुद्धाची समाप्ती हा उदारमतवादी लोकशाहीचा विजय आणि फॅसिस्ट शक्तींचा पराभव आहे. पाश्चिमात्य जगात लोकशाही पद्धतीने आर्थिक सुबत्ता आणि प्रगती घडवून आणली आहे. त्यामुळे आता शासनाचा उत्तम प्रकार कोणता ?, शासकीय संस्थांचे आदर्श स्वरूप कसे असावे?, व्यक्ती व शासन यांच्यात कसे संबंध असावेत?, असे सर्व प्रश्न अप्रस्तुत ठरले आहेत. त्यामुळे या प्रश्नांच्या भोवती उभे राहिलेले सर्व पारंपरिक आणि आदर्शवादी राजकीय सिद्धांत आधुनिक काळात गैरलागू झाले आहेत. अशा प्रकारच्या विचारांनी महायुद्धाच्या समाप्तीनंतरच्या काळात अमेरिकेतील राज्यशास्त्राचे अनेक अभ्यासक भारावलेले होते.

राजकीय जीवनात काय असावे?, आदर्श कोणते?, यापेक्षा काय आहे? याचा शोध घेण्याचे कार्य राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी केले पाहिजे, असे अमेरिकेतील राज्यशास्त्राच्या अभ्यासकांचे मत बनले. थोडक्यात दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतरच्या काळात अमेरिकेत वर्तनवादी अध्ययनाला विशेष महत्त्व आले होते. कारण वर्तनवादाचा पुरस्कार करणाऱ्या किंवा वर्तनवादी अध्ययनाचा आग्रह धरणाऱ्या अभ्यासकांना पारंपारिक राज्यशास्त्राच्या अपुरेपणाची जाणीव निर्माण झाली होती. पारंपारिक राज्यशास्त्रातील संकल्पनांचे आणि आदर्शवादी सिद्धांताचे नव्याने परीक्षण करण्याची गरज आहे, असे त्यांचे मत होते. इसवी सन 1950 च्या काळात अमेरिकेतील अनेक अभ्यासकांनी पारंपारिक राज्यशास्त्र व आदर्शवादी राजकीय सिद्धांत यांच्या विरोधात भूमिका घेतली होती. उदा. डेव्हिड ईस्टन आणि अल्फ्रेड कॉबन म्हणाले, "राजकीय सिद्धांताचा झपाट्याने ऱ्हास होत आहे," तर रॉबर्ट डहाल आणि पीटर लॅस्लेट यांनी अशी घोषणा केली की, "राजकीय सिद्धांत मृत्यू पावला आहे." याशिवाय दांते जर्मिनो, लिपसेट यासारख्या लेखकांनीही वर उल्लेखित विधानाला दुजोरा दिला.

# राजकीय सिद्धांताच्या ऱ्हासाची कारणे :-



# खरोखर राजकीय सिद्धांताचा ऱ्हास झाला आहे का ?

या प्रश्नाचे उत्तर **'नाही'** असेच द्यावे लागेल कारण अमेरिकेतील राज्यशास्त्राचे सर्व अभ्यासक राजकीय सिद्धांताचा ऱ्हास झाला, या विचाराचे समर्थक नव्हते. राजकीय सिद्धांताचे अस्तित्व कधीच संपुष्टात येणार नाही, असे मायकल ऑकशॉट,लिओ स्ट्राऊस, बर्लिन आधी विचारवंतांचे प्रतिपादन आहे, राजकीय सिद्धांताचा अंत झाला आहे अशी धारणा केवळ वर्तनवादाच्या कट्टर समर्थकांची होती. डेव्हिड ईस्टन देखील प्रारंभीची दोन दशके वर्तनवादाचे कट्टर समर्थक होते. पुढे खुद्द डेव्हिड ईस्टननेच वर्तनवादाच्या मर्यादा स्पष्ट केल्या. सिद्धांताच्या मांडणीला महत्त्व दिले पाहिजे, असा उत्तरवर्तनवादी दृष्टिकोन त्याने 1969 मध्ये मांडला. म्हणजे दोन दशकानंतर राजकीय सिद्धांताच्या उपयुक्ततेसंबंधी डेव्हिड ईस्टनचे विचार बदलले.

सिद्धांत मांडणीबाबत ईस्टनच्या विचारांचे अनुकरण करून ब्लाइंडेलने सिद्धांत आणि राजकीय विश्लेषण यांचा समन्वय साधण्याची गरज प्रतिपादित केली. 1970 नंतरच्या काळात आधुनिक राज्यशास्त्राच्या कट्टर समर्थकांनीही नवनवे राजकीय सिद्धांत मांडले आहेत. राजकारणाचे अध्ययन करण्याच्या स्वरूपात राजकीय सिद्धांताचे पुनरागमन झाले आहे असेही म्हणता येईल.

थोडक्यात राजकीय सिद्धांताचा अंत होऊ शकत नाही. कारण जोपर्यंत समाजामध्ये हितसंबंधाचा संघर्ष आहे, तोपर्यंत राजकारणाचे अस्तित्व राहणारच. त्यामुळे जोपर्यंत राजकारण आहे तोपर्यंत कोणत्या ना कोणत्या रूपात सिद्धांत हे अस्तित्वात राहतील असे म्हणता येते. म्हणून राजकीय सिद्धांताचा ऱ्हास झाला नाही, त्याची निर्मिती काही काळ थांबली होती, असे स्पष्ट होते.

# राजकीय सिद्धांताचे महत्व

मानवी ज्ञानामध्ये वृद्धी

तात्कालिक समस्या व प्रश्नांचे आकलन

राजकीय समस्यांच्या निराकरणासंबंधी उपाय

समस्यांच्या निराकरणासाठीच्या उपाययोजनेचे परिणाम

संशोधन कार्यात मार्गदर्शक

## राजकीय सिद्धांत विषयीचे दृष्टिकोन:-

'अध्ययन पद्धती', 'अध्ययनाचे दृष्टिकोन' व 'सिद्धांत' या तीनही सज्ञा वेगवेगळ्या अर्थ असणाऱ्या आहेत. बरेचदा यांना एकच समजण्याची चूक केली जाते. 'सिद्धांत' या संज्ञेचा अर्थ आपण यापूर्वी समजून घेतला आहे. राजकीय घटनांचा अभ्यास करीत असताना अभ्यासक वा संशोधक ज्या पद्धतीचा, प्रक्रियांचा किंवा रितींचा वापर करतो, त्याला 'अध्ययन पद्धती' असे म्हणतात. म्हणजेच विषयाचा ज्ञान संपादन करण्याचा मार्ग म्हणजे अध्ययन पद्धती होय. दुसऱ्या शब्दात अध्ययन विषयाची माहिती कशी मिळवावी? व कशी वापरावी?, याबाबतचे रीत म्हणजे अध्ययन पद्धती होय. तात्विक पद्धती, ऐतिहासिक पद्धती, तुलनात्मक पद्धती, प्रायोगिक पद्धती ही सर्व अध्ययन पद्धतीची नावे आहे.

## दृष्टिकोन म्हणजे काय?

कोणताही संशोधक किंवा अध्ययन कर्ता सर्वात प्रथम अध्ययनसाठीचा विषय निश्चित करत असतो. म्हणजे कशाचा अभ्यास करायचा हे प्रथम निश्चित करतो. मग त्याने निवडलेल्या विषयाच्या स्वरूपावरून दृष्टिकोन निश्चित होत असतो. कारण दृष्टिकोन म्हणजे अध्ययनासाठी निवडलेल्या विषयाकडे पाहण्याची अभ्यासाची पद्धती होय. दुसऱ्या शब्दात अभ्यासाचा हेतू म्हणजे दृष्टीकोन होय. अध्ययन विषयासंबंधी माहिती गोळा करण्यासंबंधीच्या निकषांना दृष्टिकोन असे म्हणतात. उदा. 'ग्रामीण व शहरी भागातील महिलांचा राजकीय सहभाग', हा विषय असल्यास अध्ययन पद्धती तुलनात्मक वापरावी लागेल. कारण ग्रामीण व शहरी भागाची तुलना करून अभ्यास करावयाचा आहे, तर महिलांचा राजकीय सहभाग आहे किंवा नाही? किती आहे?, याचा अभ्यास म्हणजे महिलांच्या वर्तनाचा अभ्यास करावयाचा आहे. म्हणून  दृष्टिकोन वर्तनलक्षी घ्यावा लागेल, राज्यशास्त्रात दृष्टिकोनांची संख्या बरीच मोठी आहे. यापैकी कोणता दृष्टिकोन कुठे वापरावा, हे त्या विषयाच्या स्वरूपावरून ठरते. हीच बाब पुढील तक्त्यावरून अधिक स्पष्ट करता येईल.

| क्र, | विषय | स्वरूप | दृष्टिकोन |
|---|---|---|---|
| १ | नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय | नागरिकांच्या मूलभूत अधिकाराविषयी सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्णयांचा अभ्यास. | विधीनिष्ठ-संस्थात्मक दृष्टिकोन |
| २ | राज्यपालाचे स्वविवेकाधीन अधिकार. | स्वविवेकानुसार राज्यपाल जे निर्णय घेऊ शकतो, त्यांचा अभ्यास. | विधीनिष्ठ-संस्थात्मक दृष्टिकोन |
| 3 | राज्यसभेतील नियुक्त सदस्यांचे सभागृहातील वर्तन. | राष्ट्रपती द्वारा राज्यसभेतील नियुक्त सदस्य कसे वर्तन करतात याचा अभ्यास. | वर्तनलक्षी दृष्टिकोन |
| ४ | विधानसभेतील महिला सदस्यांचा सहभाग. | विधानसभेत महिला सदस्यांचा सहभाग कसा असतो याचा अभ्यास. | वर्तनलक्षी दृष्टिकोन |
| ५ | स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दशकातील सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय | भारत स्वतंत्र झाल्यानंतर पहिल्या दशकात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयांचा अभ्यास. | ऐतिहासिक दृष्टिकोन |
| ६ | एसटी कर्मचाऱ्यांचा संप. | एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्या आंदोलन करण्याची पद्धती व साधने व आंदोलनाचा परिणाम यांचा अभ्यास | समूहात्मक दृष्टिकोन |

वरील तक्त्यावरून लक्षात येते की, पहिल्या दोन उदाहरणात विषय कायदेशीर व राजकीय संस्थांशी संबंधित असल्यामुळे अध्ययनासाठी विधीनिष्ठ-संस्थात्मक दृष्टिकोनाचा उपयोग करण्यात आला, तर तिसऱ्या व चौथ्या उदाहरणात विषय मानवी वर्तनाशी संबंधित असल्यामुळे वर्तनलक्षी दृष्टिकोनाचा उपयोग करण्यात आला. तसेच पाचव्या उदाहरणात विषय भूतकाळातील घटनांचा अभ्यास करावयाचा असल्यामुळे ऐतिहासिक दृष्टिकोनाचा व सहाव्या उदाहरणात एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाचा म्हणजे त्यांच्या समूहाचा व समूहाकडून घडलेल्या कृतीचा अभ्यास करावयाचा असल्यामुळे समूहात्मक दृष्टिकोन अध्ययनासाठी उपयोगात आणला गेला. यावरून असे म्हणता येईल की, विषयावरून दृष्टिकोनाची निवड होत असते.

# दृष्टिकोनाचे प्रकार:-

राज्यशास्त्रात बरेच दृष्टिकोनाचे विकसित झाले आहेत.अभ्यासाच्या दृष्टीने त्याचे दोन प्रमुख प्रकार पाडले जातात.

## दृष्टिकोनाचे प्रकार

### पारंपारिक

१)तात्विक/तत्वज्ञानात्मक दृष्टिकोन

२)विधीनिस्ट/संस्थात्मक दृष्टिकोन

3)ऐतिहासिक दृष्टिकोन

### आधुनिक

१)वर्तनलक्षी दृष्टिकोन

२) व्यवस्थात्मक दृष्टिकोन

3)गटवादी/समूहात्मक दृष्टिकोन

४)सत्तालक्षी दृष्टिकोन

५)मार्क्सवादी दृष्टिकोन

काही प्रमुख दृष्टिकोनाची ओळख पुढीलप्रमाणे करून घेता येईल.

## १)तत्त्वज्ञानात्मक / तात्विक दृष्टिकोन:-

पारंपारिक दृष्टिकोनात तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोन प्रमुख आहे. राज्यशास्त्राच्या उदय काळापासून सोळाव्या शतकापर्यंत या दृष्टीकोनाचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात आला. यात प्लेटो, हाब्ज,रुसो,कांट,हेगेल,ग्रीन,मिल आधी विचारवंत प्रमुख आहेत. **विषयाची मांडणी निगमन पद्धतीने करणे** हे या दृष्टिकोनाचे प्रमुख सूत्र आहे.या पद्धतीत अभ्यासक काही तत्वे प्रथम गृहीत धरतो.त्या गृहीतांना केंद्र मानून निष्कर्ष काढले जातात.उदा.हेगेल 'राज्य सर्वश्रेष्ट आहे'. हे प्रथम गृहीत धरतो.नंतर या विचाराचे समर्थन करण्यासाठी तर्क/निष्कर्ष निर्माण करतो. या दृष्टिकोनात अनुभवनिष्ठ विश्लेषणापेक्षा तत्वनिष्ठ मूल्यमापनावर अधिक भर दिला जातो. म्हणूनच हा मूल्यधिष्टीत दृष्टिकोन आहे असे म्हटले जाते. या दृष्टिकोनात तात्विक विवेचनावर भर असल्यामुळे या दृष्टिकोनाचा अवलंब करून आपले विचार मांडणाऱ्या अभ्यासकांना **'राजकीय तत्वज्ञ'** असे म्हणतात.

या दृष्टिकोनात निगमन पद्धती फार महत्वपूर्ण आहे. निगमन पद्धतीत तथ्याकडून सिद्धांताकडे जाण्याऐवजी **तात्विक आधारावर किंवा प्रत्यक्ष अनुभवावर स्वीकारलेल्या गृहीतांपासून सुरुवात केली जाते.** या दृष्टीकोनाचा वापर करून विचारवंतांनी सिद्धांत कसे मांडले हे पुढील तक्त्यावरून अधिक स्पष्ट करता येईल.

| क्र. | गृहीत | तर्क/निष्कर्ष | सिद्धांत |
|---|---|---|---|
| १ | प्लेटो- तत्त्वज्ञ शासक हा सर्वोत्कृष्ट शासक असतो. | शासक जर बुद्धिमान नसेल तर तो योग्य निर्णय घेऊन न्यायपूर्ण शासन चालवू शकत नाही. | प्लेटोसा आदर्श राज्याचा सिद्धांत. |
| २ | मार्क्स- सर्व प्रकारच्या बदलांना आर्थिक करण्यात जबाबदार असतात | समाजात नेहमी दोन वर्ग असतात यातील एक वर्ग संख्येने कमी असलेला पण उत्पादन साधनावर सम मालकी असलेला तर दुसऱ्या संख्येने जास्त पण त्याच्याजवळ श्रमाशिवाय दुसरे काहीही नसते या दोन वर्गात सतत संघर्ष होत असतो | मार्क्सचा वर्ग संघर्षाच्या सिद्धांत |
| 3 | हाब्ज- मनुष्य हा स्वार्थी आहे. | निसर्गवस्थेतील मनुष्य स्वार्थी व दृष्ट होता बळी दुकान पिढी ही अवस्था असल्यामुळे मनुष्याला एकमेकांचे बळी वाटत होते त्यामुळे व्यक्ती कराराकडे वळला करार करून राज्यसंस्था निर्माण झाली. | हॉब्जचा राज्याच्या उत्पत्तीचा सामाजिक करार सिद्धांत. |

वरील तक्त्यात तीन उदाहरणे दिली आहेत. त्यात तीनही विचारवंतांनी प्रथम काही तत्व गृहीत धरून त्यानंतर त्याच्या समर्थनार्थ काही तर्क,निष्कर्ष मांडले आहेत. व त्यानुसार सिद्धांत मांडले आहेत.

**टीका/ मर्यादा:-**

**१)या दृष्टिकोनात वस्तुनिष्ठता, अनुभवनिष्ठता याला स्थान नाही.**

**२) हा दृष्टिकोन काल्पनिक वर्णनात्मक आहे.**

**3) हा दृष्टिकोन व्यक्तीनिष्ठ आहे.**

## २) ऐतिहासिक दृष्टिकोन:-

इसवी सन पूर्व काळापासून राजकीय संस्था व राजकीय घटना यांचे अध्ययन करण्यासाठी हा दृष्टिकोन वापरला जातो. त्यामुळे हा देखील प्राचीनतम दृष्टीकोन आहे. ॲरिस्टॉटल, हेन्री मेन, फ्रीमन,लास्की, मॉंटेस्क्यू, कार्ल मार्क्स आदि विचारवंतांनी या दृष्टिकोनाचा उपयोग केला आहे.

## अर्थ:-

राजकीय संस्था आणि राजकीय घटना त्यांचे संबंधित **ऐतिहासिक माहिती एकत्रित करून** त्या आधारे राजकीय बाबींचे विवेचन व विश्लेषण केले जाते. दुसऱ्या शब्दात भूतकाळात घडलेल्या घटना यांची माहिती ऐतिहासिक दस्तऐवज म्हणजे **पत्र, लेख, ग्रंथ, वास्तू** इत्यादी द्वारे घेऊन त्यांचे विश्लेषण करून सिद्धांत मांडले जातात. भूतकाळातून वर्तमान काळ निर्माण होतो व वर्तमान काळ भविष्यकाळ घडवतो म्हणून वर्तमानकालीन राजकीय संस्था आणि घटना यांचे अर्थपूर्ण आकलन करून घेण्यासाठी त्यांचा इतिहास लक्षात घ्यावा लागतो. उदा. अमेरिकेच्या अध्यक्षाचे अधिकार व घटनात्मक स्थान लक्षात घेण्यासाठी तेथील सुप्रीम कोर्टाने यासंबंधी दिलेल्या ऐतिहासिक न्यायालयीन निर्णयाचा आधार घ्यावा लागतो.

पुढील तक्त्यातील उदाहरणावरून ही बाब अधिक स्पष्ट करता येईल.

| क्र. | विचारवंत | ऐतिहासिक दस्तऐवज / माहिती | सिद्धांत |
|---|---|---|---|
| १ | अरिस्टॉटल | 158 नगर राज्यांच्या संविधानाचा अभ्यास. | आदर्श राज्याचा सिद्धांत |
| २ | काल मार्क्स | भांडवलशाहीने केलेले समाजाचे शोषण भांडवलदार व मजूर वर्गातील संघर्ष यांचा अभ्यास. | साम्यवादी सिद्धांत |
| ३ | मॉन्टीस्क्यू | सत्ता केंद्रीकरणामुळे निर्माण फ्रान्समधील अन्याय राजवटीचा अभ्यास. | सत्ता विभाजनाचा सिद्धांत |

वरील तक्त्यातील तीनही उदाहरणात विचारवंतांनी ऐतिहासिक दस्तऐवज, माहितीचा अभ्यास करून आपापले सिद्धांत मांडल्याचे दिसून येते.

**टीका / मर्यादा :-**

१) उपलब्ध इतिहास पूर्ण विश्वसनीय (सत्य) असेलच असे नाही.
२) इतिहास लेखनात व्यक्तिनिष्ठता असण्याची शक्यता.
३) भूतकाळातील बाबी वर्तमान काळात तंतोतंत लागू पडतीलच असे नाही.

## विधीनिष्ठ संस्थात्मक दृष्टिकोन :-

या दृष्टिकोनाची वैचारिक परंपरा प्लेटो- ॲरिस्टॉटलच्या काळातच निर्माण झाली. त्यामुळे हा दृष्टिकोन प्राचीन आहे. पण या दृष्टिकोनाची तर्कशुद्ध व व्यवस्थित मांडणी 19 व्या शतकापर्यंत झाली नव्हती. जॉन आस्टीनने 'कायदा व सार्वभौमत्व' विषयी तर्कशुद्ध विचार मांडले. त्यामुळे या दृष्टिकोनाला सुव्यवस्थेत स्वरूप प्राप्त झाले. तेव्हापासून ते 1950 पर्यंतच्या सर्व राज्यशास्त्रीय अध्ययन व ग्रंथलेखन हे प्रामुख्याने विधीनिष्ठ संस्थात्मक दृष्टिकोनातून झाले आहे.

**अर्थ:-** या दृष्टिकोनाला संस्थात्मक दृष्टिकोन आणि वैधानिक दृष्टिकोन अशा दोन वेगवेगळ्या नावांनीही संबोधले जाते. काही अभ्यासकांना वैधानिक आणि संस्थात्मक दृष्टिकोन दोन वेगवेगळे दृष्टिकोन आहेत असे वाटते, परंतु राजकीय संस्थांचे अध्ययन करताना त्यांच्या कार्याचा विचार वैधानिक दृष्टिकोनातूनच केला जातो, त्यामुळे या दोन्ही दृष्टिकोनात निकटचा संबंध आहे. यामुळे दोन्ही दृष्टिकोनाच्या एकत्रित अध्ययनावर विचारवंतांचा भर आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की, वैधानिक दृष्टिकोनातून अभ्यास केला तरी राजकीय संस्थांचा अभ्यास करावा लागतो व संस्थात्मक दृष्टिकोनातून अभ्यास केला तरी राजकीय संस्थांचे वैधानिक स्थान, रचना, कार्य आदींचा अभ्यास करावा लागतो. त्यामुळे दोन्ही दृष्टिकोन जवळपास एकच आहेत असे म्हणता येईल.

या दृष्टिकोनात राजकीय संस्थांचा अभ्यास वैधानिक दृष्टीने म्हणजे कायद्याच्या दृष्टीने केला जातो. हा दृष्टिकोन समजून घेण्यासाठी राजकीय संस्था म्हणजे काय हे समजून घेणे आवश्यक आहे. समाजात निश्चित अधिकार व सत्ता असणाऱ्या पदधारकांकडून विविध कार्य केले जातात, ती कार्य करण्याचे अधिकार त्या व्यक्तीला त्या **पदामुळे** प्राप्त होते. त्यामुळे व्यक्ती बदलले तरी पद कायम असते. ते पद म्हणजे एक प्रकारची **संस्था** असते. उदा. राष्ट्रपती. त्या पदावरील व्यक्ती आजारपण, मृत्यू, राजीनामा यासारख्या कारणांमुळे बदलली तरी ते पद कायम असते. या सिद्धांतात या पदाच्या (संस्थांच्या) अध्ययनावर लक्ष केंद्रित केले जाते. विधिमंडळ कार्यकारी मंडळ व न्याय मंडळ यासारख्या राजकीय संस्था सर्वत्र आहे.

## अध्ययनाचा मध्यबिंदू:-

या दृष्टिकोनात अध्ययनाचा मध्यबिंदू म्हणजे केंद्र **राज्यसंस्था** आहे. राज्य आणि राज्याच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या सर्व राजकीय संस्था मानवी जीवन नियंत्रित व प्रभावित करण्याचे कार्य करतात. **राज्याचा मानवी जीवनावर असणारा हा प्रभाव एकतर्फी असतो, दुतर्फी नसतो.** हा प्रभाव कृतीत आणण्याचा **कायदा** हा राज्याचा साधन (शस्त्र) आहे. उदा. अपत्य संख्या, विवाह वय, वारसाहक्क आदि कायदे करून राज्य कुटुंब संस्थेला नियंत्रित व प्रभावित करते. थोडक्यात राजकीय संस्थांनी मान्य केलेल्या चौकटीतच व्यक्तीला वर्तन करावे लागते. त्यामुळे राजकीय व्यवहार व संबंध कसे आहेत, हे राजकीय संस्था आणि वैधानिक व्यवस्था या दोघांच्या आकलनांमधून स्पष्ट होऊ शकते, असे हा दृष्टिकोन मानतो. दुसऱ्या शब्दात राज्यसंस्थेला केंद्र मानून या दृष्टिकोनात अध्ययन केले जाते.

## सर्वात महत्त्वाचा अभ्यासविषय:-

**'संविधान'** हा या दृष्टिकोनाचा सर्वात महत्त्वाचा अभ्यास विषय आहे. कारण राज्यसंस्था हा अभ्यासाचा केंद्रबिंदू असला, तरी **राज्यसंस्थेच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या प्रत्येक पदाचे, संस्थेचे अधिकार, कार्य,रचना कर्तव्य आदींची स्पष्ट आखणे संविधानात केली असते.** त्यामुळे संविधानाचा अभ्यास केल्याशिवाय राज्यसंस्थेचा अभ्यास पूर्ण होऊ शकत नाही म्हणून संविधान हा विधीनिष्ठ - संस्थात्मक दृष्टिकोनानुसार सर्वाधिक महत्त्वाचा विषय ठरतो.

## योगदान :-

राज्यशास्त्र अध्यानामध्ये विधीनिष्ठ संस्थात्मक दृष्टिकोनाचे योगदान मोठे आहे. ते पुढील मुद्द्यांच्या आधारे सांगता येईल.

१) विधीनिष्ठ-संस्थात्मक दृष्टिकोनात राजकीय संस्थांचे वैधानिक आधारे अध्ययन केले जाते. राजकीय संस्थांमध्ये असलेले किंवा कालानुरूप निर्माण झालेले दोष दूर करण्याचा प्रयत्न या दृष्टिकोनाच्या विचारवंतांनी केला आहे

२) प्रतिनिधिक लोकशाही, संघराज्य व्यवस्था, संविधानिक शासन आधी रुजवण्यामध्ये व त्यामध्ये कालानुरूप सुधारणा करण्यामध्ये या दृष्टिकोनाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

3) राजकीय संस्थांच्या औपचारिक अध्यनामुळे अध्ययनाला निश्चितता प्राप्त झाली.

४) प्रतिनिधी शासनामध्ये राजकीय पक्ष, हितसंबंधी गट, स्वतंत्र व निष्पक्ष प्रसार माध्यमे, नोकरशाही इत्यादींची आवश्यकता या दृष्टिकोनामुळे लोकांना पटली.

५) राजकीय संस्थांच्या तौलोनिक अभ्यासामुळे त्या संबंधित विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मदत झाली.

## मर्यादा:-

१) हा दृष्टिकोन राज्याचा मानवी जीवनावर एकतर्फी प्रभाव असतो, असे मानतो परंतु मानवाचा सुद्धा राज्याच्या (शासनाच्या) निर्णय धोरणावर परिणाम होत असतो. त्यामुळे हा प्रभाव एकतर्फी नसतो.

२) या दृष्टिकोनात राजकीय संस्थांच्या औपचारिक अध्ययनावर भर दिला जातो परंतु अनौपचारिक घटकही राज्यसंस्थेच्या कार्यावर प्रभाव पाडत असतात. त्यामुळे त्यांचाही अभ्यास आवश्यक असते पण या दृष्टिकोनात अनौपचारिक बाबींचे अध्ययन केले जात नाही.

३) हा दृष्टिकोन लोकप्रतिनिधी शासनाचे समर्थन करतो, पण या शासनातील दुर्बल, अल्पसंख्यांकाची गळचेपी, सामाजिक व आर्थिक विषमता इत्यादी प्रश्नांची उत्तरे हा दृष्टिकोन देत नाही.

अशा प्रकारे या दृष्टिकोनात काही दोष असले तरी हा दृष्टिकोन पूर्णतः टाकाऊ नाही. राजकीय संस्था, संविधान यांना निश्चित चौकट प्राप्त करून देण्याचे कार्य या दृष्टिकोनाने केले आहे.

## व्यवस्थावादी दृष्टिकोन:-

‘व्यवस्थावादी दृष्टिकोन’ हा एक आधुनिक दृष्टिकोन आहे. 1950 नंतरच्या काळात डेविड ईस्टन व गॅब्रियल आलमंड यांनी केलेल्या अध्ययनातून ‘राजकीय व्यवस्था’ हे सज्ञा उदयास आली व राज्यशास्त्राची स्थिरावली.1950 नंतरच्या काळात राज्य, राष्ट्र, सरकार या संज्ञा ऐवजी ‘राजकीय व्यवस्था’ या संज्ञेचा वापर मोठ्या प्रमाणात केला जाऊ लागला. उदा भारतीय संविधानाचा अभ्यास असे ना संबोधता भारताच्या राजकीय व्यवस्थेचा अभ्यास असे संबोधले जाते.

## राजकीय व्यवस्था संकल्पनेचा अर्थ:-

‘राजकीय व्यवस्था’ या संकल्पनेचा अर्थ समजून घेताना आपण प्रथम **‘व्यवस्था’** या संज्ञेचा अर्थ समजून घेऊ. ‘व्यवस्था’ ही संज्ञा मुख्यतः जीवशास्त्रातील आहे. सजीव प्राण्याच्या शरीर रचनेचे अध्ययन करण्यासाठी ‘व्यवस्था’ या संज्ञेचा उपयोग केला जातो. उदा. मानवी शरीर व्यवस्था याचा अर्थ हात, पाय, केस, नख, पचनसंस्था, श्वसनसंस्था या सर्व अवयवांचा, त्याचप्रमाणे बाह्य वातावरण, अन्न या सर्व गोष्टींचा त्यात समावेश होतो. एवढेच नाही तर त्या संबंधित प्रक्रियांचा समावेश त्यात होतो. थोडक्यात **परस्पर संबंधित घटकांचा संच किंवा परस्परांशी आंतरक्रिया करीत असलेल्या घटकांचा संच म्हणजे व्यवस्था होय.** ‘व्यवस्था’ ही सज्ञा व्यापक अर्थ स्पष्ट करणारी आहे.

तर **‘राजकीय’** या संज्ञेचा अर्थ पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल. ‘राज्य, शासनसंस्था व राजकीय जीवनाशी प्रत्यक्षपणे संबंधित असणाऱ्या विविध बाबींना ‘राजकीय’ असे बऱ्याच काळापासून म्हटले जाते. उदा. राजकीय धोरण, राजकीय चळवळी, राजकीय पक्ष इत्यादी. परंतु आधुनिक काळात या संज्ञांची व्याप्ती वाढली आहे. कारण काही गोष्टी राजकारणाशी किंवा राजकीय जीवनाशी ठळकपणे निगडित असतात उदा. शासन यंत्रणा, मतदान, दबाव गट तर काही गोष्टी किंवा घटक अप्रत्यक्षपणे किंवा विशिष्ट प्रसंगी राजकीय जीवनाशी संबंधित होतात. उदा. ‘भाषा’ हा सामाजिक विषय आहे, पण एखाद्या भाषिक गटांनी आपल्या भाषेला राष्ट्रीय भाषेचा जर दर्जा देण्याची मागणी केली व सरकारला तसा निर्णय घेणे भाग पडले तर ‘भाषा’ हा मुद्दा सामाजिक न राहता राजकीय होतो. म्हणून धर्म,भाषा, वंश, प्रादेशिक गट इत्यादी घटकही विशिष्ट प्रसंगी ‘राजकीय’ होतात. त्यामुळे राजकीय या संज्ञेची व्याप्ती पूर्वीपेक्षा अधिक वाढली आहे.

‘राजकीय’ व ‘व्यवस्था’ यांचा स्वतंत्र अर्थ समजून घेतल्यानंतर त्यांचा एकत्रित अर्थ समजून घेऊ. राजकीय संबंध हा सामाजिक संबंधाचा एक भाग आहे. संपूर्ण सामाजिक जीवन हे एकसंघ व परस्परावलंबी असते. म्हणून ते राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक असे वेगवेगळे करता येत नाही. पण अभ्यासाच्या सोयीसाठी त्याला वेगळे करता येते. सत्ताधारकांकडे धोरण ठरवण्याचा, निर्णय घेण्याचा व अंमलबजावणी करण्याचा अधिकार असतो. तो सर्वांसाठी बंधनकारक असतो. म्हणजेच समाजासाठी काय अत्यावश्यक आहे, हे ठरवण्याचा अधिकार सत्ताधारकाकडे असतो. यालाच **अधिकारयुक्त मूल्यनिर्धारण** म्हणतात. यावरून डेवीड ईस्टनने व्याख्या केली आहे, ***‘समाजासाठी अधिकारयुक्त मूल्यनिर्धारण करण्याशी संबंधित सर्व आंतरक्रियांची पद्धती किंवा सर्व आंतरक्रियांचा संच म्हणजे राजकीय व्यवस्था होय.’*** तर आलमंड हा विचारवंत राज्याच्या दंडशक्तीच्या अधिकाराला महत्त्व देतो. त्याच्या मते, कोणताही वाद निर्माण झाल्यास राज्यव्यवस्थेचा निर्णय सर्वांसाठी बंधनकारक व अंतिम स्वरूपाचा असतो. त्यावरून त्याने व्याख्या केली आहे की, ***‘दंडशक्तीचा अधिमान्य वापर करून किंवा त्याचा धाक दाखवून ऐक्य आणि संपोषणाची कार्य पार पाडणाऱ्या आंतरक्रियांची पद्धती किंवा संच म्हणजे राजकीय व्यवस्था होय.’***

या दृष्टिकोनात **‘शासनयंत्रणा’** हे राजकीय व्यवस्थेचे मुख्य अंग आहे, आणि शासनयंत्रणाचा अभ्यास केवळ संविधानाच्या संदर्भात न करता संपूर्ण समाज व्यवस्थेच्या व्यापक संदर्भात करणे अपेक्षित आहे. या दृष्टिकोनात राजकीय क्षेत्रात व राजकारणात काय काय घडते याबरोबर ते का व कसे घडते याचाही अभ्यास केला जातो. तसेच या दृष्टिकोनात **राज्याचा मानवी जीवनावर असणारा प्रभाव एकतर्फी नसतो,** असे गृहीत धरले जाते. जसे. राज्य आणि राजकीय संस्था यांचा प्रभाव मानवी वर्तनावर पडतो तसाच मानवी वर्तनाचा परिणाम राजकीय संस्थांवर पडतो, म्हणून राज्य, शासनसंस्था यांचा अभ्यास केवळ संविधान व कायदा यांच्या संदर्भात करणे पुरेशी नाही. त्यामुळे विधिमंडळ, कार्यकारी मंडळ, न्याय मंडळ, वृत्तपत्रे (प्रसार माध्यमे) यासारख्या राजकीय संरचनांच्या कार्याचा विचार संपूर्ण समाजाच्या संदर्भात करण्यावर या दृष्टिकोनात भर दिला जातो.

## अध्ययनाचा मध्यबिंदू :-

**‘राजकीय प्रक्रिया’** हा या दृष्टिकोनाच्या अध्ययनाचा मध्यबिंदू आहे. राजकीय व्यवस्थेचे अध्ययन करताना तिच्या कार्यपद्धतीचे अध्ययन करण्यावर विशेषत्वाने भर दिला जातो, जसे. शरीरव्यवस्थेचा अभ्यास करताना अन्न, पाणी, हवा यासारख्या गोष्टींचा नियमित व व्यवस्थित पुरवठा (आदान कार्य) होणे आवश्यक आहे, त्यानंतर त्याचे रक्तात, ऊर्जेत रुपांतर होणे (रूपांतर कार्य) आवश्यक असते. रूपांतरित रक्ताचे ऊर्जेचे योग्य वितरण होणे आवश्यक (प्रदान कार्य) आहे. म्हणजेच शरीर व्यवस्थेचा अभ्यास करताना आदान, रूपांतर, प्रदान कार्यामध्ये होणाऱ्या प्रक्रियांचा अभ्यास करणे आवश्यक असते, तसेच राजकीय व्यवस्थांचा अभ्यास करताना राजकीय प्रक्रियांचा अभ्यास करणे आवश्यक असते.

## योगदान:-

१) हा दृष्टिकोन सर्वसमावेशक व व्यापक स्वरूपाचा आहे.
२) या दृष्टिकोनामुळे तुलनात्मक राजकारण या विषयाला पूर्वीपेक्षा अधिक शास्त्रीयता प्राप्त झाली.
3) राज्याचा मानवी जीवनावर असणारा प्रभाव एकतर्फी नसतो, असे यादृष्टिकोनाने सांगितले.
४) या दृष्टिकोनामुळे आंतरविद्याशाखीय अभ्यासाला चालना मिळाली.
५) शासकीय बरोबरच अशासकीय यंत्रणांचा अभ्यास.
६) काय काय घडते याबरोबरच ते का व कसे घडते याचा अभ्यास.

## मर्यादा:-

१) या दृष्टिकोनाच्या आधारे राजकीय व्यवस्थेतील प्रशासकीय यंत्रणांची भूमिका व कार्य कोणती हे निश्चितपणे सांगता येत नाही.
२) या दृष्टिकोनाच्या प्रवर्तकामध्ये एकवाक्यता नाही.
३) या दृष्टिकोनाच्या साहयाने अध्ययन करणे क्लिष्ट व गुंतागुंतीचे आहे.

# वर्तनलक्षी दृष्टिकोन:-

वर्तनलक्षी दृष्टिकोन 1950 नंतरच्या काळात निर्माण झाला, म्हणून हा ही एक आधुनिक दृष्टिकोन आहे. चार्ल्स मेरीयम हा या दृष्टिकोनाचा प्रवर्तक आहे. मनुष्य हा सामाजिक व राजकीय प्राणी आहे. म्हणून राजकीय संस्थांचा अभ्यास करण्यापेक्षा लोक कसे वागतात? आणि तसे वागण्यामध्ये कोणत्या प्रेरणा आहेत?, या प्रश्नांना केंद्रबिंदू मानून ***व्यक्ती-व्यक्तीमधील राजकीय संबंधाचे अध्ययन*** या दृष्टिकोनात केले जाते. असे अध्ययन करताना व्यक्तीला एक **राजकीय एकक** समजले जाते, मग तो कोणत्याही पदावर असेल तरी त्याला विशेष महत्त्व दिले जात नाही.उदा. राष्ट्रपती, खासदार, आमदार, नगरसेवक, सरपंच इत्यादी. त्यांना फक्त **एक युनिट (एकक) मानले जाते व त्यांच्याकडून होणारे वर्तन व त्यामागील असलेल्या प्रेरणा, भावना व अन्य व्यक्ती यांचा विचार केला जातो.** **व्यक्तीचे राजकीय वर्तन हा या दृष्टिकोनाचा मध्यबिंदू आहे.** व्यक्तीच्या वर्तनामागे आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, जातीय यासारख्या विविध प्रेरणा असू शकतात. म्हणून अध्ययन करताना **आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनाचा** अवलंब केला जातो. म्हणजेच अभ्यास करताना केवळ राज्यशास्त्राचाच अभ्यास न करता इतर शास्त्राचाही अभ्यास केला जातो किंवा मदत घेतली जाते. मानवी वर्तन हा मानसशास्त्राच्या अभ्यासाचा विषय आहे, त्यात विभिन्न व्यक्तीच्या वर्तनाचे अध्ययन करून त्यामधील नियमित्ता, समानता व असमानता आणि वारंवारिता शोधणे शक्य आहे असे **गृहीत** धरले जाते. त्यामुळे या दृष्टिकोनात ज्याचे **निरीक्षण** व **मापन** करणे शक्य आहे तसेच ज्याचे **परीक्षण** करणे किंवा **पडताळा** घेणे शक्य आहे त्याच राजकीय वर्तनाचा अभ्यास करावा, असे हा दृष्टिकोन मांनतो. दुसऱ्या शब्दात **जी तथ्य पंचंइद्रियांनी किंवा यांत्रिक उपकरणा करवी प्रत्यक्ष अनुभवायला येतात तीच प्रमाण मानावी.** असे हा दृष्टिकोन **गृहीत** धरतो. या दृष्टिकोनाची काही ठळक ***वैशिष्ट्ये*** पुढीलप्रमाणे सांगता येते.

१) व्यक्ती प्रमाणेच समूह, संघटना, चळवळी किंवा आंदोलने यासारख्या संघटित गटांच्या राजकीय वर्तनाचे **अनुभवाधिस्टीत** अध्ययन वर्तनलक्षी दृष्टिकोनात केले जाते.
२) व्यक्तीच्या वर्तनामागे आर्थिक, धार्मिक, भाषिक, वांशिक यासारख्या वेगवेगळ्या प्रेरणा असतात. त्यामुळे **आंतरविद्याशाखीय** दृष्टिकोनातून अध्ययन केले जाते.
3) या दृष्टिकोनाच्या साहृयाने अध्ययन करताना आपापल्या अध्ययनासाठी निश्चित स्वरूप असणारा **संशोधन आराखडा** तयार केला जातो.

## हेतू / गृहीते:-

डेविड ईस्टनने वर्तनलक्षी अध्ययनाची ***आठ*** हेतू किंवा गृहिते स्पष्ट केले आहेत. हा दृष्टिकोन समजण्यासाठी ते फार महत्त्वाचे आहेत. म्हणूनच ईस्टनला 'वर्तनलक्षी अध्ययनाचा पाया घातला.' असे म्हटले जाते. वर्तनलक्षी अध्ययनाचे हेतू खालील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

### १) वारंवारता:-

एका व्यक्तीचे राजकीय वर्तन दुसऱ्यापेक्षा काहीसे भिन्न किंवा वेगळे असते. तरीही व्यक्तीच्या राजकीय वर्तनात लक्षात येण्याइतपत स्पष्ट अशी वारंवारिता असते. ती शोधून काढणे किंवा तिचा शोध घेणे शक्य आहे. ती सामान्यीकरणाच्या किंवा निष्कर्षाच्या स्वरूपात मांडणे शक्य आहे. याचाच अर्थ असा की, **व्यक्तीच्या राजकीय वर्तनाची लक्षात येण्याजोगी जी पुनरावृत्ती होते, त्यावरून निष्कर्ष काढले जावेत.**

### २) पडताळा:-

राजकीय वर्तनाचे अध्ययन करून काढलेले सामान्यीकरणाच्या स्वरूपातील निष्कर्ष हे कोणालाही पुन्हा पडताळून पाहता येतील अशा योग्यतेचे असावे. दुसऱ्या शब्दात **काढलेल्या निष्कर्षाचा पडताळा (चाचणी, तपासणी, प्रयोग) करता यायला हवा.**

### 3) अध्ययन तंत्रे:-

विश्वसनीय पुराव्यांचा आधार असेल तर निष्कर्षाची पडताळणी करणे शक्य असते. म्हणून राज्यशास्त्र तथ्यांचे संकलन व विश्लेषण करण्यासाठी **नैसर्गिक शास्त्रामध्ये प्रचलित असलेल्या अध्ययन तंत्राचा अवलंब केला पाहिजे.** या दृष्टीने सर्वेक्षण पद्धती, नमुना पाहण्या, आशय विश्लेषण, बहु चलात्मक विश्लेषण अशी अध्ययन तंत्रे वर्तनवादी अभ्यासकानी उपयोगात आणली पाहिजे.

### ४)परिमाणन:-

राजकीय वर्तनाचे अध्ययन करताना त्यांचे मोजमाप करण्याच्या पद्धती किंवा मार्ग अचूक आणि काटेकोर असणे आवश्यक ठरते. यासाठी **संख्याशास्त्रीय परिमाणांचा अवलंब वर्तनलक्षी अभ्यासकांनी करणे आवश्यक ठरते.**

## ५) मूल्यतटस्थता:-

राजकीय वर्तनाचे अध्ययन करताना अभ्यासकाने स्वतःची मूल्यात्मक बांधिलकी व अग्रक्रम आणि नीतीशास्त्रीय निकष दूर ठेवावेत, कारण नीतीशास्त्रीय निकषांचा आणि मूल्यांचा खरे-खोटेपणा किंवा बरे-वाईटपणा शास्त्रीय कसोट्यांवर सिद्ध करता येत नाही. म्हणून **राजकीय वर्तनाचे अध्ययन हे मूल्यतस्थेला प्राधान्य देऊन संशोधक अभ्यासकांनी केले पाहिजे.**

## ६) व्यवस्थितपणा:-

राजकीय वर्तनाचे संशोधन-अध्ययन पद्धतीने पद्धतशीरपणे व्हावयास पाहिजे. संशोधन अर्थपूर्ण होण्याकरिता संशोधनाला सिद्धांताची जोड मिळायलाच हवी. असे करताना **ज्या सिद्धांतांना तथ्यांचा आधार देता येतो, त्याच सिद्धांताचा वापर करायला हवा. तरच अध्ययन व्यवस्थितपणे होईल.** व्यवस्थितपणा हा वर्तनलक्षी अध्ययनाचा महत्त्वाचा हेतू आहे.

## ७) शास्त्रशुद्धता:-

संशोधक/ अभ्यासक आपल्या अध्ययनातून राजकीय वर्तनाच्या आकलन करून घेतो. त्याला आकलन झालेल्या राजकीय वर्तनाचे तो स्पष्टीकरण करतो. या **त्याच्या अध्ययन कार्यात शास्त्रशुद्धता असली पाहिजे. म्हणजे त्याचे अध्ययन कार्य हे व्यवहारोपयोगी ठरावयास हवे.**

## ८) एकात्मता:-

राजकीय वर्तनाचे वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन करण्यासाठी संशोधक अभ्यासकाला विभिन्न सामाजिक शास्त्रामधील सज्ञा किंवा संकल्पना, तत्वे व सिद्धांत यांचा आधार घ्यावा लागतो. **या उपयोगात आणलेल्या सर्व माहितींमध्ये एकात्मता असली पाहिजे.**

## योगदान:-

१) नैसर्गिक शास्त्रातील प्रचलित अध्ययन तंत्राचा वापर परिमाणन, पडताळा आदींमुळे राज्यशास्त्रीय अध्ययनाला अधिक **शास्त्रीयता/ वैज्ञानिकता** प्राप्त करून दिली.

२) आंतरविध्याशाखीय दृष्टिकोनाचे अवलंबामुळे राज्यशास्त्रीय संशोधन अध्ययनाची **व्याप्ती** अधिक वाढली.

३) अनुभवजन्य अध्ययनामुळे संशोधनाची **विश्वसनीयता** वाढली.

## टीका/ मर्यादा:-

१) वर्तनलक्षी अध्ययनात **संदीग्धता** दिसून येते. राजकीय वर्तन कोणता ? हे कसे ठरवायचे. त्याचबरोबर मानवी वर्तनात ***निरीक्षणक्षम भाग फार थोडा*** असतो, त्यावरून संपूर्ण मानवी वर्तनासंबंधी निष्कर्ष काढणे टीकाकारांना योग्य वाटत नाही.

२) या दृष्टिकोनात **अध्ययनतंत्राला अवाजवी महत्त्व** देण्यात आले. राजकीय सिद्धांताची मांडणी व बांधणी करण्यापेक्षा नवीन संशोधन तंत्र विकसित करण्याला अवास्तव महत्त्व देण्यात आले.

३) ज्यांचे परिमाणन करणे शक्य आहे. अशाच राजकीय वर्तनाचा अभ्यास करावा, असे वर्तनवादी म्हणतात. त्यामुळे जे ***महत्त्वाचे प्रश्न आहेत पण त्यांचे परिमाणन न करता आल्यामुळे त्या प्रश्नांकडे दुर्लक्ष*** करण्यात आले आणि म्हणून **दुय्यम प्रश्नांना प्राधान्य** मिळाले.

**४) मूल्यतटस्थतेवर अतिभर** देण्यात आला. परंतु संशोधन करताना संशोधन करता हा ***मनुष्य असल्यामुळे तो पूर्णतः मूल्यतटस्थ राहू शकत नाही.***

# गटवादी / समूहावादी दृष्टिकोन:-

गटवादी किंवा समूहवादी दृष्टिकोन हा एक आधुनिक दृष्टिकोन आहे. आर्थर बेंटले यांनी सर्वप्रथम हा दृष्टिकोन मांडला. आधुनिक समाजात हितसंबंधांच्या आधारावर निर्माण झालेले गट महत्वपूर्ण भूमिका बजावतात. त्यामुळे राजकीय वास्तवतेचे आकलन करून घेण्यासाठी गटाच्या कार्याचे अध्ययन करणे आवश्यक ठरते.

## गट म्हणजे काय ?

मनुष्य गटप्रिय प्राणी आहे. मनुष्य जन्मापासून मृत्यूपर्यंत सतत कोणत्या ना कोणत्या गटात वावरत असतो. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाला वा जीवनाला आकार देण्यामध्ये गटाचे योगदान महत्वपूर्ण असते. संख्यात्मकदृष्ट्या एकापेक्षा अधिक व्यक्ती एकत्र आल्या की, गट किंवा समूह तयार होतो. परंतु ***आजच्या काळात गट म्हणजे समान हितसंबंधाचे रक्षण व जोपासना करण्यासाठी एकत्र कृती करणाऱ्या व्यक्तींचा संच होय.*** असे समान  हितसंबंधावर तयार झालेले गट तुलनात्मक दृष्ट्या **स्थिर** असतात. आर्थर बेंटले अशा गटाला व्यक्तींचा समूह न मानता **कार्याचा ढीग** असे म्हणतो.

## गटवादी दृष्टिकोनाचा अर्थ:-

व्यक्तींनी मिळून समाज बनत असला तरी, एकटी व्यक्ती समाजाला प्रभावित करण्यास असमर्थ ठरत असते. त्याचप्रमाणे आधुनिक काळात एकटी व्यक्ती शासनाचे धोरण व निर्णय पुरेशा प्रमाणात प्रभावित करू शकत नाही. याउलट समान हितसंबंधाच्या आधारावर अनेक व्यक्ती एकत्र येऊन त्यांचा एक गट संघटित झाला की, हा गट आपल्या कृतीद्वारे निर्णय घेणाऱ्या वर प्रभाव टाकू शकतो. **गटांच्या शक्तीचे, कार्याचे आणि कार्यपद्धतींचे शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले अध्ययन म्हणजे गटवादी दृष्टीकोनातून केलेले अध्ययन होय.**

राजकारणाचा व राजकीय वर्तनाचा अभ्यास विविध समूहाच्या विश्लेषणाद्वारे केला जाऊ शकतो, असे हा दृष्टिकोन मानतो. आधुनिक काळात राज्याची शक्ती व सत्ता इतकी अमर्याद वाढली आहे की, त्याच्यासमोर एकटी व्यक्ती ही असहाय्य व दुर्लक्षित झाली आहे. काही कर्तबगार व्यक्ती याला अपवाद असतात पण, त्यांची संख्या नेहमीच कमी असते. त्यामुळे सामान्य माणसाला आपल्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी संघटित शक्तीचाच (गटाचा) आधार घ्यावा लागतो. थोडक्यात ***गटाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे त्यामुळे राजकीय वास्तवतेचे आकलन करून घेण्यासाठी गट हा गट व गटाच्या कार्याचे अध्ययन करणे आवश्यक आहे असे हा दृष्टिकोन मानतो.***

## *टीका किंवा मर्यादा:-*

*१) या दृष्टिकोनाच्या समर्थक विचारवंतांमध्ये सज्ञा, संकल्पनांबाबत* एकवाक्यता नाही*. उदा समूह म्हणजेच समूहातील व्यक्ती की, त्यांचे कार्य, हितसंबंध म्हणजे काय? इत्यादी.*

*२) शासनाच्या धोरण निर्णयावर गटांचा* प्रभाव असतो असे नाही*. शासनाचे धोरण सर्वकष विचार करून सार्वजनिक हित लक्षात घेऊन घेतले जातात.*

*3) गटांची* भूमिका *जेवढी विकसित देशांमध्ये महत्त्वपूर्ण आहे तेवढी विकसनशील व अविकसित देशांमध्ये नाही.*

## सत्तालक्षी दृष्टिकोन:-

'सत्तालक्षी दृष्टिकोन' हा एक आधुनिक दृष्टिकोन आहे. **हेराल्ड लॉस्वेल** हा सत्तालक्षी दृष्टिकोनाचा निर्माता आहे. या दृष्टिकोनात ***सत्तेला केंद्रबिंदू*** मानून राज्यशास्त्रीय अध्ययन केले जाते.

## सत्तालक्षी दृष्टिकोनाचा अर्थ:-

इंग्रजीतील **'पावर'** या राज्यशास्त्रीय संज्ञेसाठी मराठीत **'सत्ता'** या संज्ञेचा उपयोग केला जातो. 'सत्ता' ही **अमूर्त** आहे. ती आपण डोळ्यांनी पाहू शकत नसलो, तरीही कल्पना व बुद्धीच्या साहृयाने तिचे अस्तित्व समजून घेऊ शकतो. म्हणजे ती **अनुभवजन्य** आहे. ***सत्ताधारक व सत्याग्राहक असे सत्तेचे दोन घटक असतात.*** दुसऱ्या शब्दात आज्ञा देणारे (सत्ताधारक) व दिलेल्या आज्ञानुसार वागणारे (सत्ताग्राहक) असे दोन घटक असल्याशिवाय सत्तासंबंध निर्माण होऊ शकत नाही. म्हणजेच सत्ता गाजवण्यासाठी ती कोणावर तरी असावी लागते. म्हणून सत्ता ही एकट्या माणसापाशी कधीच नसते. या दृष्टिकोनाच्या समर्थकांच्या मते, राजकीय संबंध हे मूलतः **सत्तासंबंध** असतात. त्यामुळे राजकीय संबंधाचा अभ्यास करावयाचा असल्यास सत्तासंबंधाचा अभ्यास करावा, असे हा दृष्टिकोन मानतो. सत्ता संपादन करणे आणि तिचा वापर करणे हा मानवी स्वभाव आहे. **सत्ता प्राप्त करण्यासाठीच लोकांमध्ये स्पर्धा व संघर्ष सुरू असतो.** त्यामुळे सत्तेच्या अभ्यासाशिवाय अध्ययन अपूर्ण आहे, असे हा दृष्टिकोन मानतो. **राजकारण** हे कधीही स्थिर नसते, ते नेहमी गतिशील असते. या **गतिशीलतेचा अभ्यास** सत्तालक्षी दृष्टिकोनातून करता येतो. त्याचप्रमाणे समाजात साधनसामग्रीची वाटणी जशी विषम प्रमाणात झाली आहे. तशीच *सत्तेची वाटणी* **विषम** प्रमाणात झाली आहे. ही विषम वाटणीच सत्तासंबंधाचा आधार असते. **या वाटणीचे अचूक मोजमाप करता येते.** असे या दृष्टिकोनाचे समर्थक **गृहीत** धरतात. त्याचाही अभ्यास या दृष्टिकोनाच्या साहृयाने करता येतो. एकंदरीत **राजकीय वर्तन व राजकीय संबंध यांचा अभ्यास केवळ सत्तासंबंधाच्या दृष्टीने करावा, असा या दृष्टिकोनाचा अर्थ आहे.**

## टीका किंवा मर्यादा :-

1) ‘सत्ता’ या संकल्पनेचा अर्थाबाबत यादृष्टिकोनाच्या समर्थकांमध्ये **एकवाक्यता नाही**. सत्तेला कोणी राजकीय प्रक्रिया म्हणतो, कोणी नियंत्रणाची कार्य करते म्हणतो, तर कोणी निर्णय-निर्मितीमधील सहभाग म्हणतो.
2) सत्तेचे अचूक मोजमाप करता येते, असे या दृष्टिकोनात गृहीत धरले जाते. परंतु सत्ता अमूर्त, अनुभवज्यन्य आहे. तिचे **परिमाणन करता येत नाही**, तर तिचे अचूक मोजमाप कसे करणार.
3) राजकीय वर्तन व राजकीय संबंध यांचे अध्ययन केवळ सत्ता संबंधाच्या दृष्टीने करावा, असे या दृष्टिकोनाचे समर्थक मानतात. परंतु ते एकांगी स्वरूपाचे ठरणार, कारण व्यक्तीचे राजकीय वर्तन व राजकीय संबंध यांच्यावर फक्त सत्ता संबंधाचा प्रभाव नसतो, तर **इतरही घटकांचा प्रभाव** असतो.

# मार्क्सवादी दृष्टिकोन:-

**‘कार्ल मार्क्स’** हा या दृष्टिकोनाचा निर्माता आहे. तसा हा दृष्टिकोन **पारंपारिक** आहे पण अनुभववादी दृष्टिकोनाच्या मर्यादा हळूहळू लक्षात येऊ लागल्यामुळे, *आधुनिक काळात या दृष्टिकोनाचे महत्त्व वाढले.*

## मार्क्सवादी दृष्टिकोनाचा अर्थ:-

मार्क्सच्या मते, समाजात नेहमी **दोन वर्ग** असतात. उदा. सरंजाम- शेतमजूर, मालक- गुलाम, भांडवलदार- श्रमिक इत्यादी. या दोन वर्गातील हितसंबंधात **आर्थिक घटक** निर्णायक असतात. **कालानुसार उत्पादन तंत्रात बदल** होत राहतात. उत्पादन तंत्रातील बदलामुळे उत्पादन संबंध बदलतात, व ***उत्पादन संबंधातील बदलाचा परिणाम सामाजिक व राजकीय क्षेत्रावर होतो***. उदा. पूर्वी उत्पादन साधनांची मालकी सरंजामांच्या हाती होती, औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादन साधनांची मालकी भांडवलदारांच्या हाती आली. त्यामुळे **सरंजाम- शेतमजूर** असे असलेले उत्पादन संबंध **भांडवलदार- श्रमिक** असे झाले. यालाच मार्क्स **‘इतिहासाचा भौतिक अन्वयार्थ’** असे म्हणतो.

समाजातील दोन वर्गांपैकी संख्येने कमी असलेल्या वर्गाकडे उत्पादन साधनांची मालकी असते, तर संख्येने जास्त असलेल्या वर्गाकडे श्रमाशिवाय दुसरे काहीही नसते. उत्पादन साधनांची मालकी असलेला वर्ग **(भांडवलदार)** हा श्रमिक कष्टकऱ्यांचे **(श्रमिक वर्ग)** शोषण करीत असतो. म्हणून या **दोन वर्गात सतत संघर्ष** सुरू असतो. म्हणून मानव जातीचा संपूर्ण इतिहास हा **वर्गसंघर्षाचा इतिहास आहे**, असे मार्क्स म्हणतो. अन्याय, शोषणातून मुक्ती मिळवण्यासाठी **क्रांती** अनिवार्य आहे, असे या दृष्टिकोनात ***गृहीत*** धरले जाते. शोषित सर्वहारा समाज (कामगार, कष्टकरी, शेतकरी) वर्ग एकत्र येतो व भांडवलशाहीशी लढा देतो. हा लढा (क्रांती) यशस्वी होते. यात संख्येने जास्त असलेल्या **श्रमिक वर्गाचा विजय** होतो. क्रांतीनंतर **वर्गविरहित व राज्यविरहित** अशा **साम्यवादी समाजाची** निर्मिती होते.

राजकारणाचा अभ्यास **वर्गाच्या** अनुषंगाने करणे आणि राजकीय विकासाची तपासणी **दंद्वाच्या** आधारे करणे असा मार्क्सवादी दृष्टिकोनाचा अर्थ आहे. दुसऱ्या शब्दात या दृष्टिकोनाच्या साह्याने अध्ययन करताना, **राजकारण व राजकीय विकास समजून घेण्यासाठी, समाजातील दोन वर्गाचा व त्यांच्यातील संघर्षाचा अभ्यास करणे होय.**

## टीका किंवा मर्यादा:-

१) आर्थिक कारणांनी जशी राजकीय प्रक्रिया प्रभावीत होते, तशी **राजकीय निर्णयांनी अर्थव्यवस्था प्रभावित** होते.

२) समाजात सतत वर्ग संघर्ष सुरू असतो, हे चुकीचे आहे. बऱ्याचदा समाजात **सामंजस्य, सहकार्य** दिसून येते.

३) समाजात दोनच **वर्ग** असतात, असे नाही. **जास्तही असू शकतात**. उदा. गरीब वर्ग, मध्यमवर्ग, श्रीमंत वर्ग इ.

४) वर्गविहीन, राज्यविहीन समाज हा **कल्पनाविलास** आहे.

५) क्रांतीनंतरही **संघर्ष कायम राहू शकतो**, **नवीन वर्ग निर्माण होऊ शकतात**.

# गोविंदराव वारजूकर महाविद्यालय, नागभीड

## राज्यशास्त्र विभाग

# राजकीय सिद्धांत

B.A. भाग 2 (सेम.iii)

युनिट 2

प्रा.मंगेश टी.देवढगले

# राज्यसंस्थेच्या उत्पत्तीचे सिद्धांत

## राज्यसंस्था अर्थ व्याख्या व मूलतत्त्वे :-

### राज्य :-

राज्यसंस्था ही राज्यशास्त्राच्या अभ्यासातील सर्वात **प्राथमिक** संकल्पना आहे. मनुष्याने आपल्या विविध गरजांच्या पूर्ततेसाठी अनेक संस्था व संघटनांची निर्मिती केली आहे. राज्य त्यापैकी एक आहे. पण राज्याचे वेगळेपण हे आहे की, राज्याशिवाय व्यक्ती सुरक्षित जीवन जगू शकत नाही. राज्य नसेल तर समाजात गोंधळ व अराजकाची अवस्था निर्माण होईल आणि व्यक्तीचे जीवितच धोक्यात येईल. म्हणून राज्य **आवश्यक** आहे. व्यक्ती आणि समाज यांच्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अधिकारातून राज्याला सर्वश्रेष्ठ संस्था असा दर्जा प्राप्त झाला आहे. राज्याची **सदस्यत्व** प्रत्येक व्यक्तीला **अनिवार्य** आहे. राज्याच्या **आज्ञा** प्रत्येकाला पाळाव्यात लागतात. म्हणून राज्यशास्त्राच्या अभ्यासाची सुरुवात राज्याच्या अभ्यासापासून होते, असे गार्नरने म्हटले आहे.

### राज्याची व्याख्या :-

१) **ॲरिस्टाटल**च्या मते, "राज्यसंस्था हा अनेक कुटुंबे आणि खेड्यांचा संघ आहे. परिपूर्ण आणि स्वयंपूर्ण म्हणजे ज्याला आपण सुखी व सन्मानाचे जीवन म्हणतो, ते उपलब्ध करून देणे. हेच या संघाचे म्हणजे राज्याचे प्रयोजन आहे."

२) **मेकियाव्हेली**च्या मते, "राज्य हे सत्ता बडकविण्याचे एक धर्मनिरपेक्ष साधन आहे."

३) **गार्नर**च्या मते, "राज्यशास्त्र आणि सार्वजनिक कायदा यांच्यातील एक संकल्पना या दृष्टीने राज्यसंस्था म्हणजे **संख्येने** कमी-अधिक असलेल्या व्यक्तींचा समुदाय असतो जो विशिष्ट **भूभागा**वर कायम वास्तव्य करून राहतो, **बाह्य नियंत्रणा**पासून स्वतंत्र किंवा जवळपास स्वतंत्र असतो आणि बहुसंख्य रहवाशी जिच्या **आज्ञां**चे सवयीने पालन करतात, अशी सुसंगटीत **शासन व्यवस्था** बाळगतो."

४) **मॅक आयव्हर**च्या मते, "राज्यसंस्था ही एक अशी संघटना असते की जी **सक्ती करण्याचा अधिकार** तदर्थ लाभलेल्या **शासन संस्थे**ने लागू केलेल्या कायद्याच्या द्वारे क्रियान्वीत राहते आणि निश्चित सीमारेषा असलेल्या **भूभागा**वरील **जनसमुदाया**त सामाजिक सुव्यवस्थेसाठी आवश्यक असलेल्या परिस्थितींना टिकवून ठेवते."

वरील व्याख्यावरून राज्यांच्या व्याख्याबाबत विचारवंतांमध्ये एकमत नाही, हे लक्षात येते. तत्कालीन लहान आकाराची नगरराज्य विचारात घेऊन अरिस्टॉटलने आपली व्याख्या तयार केल्याचे दिसून येते. तर मेकयावेली राज्याकडे केवळ सत्तेच्या दृष्टिकोनातून बघतो. परंतु तिसरी व चौथी व्याख्या जास्त अर्थपूर्ण आहे. कारण त्यात राज्याच्या आवश्यक घटकांचा समावेश आहे.

## राज्यसंस्थेची मूलतत्वे किंवा वैशिष्ट्ये :-

राज्यसंस्थेच्या मूलतत्त्वांना राज्याचे घटक असेही संबोधले जाते. राज्यशास्त्राच्या उदय काळापासून तर आधुनिक काळापर्यंत राज्याच्या संकल्पनेत अनेक बदल झाले. तरीही प्राचीन काळापासून आजतागायत राज्याची चार मूलतत्त्वे कायम असल्याचे दिसून येते. राज्याच्या या चार घटकांपैकी कोणताही एखादा घटक नसला तरीही त्या जनसमुदायाला राज्य असे संबोधता येणार नाही, यावर विचारवंतांचे एक मत आहे. राज्याच्या या चारही घटकांची माहिती पुढीलप्रमाणे घेता येईल.

१) **लोकसंख्या किंवा लोकसमुदाय :-** लोकसमुदाय खेरीज कोणतीही संस्था निर्माण होऊ शकत नाही. लोक नसतील तर राज्याची आवश्यकताच राहणार नाही. निर्मनुष्य भूमीवर राज्य असू शकत नाही. राज्य निर्माण होण्यासाठी लोकसमुदाय आवश्यक आहे, हे निश्चित आहे. लोकसमुदायाच्या बाबतीत दोन पैलू महत्त्वपूर्ण आहेत.

i) **संख्या:-** राज्याची लोकसंख्या किती असावी याबाबत विचारवंतांमध्ये मतभेद आहेत. उदा. प्लेटोला 5040, रुसोला 10000 तर ॲरिस्टाटलला राज्याची लोकसंख्या उत्तम शासन होण्याइतपत लहान आणि स्वयंपूर्ण होण्याइतपत मोठी असावी, असे वाटते. आजच्या काळात भारत, चीन सारखी शंभर कोटी पेक्षा जास्त लोकसंख्या असणारी राज्य आहेत तर दुसरीकडे मोनाको,सन मारिनो यासारखी एक लाखापेक्षा कमी लोकसंख्या असणारी छोटी राज्य ही आहेत. म्हणून आजच्या काळातील राज्याच्या एकूण लोकसंख्येबाबत संख्या निदर्शक मत मांडणे योग्य ठरत नाही, असे म्हणता येईल. लोकसंख्येच्या आकाराचा राज्याच्या कारभारावर निश्चितपणे परिणाम होतो. लोकसंख्या खूप जास्त असेल तर दारिद्र्य, बेरोजगारी, गलीच्छ वस्ती यासारख्या समस्यांना तोंड देण्याची पाळी येते, आणि राज्याची लोकसंख्या खूप कमी असेल तर ते राज्य स्वसंरक्षणापासून अन्य सर्वच बाबतीत दुबळे होऊन बसते. **राज्याच्या भूप्रदेशाच्या आकाराशी सुसंगत आणि उपलब्ध साधनसामग्रीतून सर्वांच्या गरजा भागवता येईल, इतपत राज्याची लोकसंख्या असावी.** असे म्हणता येईल.

ii) **गुणवत्ता :-** संख्यात्मक बाबी प्रमाणेच लोकसमुदायाची गुणवत्ता हा देखील राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचा पैलू आहे. लोकसाक्षर, कष्टाळू, धाडसी, सुसंस्कृत असणे, राज्यसंस्थेच्या हिताचे असते. लोकशाही शासन पद्धतीत जास्तीत जास्त लोकांचा सहभाग राजकीय प्रक्रियेत असणे अपेक्षित असते. त्यांचा सहभाग हा डोळस किंवा जागरूक असण्याची गरज आहे. म्हणूनच लोकांची गुणवत्ता हा राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचा घटक ठरतो. थोडक्यात आजच्या काळात कमी लोकसंख्या असणारी भूतान, नेपाळ, मालदीवसारखे राज्य आहेत तसेच चीन व भारतासारखे विशाल लोकसंख्या असणारे राज्य देखील आहे. लोकसंख्येचा गुणात्मक व संख्यात्मक विचार हा केवळ विश्लेषणाच्या दृष्टीने केला जातो.

## २) भूप्रदेश :-

'भूप्रदेश' हा राज्याचा **दुसरा** आवश्यक घटक आहे. भूप्रदेश असल्याशिवाय कोणताही लोकसमुदाय स्वतःचे स्वतंत्र व सार्वभौम असे राज्य निर्माण करू शकत नाही. ज्यू लोक संघटित होते, ते अमेरिका, जर्मनी, रशिया इत्यादी देशांमध्ये विखुरलेले होते. परंतु भूप्रदेश नसल्यामुळे त्यांचे स्वतःचे राज्य नव्हते. 1947 मध्ये बड्या राष्ट्रांनी पाठिंबा दिल्यामुळे त्यांना भूप्रदेश मिळाला आणि त्यांचे इजराइल हे राज्य निर्माण झाले. इसवी सन पूर्व काळात नगर राज्य होते. भूप्रदेशाबाबत लहान आकार असणे, हे कार्यक्षम प्रशासनाच्या दृष्टीने सोयीचे असते, असे त्या काळात मानले जात होते. लहान आकाराची राज्य स्वसंरक्षणाबाबत दुबळी असतात. आजूबाजूची बलाढ्य राष्ट्र त्यांना गिंळकृत करण्याची शक्यता असते. लहान आकाराची राज्य लष्करी आणि आर्थिक दृष्टीने स्वयंपूर्ण होऊ शकत नाही, असे आजच्या काळात मानले जाते. लोकसंख्येप्रमाणेच भूप्रदेशाच्या आकाराबाबत काही निश्चित विधान करणे अवघड आहे, असे म्हणता येईल.

## 3)सरकार किंवा शासनसंस्था :-

राज्याची इच्छा व्यक्त आणि साकार करणाऱ्या यंत्रणेला सरकार किंवा शासन यंत्रणा असे म्हणतात. राज्य अमूर्त आहे तर शासन यंत्रणा मूर्त असते. शासन यंत्रणा हे राज्याचे प्रशासकीय अंग आहे. समाजामध्ये शांतता कायदा व सुव्यवस्था राखणे हे शासन संस्थेचे मुख्य कार्य आहे. हे कार्य करण्यासाठी राज्यसंस्था निर्माण झालेली आहे. हे काम शासन यंत्रणेद्वारेच पार पाडले जाते. शासन यंत्रणे कडून विधीनियम तयार करणे, त्यांचे अंमलबजावणी करणे आणि न्यायदान करणे ही तीन कार्य पार पाडली जातात. हे तीन कार्य वेगवेगळ्या विभागाद्वारे होणे आजच्या काळात अपेक्षित आहे. कायदेमंडळ/ विधिमंडळ, कार्यकारी मंडळ, आणि न्याय मंडळ ही तीन शासनयंत्रणेची आवश्यक अंगे आहेत, असे मानले जाते. आधुनिक काळात सर्वच राज्यात शासनयंत्रणेत तीन विभाग असल्याचे आढळून येते.

संसदीय पद्धती, अध्यक्षीय पद्धती, राजेशाही, हुकूमशाही यासारख्या वेगवेगळ्या पद्धतींची शासन व्यवस्था प्रत्येक राज्यात असते. प्रत्येक राज्यात अमुक एका प्रकारची शासनव्यवस्था असावी, असे निश्चितपणे मानता येत नाही. पण कायद्याची निर्मिती, त्यांची अबलबजावणी आणि कायद्याचा अर्थ स्पष्ट करून न्यायदान ही तीन कामे नियमितपणे करणारी यंत्रणा मात्र प्रत्येक राज्यात आता असाव्यास पाहिजे असे म्हणता येईल.

## ४) सार्वभौमत्व:-

राज्यसंस्थेचे सर्वात महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे तिच्याकडे असणारी सार्वभौम सत्ता होय. **सार्वभौम सत्ता म्हणजे अंतिम सत्ता असते.** राज्याच्या निर्णयाविरुद्ध कोणत्याही व्यक्तीला कोठेही अपिल करता येत नाही. कारण राज्यसंस्था श्रेष्ठ असते. राज्यापेक्षा श्रेष्ठ असे काहीच नसते. सार्वभौमत्व हा राज्याचा सर्वात मोठा घटक आहे, असे म्हणता येते. कारण सार्वभौम सत्ता प्राप्त झाल्याशिवाय राज्य अस्तित्वात येऊ शकत नाही. उदा. 15 ऑगस्ट 1947 पूर्वी भारतीय समुदाय होता, भारतीय भूप्रदेश होता, ब्रिटिशांचे सरकार होते, परंतु भारत हे राज्य नव्हते. कारण भारताला सार्वभौम सत्ता प्राप्त झाली नव्हती. ती प्राप्त झाल्यानंतरच भारत हे खऱ्या अर्थाने राज्य झाले आहे.

सार्वभौमत्व हा राज्याचा गुण आहे. ती राज्याचे आज्ञा देण्याची शक्ती आहे. सार्वभौमत्व हा घटक अमूर्त आहे. अन्य तीन घटक मूर्त असले तरीही सार्वभौमत्व या एका घटकामुळे राज्यसंस्था ही अमूर्त आहे आणि सरकार हे राज्याचे मूर्त रूप आहे, असे आपण म्हणतो. राज्यातील सर्व व्यक्ती समूह, संस्था व संघटना यांना राज्यसंस्थेच्या निर्णयापुढे मान तुकवावीच लागते. याला आपण **अंतर्गत सार्वभौमत्व** म्हणतो. राज्यावर कोणत्याही बाह्य शक्तीचे नियंत्रण नसते, ते स्वतंत्र असते. राज्याला विशिष्ट प्रकारे वागावयास कोणीही भाग पाडू शकत नाही. याला आपण **बाह्य सार्वभौमत्व** असे म्हणतो. एक सार्वभौम राज्य दुसरा सार्वभौम राज्याला कोणत्याही प्रकारची आज्ञा देऊ शकत नाही. युद्धाची घोषणा करणे किंवा शांततेचा करार करणे यासाठी प्रत्येक राज्य स्वतंत्र असते, असा बाह्य सार्वभौमत्वचा अर्थ आहे. देशांतर्गत बाबतीत अंतिम व सर्वोच्च सत्ता आणि बाह्य हस्तक्षेप पासून मुक्तता हे राज्यसंस्थेचे स्वाभाविक लक्षण आहे.

# राज्यसंस्थेच्या उत्पत्तीचे सिद्धांत

राज्यसंस्थेची उत्पत्ती केव्हा झाली हे सांगणे कठीण आहे. तसा ऐतिहासिक पुरावा सुद्धा उपलब्ध नाही, मात्र राज्यसंस्था निर्माण करण्याची गरज का निर्माण झाली, यासंबंधी काही अंदाज व्यक्त करणे शक्य आहे. राज्याच्या उदयासंबंधीचे सिद्धांत मांडणाऱ्या विचारवंतांनी हेच केले आहे. राज्याच्या निर्मितीचे किंवा उद्याचे स्पष्टीकरण करणारे काही **महत्त्वपूर्ण सिद्धांत** पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

## राज्याच्या उत्पतीचा दैवी किंवा ईश्वरीय सिद्धांत :-

राज्याच्या उदयाचा हा **सर्वात जुना** सिद्धांत आहे. प्राचीन काळापासून 19 व्या शतकापर्यंतच्या प्रदीर्घ काळात या सिद्धांताचा प्रभाव सर्वसामान्य माणसाप्रमाणे काही चिंतकावरही होता. विशेष म्हणजे पौर्वात्य आणि पाश्चिमात्य अशा दोन्ही कडील अनेक देशांमध्ये या सिद्धांताचा प्रभाव होता. हिंदू, ख्रिस्ती, चिनी, येहुदी असे सर्वच लोक राजा हा ईश्वराचा प्रतिनिधी आहे आणि राजकीय सत्तेत ईश्वरी शक्तीचा अंश आहे. यावर विश्वास ठेवणारे होते.

### सिद्धांताचे प्रतिपादन :-

या सिद्धांतानुसार **राज्य ईश्वराने निर्माण केले आहे**. राज्याचा सर्व कारभार ईश्वराच्या इच्छेनुसार सुरू असतो. **ईश्वर स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत राज्यकारभार चालवतो.** पृथ्वीवरील राजा हा ईश्वराचा प्रतिनिधीच नाही तर त्याच्यामध्ये ईश्वरी शक्तीचा **अंश** देखील आहे. म्हणून राजाची आज्ञा म्हणजे ईश्वराची आज्ञा होय. ईश्वराला कोणीही विरोध करू शकत नाही तसे राजाला देखील कोणीही विरोध करू शकत नाही. राजाला विरोध करणे किंवा त्याने दिलेल्या आज्ञांचे पालन न करणे हा **महापाप** आहे. ईश्वर सर्वोच्च आहे, त्याच्यापेक्षा कोणीही मोठा नाही, तसेच राजा देखील **सर्वोच्च** आहे. त्यांनी केलेली प्रत्येक कृती ही ईश्वरी इच्छेनुसार केलेली असते आणि त्यासाठी तो **ईश्वराला जबाबदार** असतो.

## धर्मग्रंथांचा आधार :-

**सर्व प्रमुख धर्मांमध्ये राजा ही ईश्वराची निर्मिती होय**, असे म्हटले आहे. तसेच ईश्वराने राज्य आणि पहिला राजा कसा आणि का निर्माण केला ?, यासंबंधीच्या **कथा** देखील आहेत. उदा. **महाभारताच्या** शांतीप्पर्वात भीष्माने एक कथा सांगितले आहे, तिचा सारांश असा की, राज्य आणि राजकीय सत्ता नसल्यामुळे सर्वत्र अराजकाची परिस्थिती निर्माण झाली होती. ही अराजकतेची स्थिती लोकांना असह्य वाटू लागली. ते ब्रह्मदेवाकडे गेले. त्याला लोकांनी विनंती केली की, आम्हाला एक राजा दे, आम्ही सगळे त्याचा आदर करू, त्याच्याबद्दल पुज्यभाव बाळगू. तो आमचे रक्षण करेल. ब्रह्मदेवाने प्रसन्न होऊन मनुला राजा म्हणून पाठविले. तो पृथ्वीवरचा पहिला राजा होय. तेव्हापासून राजा आणि राज्य दोन्हीही अस्तित्वात आले. राज्य उत्पत्तीच्या अशाच कहाण्या असंख्य धर्माच्या धर्मग्रंथातही सांगितलेल्या आढळतात. उदा. ख्रिस्ती धर्मीयांच्या **बायबल** ग्रंथातील नव्या करारात लोकांना असा स्पष्ट आदेश दिला आहे की, राज्यसत्ता ही ईश्वर निर्मित असल्यामुळे, तिच्या आदेशाचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे. राजाच्या आज्ञांचा उपमर्द करणे, म्हणजे ईश्वरांच्या आज्ञांची अवज्ञा करणे होय. हा अपराध करणाऱ्या सर्वांना त्यांची शिक्षा भोगण्यावाचून गत्यंतर नसते.

## समर्थकांची युक्तिवाद :-

राज्य आणि राज्यसत्तेच्या दैवी उत्पत्तीच्या सिद्धांताच्या आधारे राज्याच्या अमर्याद अधिकाराचे समर्थन करण्यात आले. विशेषतः मध्ययुगात पोप आणि सम्राट हे दोघेही स्वतःला परमेश्वराचा दुत मानत असत. त्यांच्यामध्ये स्पर्धा निर्माण झाली होती. **राजाची सत्ता श्रेष्ठ की, पोपची सत्ता श्रेष्ठ ?**, असा वाद त्या काळात उफाळून आला. या वादात सम्राटांचे पारडे पोपपेक्षा **श्रेष्ठ** ठरले. युरोपियन देशांमधील सम्राटांनी स्वतःला दैवी सत्तेचा धारक म्हणून घोषित करून टाकले. इंग्लंडमध्ये राजा आणि राणी आजही ईश्वर कृपेने त्या पदावर असल्याचे सांगितले जाते. सतराव्या शतकात इंग्लंडच्या स्टुअर्ट वंशातील प्रथम जेम्स या राजाने ‘राजा हा आपल्या सर्व कृतींसाठी ईश्वराला जबाबदार असतो. प्रजेला राजाने काय करावे आणि काय करू नये, याबाबतची चर्चा करण्याचा अधिकारच नाही.’ असे घोषित केले. राजा जर जुलमी, क्रूर आणि दुष्ट असेल तर ईश्वरानेच लोकांना शिक्षा देण्याच्या हेतूने तसे केले आहे, असे मानून लोकांनी राजाचा जुलूम निमूटपणे सहन करावा. त्याच्या सत्तेला विरोध करू नये. राजाची सत्ता उलथून टाकण्याचा विचारही करता कामा नये. या सिद्धांताने राजाच्या अमर्याद अधिकारांचे समर्थन केले आहे. काही ठिकाणी मात्र या सिद्धांताच्या पुरस्कारकर्त्यांनी राजाला निरकुंश सत्ता नाकारल्याची प्राचीन भारतात म्हटले जात असे.

## या सिद्धांताच्या ऱ्हासाची कारणे ;-

१) राज्याच्या उदयाच्या दैवी सिद्धांत औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळात मागे पडला. कारण **सामाजिक कराराचा सिद्धांत** मांडून विचारवंतांनी राज्य हे मानवनिर्मित आहे. हा विचार जनमानसात रुजविला.

२) जनतेचा आवाज हाच परमेश्वराचा आवाज आहे. म्हणजे **जनतेच्या सार्वभौमत्वाची** संकल्पना जनमानसात रुजू लागली.

३) अधिकाराच्या संदर्भात राजाविरुद्ध प्रजा असा संघर्ष युरोपियन देशांमध्ये निर्माण झाला. या संघर्षातून **लोकशाही तत्त्वज्ञानाची वाढ** झाली.

**४) धर्मसुधारणा चळवळी**तून राज्य आणि धर्म यांची परस्परांपासून फारकत करण्याच्या विचारांचा जोर वाढला. राज्य हे धर्मनिरपेक्ष आहे. हा विचार जनमानसात रुजू लागला.

## टीकात्मक परीक्षण :-

या सिद्धांताचे मूल्यमापन करताना टीकाकारांनी या सिद्धांतावर काही आक्षेप घेतले आहेत. उदा.

१) हा सिद्धांत निव्वळ **काल्पनिक** आहे. राज्य ईश्वरनिर्मित आहे यासंबंधीचा कोणताही **ऐतिहासिक पुरावा** नाही.

२) दैवी अधिकाराचा सिद्धांत राज्याची **उत्पत्ती कशी** झाली यासंबंधी फारसे बोलत नाही. तर तो राजाच्या निरकुंश सत्तेचे म्हणजे अमर्याद अधिकारांचे समर्थन करतो. ईश्वराच्या नावावर अन्याय, अत्याचाराचे समर्थन करणे म्हणजे **ईश्वर हा अत्याचारी व जुलमी आहे, असे म्हणणे होय**.

३) हा सिद्धांत **लोकशाही** तत्त्वांच्या पूर्ण **विरोधात** आहे. या सिद्धांताने प्रजेच्या कोणत्याही अधिकाराचे समर्थन केले नाही.

आजच्या काळात हा सिद्धांत चुकीचा आहे, असे समजले जाते. तरीही या सिद्धांताचे काही बाबतीत महत्त्वपूर्ण योगदान आहे हे मान्य करावे लागते. उदा. या सिद्धांताने अतिप्राचीन काळापासून लोकांना राजाच्या **आज्ञा पालन** करण्याची सवय लावली. या सवयीतूनच राजसत्तेला एक निश्चित रूप आले आणि महत्त्व प्राप्त झाले. पोप विरुद्ध सम्राट या संघर्षाच्या समाप्तीनंतरच **राष्ट्र- राज्याच्या निर्मितीला प्रारंभ** झाला. राष्ट्र- राज्याचे युग सुरू करण्यात या सिद्धांताचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते. राज्याच्या उत्पती संबंधीच्या **अचूक विचारांचा उदय व विकास** करण्यामध्ये या सिद्धांताची योगदान आहे, हे अमान्य करता येत नाही.

# राज्याच्या उत्पत्तीचा सामाजिक करार सिद्धांत

| विचारवंत → <br> ↓ मांडणी | हॉब्ज | लॉक | रुसो |
| --- | --- | --- | --- |
| **निसर्गावस्था** | मनुष्य हा स्वभावाने स्वार्थी, दृष्ट. अराजकता सदृश्य परिस्थिती,**बळी तो कानपिळी अवस्था.** | मनुष्य उदार व सद्गुणी मनुष्य सद्गुणाचा पुतळा, एकमेकांशी सहकार्य. **मनुष्य सुखी व समाधानी होता.** | मनुष्य हा स्वभावाने चांगला, निष्पाप निरागस परंतु कालांतराने खाजगी संपत्ती, लोकसंख्या वाढ आदी कारणाने **तुझे-माझे संघर्षा**ला सुरुवात. |
| **कराराची आवश्यकता** | दुःखी, एकाकी, अराजक **परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी**. | नियम तयार करणारी, नियमांचा अर्थ लावणारी, त्यांची अंमलबजावणी करणारी व न्यायदान करणारी **यंत्रणा नसल्यामुळे**. | तुझे माझे संघर्षामुळे माणसांमधील विविधता व विषमता वाढत गेली स्वातंत्र्य समता धोक्यात आली म्हणून **निसर्गावस्था टिकून राहावी म्हणून**. |
| **सामाजिक करार** | लोकांनी एकमेकांशी करार केला. तो पुढील प्रमाणे- **"मी माझ्यावर सत्ता गाजविण्याचा अधिकार 'क्ष' या व्यक्तीला किंवा व्यक्तीसमूहाला देण्यास तयार आहे, परंतु तू सुद्धा तसेच करावयास तयार असशील तर..."** | सर्वप्रथम लोकांनी **समुदाय** स्थापनेचा करार केला व नैसर्गिक हक्क समुदायाकडे दिले. त्यानंतर त्यांनी दुसरा करार **सरकारशी** केला. त्यांना कायदे करणे, अंमलबजावणी करणे व न्यायदान करणे, अशी कामे दिली. | अनेक व्यक्तींच्या एकत्र येण्यातून सामूहिक अस्तित्व साकार होते तिची सामूहिक इच्छाशक्ती म्हणजे '**सर्वसाधारण ईहा**' होय. या सर्वसाधारण ईहाला लोक आपले सर्व अधिकार देतात. |
| **सार्वभौम** | करारातून निर्माण झालेला सार्वभौम **निरंकुश** आहे. | करारातून निर्माण झालेला सार्वभौम **निरंकुश नाही**. सोपवलेली कार्य सार्वभौम करीत नसेल तर **सरकार बदलण्याचा अधिकार जनतेला**. | सर्वसाधारण ईहेला किंवा सार्वभौम सत्तेला सर्व अधिकार दिले. परंतु प्रत्येक व्यक्ती तिचा अविभाज्य घटक असल्यामुळे, ते व्यक्तीला परत मिळाले. **लोकांच्या सार्वमत्वाचा पुरस्कार.** |

## टीका/मर्यादा:-

1) समाज जीवनाचा विकास होत असताना इतिहास काळातील अमुक एखाद्या टप्प्यावर राज्य संस्था निर्माण झाली यासंबंधीचा कोणताही पुरावा नाही. त्यामुळे हा सिद्धांत म्हणजे विचारवंतांनी रंगवलेली **कल्पनाचित्रे** आहेत.
2) अधिकार, हक्क, कायदा, करार या सर्व गोष्टींचे अस्तित्व **केवळ प्रगत समाजातच शक्य** आहे. आदिम समाजात व्यक्तीचे स्थान हे तिच्या दर्जा नुसार निश्चित होत असे समाजात करारात्मक संबंध निर्माण होण्याची कोणतीही शक्यता वाटत नाही.
3) समाजाची प्रगती ही **दर्जा करून कराराकडे** झालेली आहे, असे मानसशास्त्रज्ञ म्हणतात. त्यामुळे सामाजिक करारातून राज्य स्थापन झाले असल्याची थोडीशी ही शक्यता वाटत नाही.
4) राज्याची स्थापना होण्यापूर्वीची **निसर्गवस्था** ही मानवी स्वभावाशी पूर्णतः **विसंगत** आहे त्यामुळे हा सिद्धांत **अनैतिहासिक** आहे असेच म्हणावे लागेल.
5) हॉब्ज म्हणतो, त्याप्रमाणे **राज्य आणि समाज एकाच वेळेस निर्माण झालेले नाही**. लॉकचे **मानवी स्वभावाचे वर्णन एकांगी** आहे. राज्य स्थापनेसाठी **दोन करार** झाले असे सांगून लॉक **गोंधळ** निर्माण करतो. रुसोने निसर्गवस्थेचे **काल्पनिक आणि अवास्तव** असे वर्णन केले आहे.

अशाप्रकारे तीनही विचारवंतांनी मांडलेल्या सामाजिक कराराच्या सिद्धांतात काही दोष आहेत.

## महत्व/योगदान:-

1) राज्यसंस्था ही **मानवनिर्मित** आहे हा विचार पक्का रुजवण्यामध्ये या सिद्धांताचे मोलाचे योगदान आहे.
2) सरकार आणि राज्यसंस्था ही **जनसंमतीवर** उभी असते. हे राज्यशास्त्रीय तत्त्व प्रस्थापित करण्यामध्ये या सिद्धांताचे मौलिक योगदान आहे.
3) जनतेचे स्वातंत्र्य व हक्क आणि जनसंमती यांना **मध्यवर्ती** स्थान मिळवून देण्यात या सिद्धांताचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

# राज्याच्या उत्पत्तीचा ऐतिहासिक किंवा विकासवादी सिद्धांत

राज्याच्या उत्पत्तीच्या **ऐतिहासिक** किंवा **विकासवादी** सिद्धांताला **उत्क्रांतीवादी** सिद्धांत किंवा **राज्य निर्मितीचा क्रमविकास** या नावानेही ओळखले जाते. दैवी सिद्धांत, शक्ती सिद्धांत, सामाजिक कराराचा सिद्धांत इत्यादी सर्व सिद्धांत राज्याच्या उत्पत्ती व उद्यासाठी **केवळ एकाच घटकाचा** उल्लेख करतात. *राज्यासारखी गुंतागुंत असणारी संस्था ही केवळ एकाच कारणामुळे निर्माण झालेली असावी, असे म्हणणे वास्तवतेला सोडून आहे.* तसेच राज्य सारखी गुंतागुंत असणारी संस्था ही **एका दिवसात** निर्माण झाली असावी असेही म्हणता येत नाही. ती निर्माण होण्यास ***दीर्घ कालावधी लागला*** आणि ती उत्क्रांत झालेली आहे. तसेच तिच्या उद्या मध्ये ***अनेक घटकांचे योगदान*** आहे. ते प्रतिपादन करणारा सिद्धांत म्हणजे **ऐतिहासिक किंवा विकासवादी सिद्धांत** होय. **उत्क्रांती म्हणजे संत गतीने वा हळूहळू होणारा विकास**. राज्याच्या उदयाची उत्क्रांती शोधतांना यासाठी जबाबदार असणाऱ्या सर्व घटकांचा परामर्श ऐतिहासिक सिद्धांताने घेतला आहे, असे म्हणता येईल.

## राज्यसंस्थेचा प्रारंभबिंदू : कुटुंब :-

**आज्ञापालनाची सवय** हे राज्याच्या निर्मिती होण्यामागचे एक *मूळ कारण* आहे. आज्ञापालनाच्या सवयीची सुरुवात **कुटुंबात** होते, हे लक्षात घेऊन अभ्यासकांनी राज्याच्या उदयाचा 'पितृसत्ताक सिद्धांत' आणि 'मातृसत्ताक सिद्धांत' असे दोन सिद्धांत मांडले. हे दोन स्वतंत्र सिद्धांत आहेत, असे म्हणण्यापेक्षा राज्यसंस्थेचा उदय होण्याच्या मुळाशी कोणत्या प्रकारचे कुटुंब होते, त्याचे स्पष्टीकरण हे सिद्धांत करतात, असे म्हणणे अधिक योग्य ठरते. रक्तसंबंध हा माणसांना एकमेकांशी जोडणारा पहिला बंद आहे. तो आपणास मातृसत्ताक आणि पितृसत्ताक अशा दोन्ही प्रकारच्या कुटुंबात आढळतो. म्हणून राज्यसंस्थेच्या उत्क्रांतीची व क्रमविकासाची चर्चा त्याच घटकापासून करणे इष्ट ठरते.

### 1. रक्तसंबंध :-

रक्तसंबंध समाज विकासाच्या प्रारंभिक अवस्थेत आपला पूर्वज एकच आहे, असे मानणारे लोक एकमेकांशी जोडले गेले होते. समान रक्तसंबंधाच्या आधारावर त्यांच्यामध्ये एकता होती. ते एकमेकांना मदत करीत असत आणि ज्येष्ठांच्या अज्ञानाचे पालन करीत असत. समान रक्तसंबंध नसणारी माणसे परकी आहेत, शत्रू आहेत. असे मानले जात असे. रक्ताच्या नात्याने एकत्र राहणारी माणसे एकदिलाने कुटुंबाची कामे करावयाची व शिस्त पाडायची. सभासदसंख्या वाढल्यानंतर एका कुटुंबाचे अनेक कुटुंबसमूह अस्तित्वात आले. अनेक कुटुंब समूहाचे कुळ बनले, अनेक कुळांची मिळून टोळी किंवा जनजात तयार झाली. कुटुंब,कूळ, टोळी, जनजाती या सर्वांच्या मुळाशी रक्तसंबंधांचा आधार आहे.

रक्तसंबंधामुळे सर्वात वयोवृद्ध व्यक्ती टोळीचा प्रमुख बनत असे. त्याच्या आज्ञांचे पालन टोळीतील सर्व लोक करीत असत. रक्तसंबंधाच्या बंधातून परस्पर अधीनता आणि एकतेची भावना प्रबळ बनली. जी राजकीय जीवनासाठी आवश्यक होती, असे गेटेलने म्हटले आहे. रक्तसंबंधातून प्रारंभिक अवस्थेतील समाजाची रचना झाली आणि त्या समाजातून राज्याची निर्मिती झाली.

## 2) धर्म व जादू:-

प्राचीनकाळी एकतेची वीण घट्ट करण्याच्या कामी धर्म उपयुक्त ठरला. एकाच धर्माचे अनुयायी धर्मबंधू या नात्याने एकमेकांशी जोडले जातात. प्रारंभी धर्माचे स्वरूप निसर्ग पूजेचे होते. नैसर्गिक शक्तींना संतुष्ट करण्यासाठी मानवाने त्यांची पूजा अर्चना सुरू केली. ती करण्याच्या निमित्ताने अनेक टोळ्या एकत्र येत असत. त्यातून गाववस्त्या उभ्या राहिल्या. थोडक्यात समाज विकासाच्या प्रारंभिक अवस्थेत लोकांना संघटित करून त्यांना आज्ञानाचे पालन करण्यास बाध्य करणारा धर्म हा महत्त्वाचा घटक ठरतो.

धर्माप्रमाणेच जादू-टोण्याचे देखील राज्याच्या विकासात महत्त्वाचे योगदान आहे. जादूगाच्या आज्ञांचे पालन भिती-पोटी होत असे. त्याला विरोध करण्याचे साहस कोणी करीत नसे. जादूगार,मांत्रिक यांच्या हाती समाजाची सत्ता एकवटलेली होती. काही ठिकाणी जादूगारच त्या ठिकाणचा शासक बनला. त्याच्या आज्ञानाचे पालन करण्याची सवय लोकांना लागते. ‘जादूगारांचा राजा बनने अत्यंत सोपे होते कारण ऐहिक आणि पारलौकिक क्षेत्रात तो सर्वश्रेष्ठ आहे असे मानले जात असे.

## 3)शक्ती :-

दुर्बलांना आपल्या अधीन ठेवून त्यांच्यावर सत्ता गाजवणे ही मानवी प्रवृत्ती आहे. समाज विकासाच्या प्रारंभिक अवस्थेत ही प्रवृत्ती मोठ्या प्रमाणावर होती. या प्रवृत्तीतूनच युद्धाचा उदय झाला. अनेक टोळ्यांना एकत्रित करून त्यांचा एक विशाल आकाराचा समूह निर्माण करण्याचा एक मार्ग म्हणजे युद्ध होय. सामर्थ्यशाली सेनापती किंवा टोळ्यांच्या सामर्थ्यातून राज्याची निर्मिती झाली आहे. ‘युद्धकलेत झालेली उन्नती हेच राज्यांचा उत्पत्तीचे खरे कारण आहे’, असे जॅक्शनने म्हटले आहे.

**4)राजकीय जाणीव-जागृती :-**

रक्तसंबंध आणि धर्म यांनी एकता निर्माण केलेल्या समाजात राजकीय जाणीव-जागृतीचा उदय आणि विकास झाला नसता तर राज्यसंस्थेचे निर्मिती होऊ शकली नसती. शांतता व सुव्यवस्था टिकावी, प्रत्येकाला जीवित-वित्ताची हमी मिळावी, बाह्य आक्रमणापासून संरक्षण व्हावे, यासाठी सुसंघटीत राजकीय यंत्रणा असावी. यासारख्या गरजा जनमानसात निर्माण झाल्या. या गरजेतूनच राज्याचा जन्म झाला. कदाचित शेजारच्या टोळीने केलेल्या आक्रमणाच्या प्रसंगी पराक्रम करून आपल्या टोळीचा बचाव करणाऱ्या वीर पुरुषाला लोकांनी आपला 'राजा' म्हणायला सुरुवात केली असल्याची शक्यता आहे. सुसंघटीत जीवन जगण्यासाठी लोकांनी 'राजा' सोबत सहकार्य करण्याची भूमिका घेतली. त्यामुळे हळूहळू राज्याचा विकास होऊन ते स्थिर बनले.

**5)आर्थिक गरजा :-**

लोकसंख्येत वाढ आणि सभ्यतेचा विकास या दोन कारणांमुळे लोकांच्या गरजांमध्ये वाढ झाली. या गरजा भागवण्यासाठी विभिन्न उद्योग-व्यवसाय निर्माण झाले. परस्पर सहकार्याच्या आधारावर अनेक प्रकारचे आर्थिक व्यवहार संपन्न होऊ लागले. उत्पादन, विक्री इत्यादी क्षेत्रात लोकांमधील आर्थिक सहकार्य कायम ठेवण्यासाठी आर्थिक व्यवहारांचे नियमन व नियंत्रण करण्याची गरज निर्माण झाली. या गरजेतून राज्यसंस्थेला अधिक बळकटी देण्याचे प्रयत्न सुरू झाले.गेटेलने म्हटल्याप्रमाणे, "आपल्या मूलभूत गरजा भागवण्यासाठी आर्थिक प्रयत्न आणि संपत्तीचा संचय या दोन बाबी राज्याच्या निर्मितीसाठी कारणीभूत ठरल्या आहेत."

**टीका/मर्यादा:-**

1) राज्य निर्मितीच्या कारणांचा निश्चित क्रम कोणता या संबंधी विचारवंतामध्ये मतभेद आहेत.
2) राज्य उत्क्रांत होत गेला. यासंबंधीचा कोणताही पुरावा नाही. त्यामुळे हा सिद्धांत काल्पनिक आहे.

**महत्व/योगदान:-**

1) राज्यसंस्था ही विविध घटकामुळे निर्माण झाली व ती एकाच वेळेस निर्माण झाली नाही. हा विचार पक्का रुजवण्यामध्ये या सिद्धांताचे मोलाचे योगदान आहे.
2) राज्यसंस्थेच्या क्रम विकासातून माणसाचे सामाजिक जीवन सुसंघटीत, सुनियंत्रित व सुरक्षित झाले,हे या सिद्धांताने दाखवून दिले, असे म्हणता येईल.

# गोविंदराव वारजूकर महाविद्यालय, नागभीड

## राज्यशास्त्र विभाग

# राजकीय सिद्धांत

B.A. भाग 2 (सेम.iii)

युनिट 3

प्रा.मंगेश टी.देवढगले

युनिट 3

# सार्वभौमसत्तेचे सिद्धांत

## सार्वभौमत्व :-

'**सार्वभौमत्व**' हा राज्याचा महत्त्वाचा घटक आहे. सार्वभौमत्वाशिवाय राज्य अस्तित्वात येऊ शकत नाही. प्लेटो, ऑरिस्टाटल आणि त्याच्याही पूर्वकाळातील राज्यशास्त्रीय लिखाणात सार्वभौमत्वाविषयीचे विचार आढळून येतात. या संकल्पनेची शास्त्रशुद्ध मांडणी **जीन बोदाँ** या फ्रेंच विचारवंताने मांडली, त्यामुळे त्याला या संकल्पनेचा **जनक** म्हटल्या जाते. इंग्रजी भाषेतील **'साव्हरेनटी'** या राज्यशास्त्रीय संकल्पनेसाठी मराठीत सार्वभौमत्व किंवा सार्वभौमसत्ता या संज्ञेनेचा उपयोग केला जातो. लॅटिन भाषेतील **'सुपरनॅस'** या शब्दापासून 'साव्हरेनटी' हा शब्द तयार झाला आहे. 'सुपरनॅस' या शब्दाचा मूळ अर्थ **सर्वश्रेष्ठ** असा आहे. राज्यशास्त्रीय संदर्भात **राज्याची अंतिम आणि सर्वश्रेष्ठ किंवा सर्वोच्च सत्ता** या अर्थाने सार्वभौमत्व ही संज्ञा वापरली जाते. समाजात कुटुंबसंस्था, धर्मसंस्था यासारख्या अनेक संस्था असल्या तरीही राज्यसंस्थे खेरीज अन्य कोणत्याही संस्थेच्या ठिकाणी सार्वभौमत्व ही सत्ता असू शकत नाही, असे सैद्धांतिक दृष्टीने राज्यशास्त्रात म्हटले जाते. राज्यसंस्थेचे सार्वभौमत्व हे अंतर्गत आणि बाह्य अशा दोन्हीही क्षेत्रात असते.

## अंतर्गत सार्वभौमत्व :-

अंतर्गत सार्वभौमत्व म्हणजे **राज्यांतर्गत बाबतीत राज्याची सत्ता ही अंतिम आणि सर्वोच्च असणे** असा अर्थ आहे. राज्यापेक्षा आपण श्रेष्ठ आहोत असा दावा कोणीही व्यक्ती, संस्था व संघटना करू शकत नाही. राज्याच्या सीमेंतर्गत असणाऱ्या सर्व व्यक्ती आणि वस्तू यांच्यावर **अंतिम अधिकार** राज्याचा असतो. थोडक्यात भूप्रदेशीय सीमेत असणाऱ्या सर्व व्यक्ती, समूह, संघटना आणि संस्था यांच्यावर **नियंत्रण ठेवण्याचा, त्यांना आदेश देण्याचा आणि त्या आदेशांचे पालन करावयास भाग पाडण्याचा** अधिकार राज्याला असतो. म्हणून राज्य हे अंतर्गतदृष्ट्या सार्वभौम असते. असे मानले जाते.

## बाह्य सार्वभौमत्व :-

राज्याचे सीमेबाहेर असणाऱ्या कोणत्याही सत्तेचे किंवा राष्ट्रराज्याचे राज्यावर नियंत्रण नसणे म्हणजे बाह्य सार्वभौमत्व होय. सोप्या शब्दात **एका स्वतंत्र आणि सार्वभौम राज्याला त्याच्या इच्छेविरुद्‌ध वागवयास कोणीही भाग पाडू शकत नाही.** प्रत्येक राज्याला अन्य राष्ट्रांशी कोणते करार करावयाचे ? किंवा कोणते धोरण ठेवायचे ?, हे ठरवण्याचा पूर्ण स्वातंत्र्य असते. म्हणून संरक्षणासाठी युद्‌ध घोषित करण्याचा किंवा शांततेचा करार करण्याचा अधिकार प्रत्येक स्वतंत्र व सार्वभौम राज्याला आहे, असे मानले जाते. आंतरराष्ट्रीय तह किंवा करार, आंतरराष्ट्रीय कायदा व आंतरराष्ट्रीय संघटनेचे सदस्यत्व यामुळे राज्याच्या बाह्य सार्वमत्वाला कोणतीही बाधा येत नाही, कारण अशी **बंधने राज्याने स्वेच्छेने स्वीकारलेली** असतात.

## व्याख्या :-

1) **बोदाँच्या** मते,

"कायद्‌याने अनिर्बंध असणारी आणि सर्व नागरिक व प्रजाजन यांच्यावर चालणारी सर्वोच्च सत्ता म्हणजे सार्वभौमत्व होय."

2) **ड्यूग्वीच्या** मते,

"सार्वभौमत्व म्हणजे राज्याची आज्ञा देण्याची सत्ता होय. राज्य म्हणून संघटित झालेल्या राष्ट्रांची ती इच्छाशक्ती असते. राज्याच्या प्रादेशिक क्षेत्रात सर्व व्यक्तींना आदेश देण्याचा तो निरपवाद अधिकार होय."

3) **जेलीनेकच्या** मते,

"सार्वभौमत्व ही राज्याची अशी सत्ता आहे की, जिच्यामुळे राज्याला त्याच्या स्वतःच्या इच्छेव्यतिरिक्त इतर कोणतीही वैचारिक बंधने नसतात आणि तिच्या स्वतःच्या शक्तीशिवाय इतर कोणत्याही शक्तीने ती सीमित करता येत नाही."

4) **विलोबीच्या** मते,

"राज्याची सर्वोच्च इच्छाशक्ती म्हणजे सार्वभौमत्व होय."

# सार्वभौमत्वाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये

**1)निरंकुशता :-**

सार्वभौमसत्ता ही निरंकुश असते. तिच्यावर **नियंत्रण ठेवू शकेल अशी दुसरी कोणतीही शक्ती वा सत्ता जगाच्या पाठीवर कोठेही नाही.** राज्यांतर्गत आणि राज्याच्या बाहेर सार्वभौमसत्तेवर नियंत्रण ठेवू शकेल अशी अन्य कोणतीही सत्ता नसेल तर त्याला सार्वभौम सत्तेची निरंकुशता असे म्हणतात. निरंकुशता सार्वभौमसत्तेचे एक आवश्यक लक्षण आहे, असे मानले जाते. दुसरी कोणतीही शक्ती वा सत्ता असेल तर ती अंतिम आणि निरंकुश असू शकत नाही. सार्वभौमसत्तेबाबत निरंकुशतेच्या तत्त्वाचा पुरस्कार करणारा हॉब्ज हा पहिला विचारवंत होय. सार्वभौमसत्तेवर जी काही बंधने दिसून येतात, ती तिने स्वतः मान्य केलेली किंवा लादून घेतलेली असतात. त्यामुळे ती झुगारून देणे केव्हाही शक्य असते. केवळ वैधानिक किंवा कायद्याच्या दृष्टीने विचार केला तर सार्वभौसत्तेला निरंकुश असते हे भूमिका अगदी बिनचूक आहे, परंतु प्रत्यक्ष व्यवहारात राज्यसंस्थेच्या सार्वभौमत्वावर अनेक बंधने असतात. उदा. परंपरा, नैतिक नियम, धार्मिक विश्वास व मान्यता यांचे पालन सार्वभौमसत्तेलासुद्धा करावेच लागते. आंतरराष्ट्रीय लोकमताचा रेटा आणि आंतरराष्ट्रीय कायद्यातील तरतुदी यांच्यामुळे सार्वभौमत्वाच्या मनाला वाटेल तसे वर्तन करण्यावर बंधने व मर्यादा येतात. तसेच जागतिकीकरणाच्या युगात आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रामुख्याने आर्थिक क्षेत्रातील परिस्थितीशी प्रत्येक राज्याच्या सार्वभौमत्वाला जुडवून घ्यावे लागत आहे, ‘संयुक्तराष्ट्र’ या आंतरराष्ट्रीय संघटनेचे महत्त्व वाढले आहे. दोन्ही क्षेत्रात राज्याच्या सार्वभौमत्ववर अनेक मर्यादा आल्या आहेत, असे व्यवहारिक स्तरावर म्हणता येते.

**2)सार्वत्रिकता किंवा सर्वव्यापकता :-**

सार्वभौमसत्ता सर्वव्यापी असते. याचा अर्थ असा की, **राज्यातील सर्व व्यक्ती, समूह, संघटना, संस्था आणि वस्तू राज्यसंस्थेच्या नियंत्रणाखाली असतात.** राज्याच्या नियंत्रणातून मुक्त होण्याचा अधिकार मिळावा, अशी मागणी कोणतीही व्यक्ती, संघटना व संस्था करू शकत नाही. राज्याला आवश्यक वाटेल तेव्हा, ते कोणत्याही व्यक्तीचे वर्तन नियंत्रित करू शकते किंवा संघटनेच्या कार्यावर बंदी आणू शकते. त्याविरुद्ध अन्य कोणत्याही सत्तेकडे कोणीही दाद मागू शकत नाही.

विदेशी दुतावासातील प्रतिनिधी म्हणजे अन्य राष्ट्रांनी नियुक्त केलेले राजनैतिक प्रतिनिधी याला अपवाद असतात आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील परंपरेनुसार निबंध देशांचे राजनैतिक प्रतिनिधी आपापल्या देशाच्या सर्व सत्तेखाली कार्यरत असतात असे मानले जाते अन्य देशाने नियुक्त केलेल्या एखाद्या प्रतिनिधीचे वर्तन मान्य नसेल तर त्याला परत बोलवण्यात यावे असे मागणीचे राष्ट्र संबंधित देशाकडे करू शकते किंवा त्या राजनैतिक प्रतिनिधीला त्याच्या देशात परत पाठवू शकते अगदी शेवटचा उपाय म्हणून त्या देशाशी संबंधही तोडू शकते त्यामुळे हा अपवाद सार्वमत्वाच्या सार्वत्रिक किंवा सर्वव्यापी तत्त्वाला बाधा बाबत ठरू शकत नाही असे म्हणता येते.

### 3) अदेयता :-

राज्य स्वतःची सार्वभौमसत्ता कोणालाही हस्तांतरित करू शकत नाही. सार्वभौमत्व हे अदेय असते. याचा अर्थ असा की, **राज्य आपली अंतिम सत्ता कोणालाही देऊ शकत नाही.** या तत्त्वाच्या संदर्भात लायवर म्हणतो की, “ज्याप्रमाणे एखादा वृक्ष आपला फळाफुलांनी बहरण्याचा हक्क सोडू शकत नाही किंवा एखादा मनुष्य आपले जीवन आणि व्यक्तिमत्त्वाचा अधिकार स्वतःला नष्ट केल्याशिवाय सोडू शकत नाही, त्याचप्रमाणे सार्वभौम सत्तेला राज्यापासून वेगळे करता येत नाही.

### 4) अविभाज्यता :-

सार्वभौमसत्ता जशी दुसऱ्याला देता येत नाही, त्याचप्रमाणे तिचे **विभाजन ही करता येत नाही**. तिच्या विभाजनामुळे एकापेक्षा जास्त सार्वभौम राज्य निर्माण होतात. एका भागावर एकच सार्वभौम राज्य असू शकतो. कोव्हनच्या मते, “सार्वभौमसत्ता ही पूर्ण वस्तू आहे, तिचे विभाजन करणे म्हणजे तिला नष्ट करणे होय.” सार्वभौमसत्ता ही अविभाज्य असते हे अनेकसत्तावाद्यांना मान्य नाही.

### 5) स्थायित्व :-

सार्वभौमत्व स्थायी असते. **जोपर्यंत राज्य अस्तित्वात आहे, तोपर्यंत सार्वभौमसत्ता कायम राहते**. राज्य नष्ट झाले तर सार्वभौमसत्ता नष्ट होते. अशा प्रसंगी ती नवीन राज्याकडे जाते. निवडणुका, राजीनामा, मृत्यू यासारख्या कारणामुळे राज्यकर्त्यांमध्ये बदल होऊ शकतो, परंतु सार्वभौमत्व कायम असते. ते नव्या राज्यकर्त्यांकडे जाते. राज्यकर्ते वा शासनकर्ते हे राज्यसंस्थेच्यावतीने सार्वभौमसत्ता चालवतात. ते राज्यसंस्थेचे एजंट असतात. शासनकर्त्यामध्ये होणारा बदल हा व्यक्तिमधला बदल असतो. त्याचा राज्याच्या स्वातंत्र्यावर कोणताही परिणाम होत नाही.

### 6) मौलिकता :-

सार्वभौमसत्तेचे मौलिकता हे एक वैशिष्ट्य आहे. याचा अर्थ ती एखाद्या व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून निर्माण केली जात नाही. ती **स्वनिर्मित** असते. ही मौलिकताच सार्वभौमसत्तेला सर्वश्रेष्ठत्व प्राप्त करून देते.

# सार्वभौमत्वाचे प्रकार

## 1) नामधारी सार्वभौमत्व आणि खरे सार्वभौमत्व :-

ज्या देशांमध्ये **राष्ट्रप्रमुख** आणि **शासनप्रमुख** अशी दोन वेगवेगळी पदे असतात, तेथे सार्वभौमत्वाचे हे दोन प्रकार निर्माण होतात. उदा. इंग्लंड आणि भारतात अशा प्रकारचा भेद आहे. इंग्लंडचा राज्यकारभार राजाच्या नावाने सुरू असतो तर भारतात राष्ट्रपतीच्या नावाने सुरू असतो. सरकारद्वारे काढण्यात येणारी अधिसूचना राष्ट्रपतीच्या नावाने व शिक्क्याने प्रसिद्ध होत असते. राष्ट्रपती राष्ट्रप्रमुख असल्यामुळे त्याला राज्यकारभार चालवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचा अधिकार आहे. भारतीय संविधानाने संपूर्ण सत्ता राष्ट्रपतीला सोपवली आहे, परंतु प्रत्यक्षात तो सत्तेचा वापर करू शकत नाही. अशीच स्थिती इंग्लंडच्या राजाची आहे. **इंग्लंडचा राजा** आणि **भारताचे राष्ट्रपती** हे नामधारी सार्वभौम आहेत. भारतात राष्ट्रपतीच्या सर्व अधिकारांचा वापर पंतप्रधान आणि त्यांच्या नेतृत्वाखाली असणारे मंत्रिमंडळ करीत असते. मंत्रिमंडळाचे कामकाज पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली सुरू असते, म्हणून **पंतप्रधान** आणि **त्यांचे मंत्रिमंडळ** हे खरे सार्वभौम ठरतात. भारतासारखीच स्थिती इंग्लंडमध्ये ही आहे. तेथे प्रत्यक्ष अधिकार वापरणाऱ्या मंत्रिमंडळाला खरे सार्वभौम मानले जाते. नामधारी सार्वभौम असणाऱ्या राष्ट्रपतीचे पद किंवा इंग्लंडच्या राज्याची पद हे सत्तेपेक्षा सन्मानाचे आणि प्रतिष्ठेचे मानले जाते.

## 2) वैधानिक सार्वभौमत्व आणि राजकीय सार्वभौमत्व :-

लोकशाही राज्यव्यवस्थेत वैधानिक सार्वभौमत्व आणि राजकीय सार्वमत्व असे दोन प्रकार केले जातात. लोकशाही व्यवस्थेत कायदे करण्याची सत्ता काही व्यक्तींच्या किंवा एखाद्या संस्थेच्या हाती सोपवलेली असते. त्यांनी दिलेल्या आज्ञा व आदेशांना कायद्याचे स्वरूप प्राप्त होत असते. रूढी, परंपरा धार्मिक श्रद्धा, लोकाचार या सर्वांपेक्षा वरचे स्थान कायद्यांना असते. कारण कायदे कोणत्याही प्रथा, परंपरा, लोकाचार या सर्वांमध्ये कालसापेक्ष असा बदल घडवून आणू शकतात. भारतात **राष्ट्रपती आणि संसद** हे वैधानिक सार्वभौम आहेत. इंग्लंडमध्ये **राजा आणि पार्लमेंट** हे वैधानिक सार्वभौम आहे. अमेरिकेत **अध्यक्ष आणि काँग्रेस** या नावाने संबोधले जाणारे कायदेमंडळ हे वैधानिक सार्वभौम आहेत. वैधानिक सार्वभौमसत्ता एखादी व्यक्ती, समूह किंवा संस्थेत निहीत असते. ती सुसंघटीत, स्पष्ट आणि कायद्याने मान्य झालेली असते. वैधानिक सार्वभौमत्वाच्या आज्ञा न पाळणे, हे कायद्याची उल्लंघन होय, असे मानले जाते. त्यासाठी त्याला शिक्षा देण्याची व्यवस्था केलेली असते. राज्यसंस्थेची ईहा(इच्छा) कायदेशीर भाषेत व्यक्त करण्याचा अधिकार वैधानिक सार्वभौमत्वाला असतो. वैधानिक सार्वभौमत्व अन्य व्यक्ती आणि संस्था यांचे अधिकार वैधानिक सार्वभौमत्वाद्वारे ठरवून दिले जातात.

लोकशाही राज्यव्यवस्थेत अंतिम सत्ता लोकांच्या हाती असते. लोकशाहीत जनताच सार्वभौम आहे, असे मानले जाते. जनतेने काही काळासाठी आपली सत्ता वैध सार्वभौम सत्तेच्या हाती सोपवलेली असते. वैध सार्वभौम सत्ता जेव्हा कायदे करते आणि त्यांची अंमलबजावणी करते, तेव्हा तिच्या पाठीशी असलेल्या लोकांच्या अधिसत्तेला **राजकीय सार्वभौमत्व** असे म्हटले जाते. राज्यांमधील अन्य सर्व सत्तांच्या मूलस्त्रोत राजकीय सार्वभौमसत्ता असते, असे वर्णन करता येत असले, तरीही त्याची निश्चित अशी व्याख्या करता येत नाही. कारण राजकीय वैध सार्वभौमसत्तेचे स्वरूप अत्यंत संधिग्ध आणि अनिश्चित असते.

### 3) जनतेचे सार्वभौमत्व आणि राष्ट्राचे सार्वभौमत्व :-

राजकीय सार्वभौमत्वाच्या कल्पनेतून आपण जनतेचे सार्वभौमत्व या संकल्पनेकडे येतो. लॉक व रुसो यांनी ‘सामाजिक कराराचा सिद्धांत’ मांडताना जनतेच्या सार्वभौमत्वाचे समर्थन केले होते. अमेरिकेच्या स्वातंत्र्य युद्धात जेफर्सनने देखील जनतेच्या सार्वभौमत्वाचा जोरदार पुरस्कार केला होता. राज्यसंस्थेची **सार्वभौमसत्ता अंतिमतः कोणाच्या हाती असते?** या प्रश्नाचे उत्तर लोकशाहीत एकच असते, ते म्हणजे **जनतेच्या हाती** असते. ठराविक मुदत संपल्यानंतर होणाऱ्या निवडणुकीत जनता सत्तांतर घडवून आणू शकते. सत्तारूढ शासनकर्त्यांच्या हाती सत्तेची सूत्रे पुन्हा सोपवायची की, त्यांच्या जागी दुसऱ्या व्यक्तींची शासनकर्ते म्हणून निवड करायची, याबाबतची अंतिम सत्ता जनतेकडे असते. म्हणून लोकशाही राज्यव्यवस्थेत जनता सार्वभौम असते, असे म्हटले जाते. राजकीय सार्वभौमत्वाप्रमाणे जनतेच्या सार्वभौमत्वाची निश्चित व्याख्या करणे अवघड आहे. संपूर्ण जनसमुदायाला सार्वभौम मानायचे की, फक्त मतदार वर्गाला सार्वभौम मानायचे ?, असा प्रश्न निर्माण होतो. या प्रश्नाचे निश्चित उत्तर देणे अवघड आहे. सूत्ररूपाने जनतेच्या सार्वभौमत्वाचे वर्णन पुढील प्रमाणे करता येईल. शासनाच्या सत्तेवर जनतेचा अंकुश असेल तर व्यक्तीच्या स्वतंत्र्याला काही अर्थ राहतो. जनतेच्या मागण्या, अपेक्षा यांच्याकडे सातत्याने दुर्लक्ष करून शासनकर्ते जनकल्याण ऐवजी केवळ स्वतःच्या स्वार्थालाच महत्व देत असतील, तर क्रांती होण्याची शक्यता असते. राज्यकर्त्यांच्या धोरणांना आणि निर्णयाला जनतेचा पाठिंबा आहे की, विरोध आहे. हे समजून घेण्यासाठी लोकमतच्या मुक्त आविष्काराला वाव असला पाहिजे. नियमित निवडणुका, स्थानिक स्वराज्य शासन, जनमतदर्शन इत्यादी मार्गाने शासनाच्या सत्तेवर अंकुश ठेवणे जनतेला शक्य होते. ज्या देशात प्रौढ मताधिकाऱ्याच्या तत्त्वाचा स्वीकार करण्यात आला नसेल, तिथे जनतेचे सार्वभौमत्व यात तत्वाला काहीच अर्थ राहत नाही. परंतु लोकशाही व्यवस्था नसणाऱ्या राज्यात निरंकुश राजा हा सार्वभौमसत्तेचा धारक असतो, असे मानले जात नाही, तर **संपूर्ण राष्ट्रच** ती सत्ता धारण करू शकते, हे सुचित करण्यासाठीचे **राष्ट्राचे सार्वभौमत्व** ही संकल्पना मांडण्यात आली. राष्ट्राचे सार्वभौमत्व ही संकल्पना फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात मांडण्यात आली होती. आजच्या काळात राष्ट्राचे सार्वभौमत्व ही संकल्पना पूर्णपणे इतिहास जमा झाली आहे. जगातल्या सर्वच देशांमध्ये प्रौढ मताधिकाराच्या तत्त्वाचा स्वीकार करण्यात आला असल्यामुळे राष्ट्राचे सार्वभौमत्व या संकल्पनेचे व्यवहारातील महत्त्व संपले आहे.

## 4) विधीमय सार्वभौमत्व आणि वास्तविक सार्वभौमत्व :-

**कायद्याने मान्य असलेली आणि कायद्याच्या आधारे राज्यात सर्वश्रेष्ठ ठरणारे सर्व सत्ता म्हणजे विधीमय सार्वभौमसत्ता होय.** परंतु देशात जेव्हा क्रांती होते, तेव्हा राज्यकर्त्यांच्या सत्तेला आव्हान देणाऱ्या शक्ती उभ्या राहतात. तेव्हा सार्वभौमत्वाचे हे दोन प्रकार अस्तित्वात येतात. कारण मोठ्या प्रमाणावर लोक क्रांतिकारकांच्या सांगण्या बरहुकूम वागत असतात. कायद्याच्या दृष्टीने जुने राज्यकर्ते सार्वभौम असतात, म्हणजे राज्यात विधीमय सार्वभौमत्व असतो परंतु मोठ्या प्रमाणावर लोक विधीमय सार्वभौमत्वाच्या आज्ञांचे पालन करणे ऐवजी **क्रांतिकारकांनी दिलेल्या आज्ञा आणि आदेश पालन करीत असतात. म्हणून क्रांतिकारकांच्या सत्तेला वास्तविक सार्वभौम सत्ता असे संबोधले जाते.** कोणत्याही राज्यात जुन्या व प्रस्थापित राज्यकर्त्यांचे विधीमय सार्वभौमत्व आणि क्रांतिकारकांचे वास्तविक सार्वभौमत्व हे दोन्ही प्रकार फार दीर्घकाळ टिकून राहू शकत नाही. मोठ्या प्रमाणावर जनतेचा पाठिंबा असल्यामुळे क्रांतिकारकांची सत्ता काही काळानंतर त्या राज्याची विधीमय सार्वभौम सत्ता होण्याची शक्यता असते. उदा. 1949 मध्ये चीनमध्ये च्यांग कै शेकची सत्ता ही विधीमय सार्वभौम सत्ता होती. परंतु बहुतांश लोक च्यांग कै शेकच्या आज्ञांचे पालन करणे ऐवजी क्रांतिकारकांचे नेते माओच्या आज्ञांचे पालन करीत होते. शेवटी 1949 मध्ये माओच्या नेतृत्वाखाली साम्यवादी पक्षाची राजवट सुरू झाली. 1971 मध्ये त्या काळातील पूर्व पाकिस्तानात म्हणजे आजच्या काळातील बांगलादेशात शेख मुजबूर रहमान यांना बांगलादेशाचे विधीमय सार्वभौमत्व प्राप्त झाले.

आस्टीनसारख्या काही लेखकांना विधीमय आणि वास्तविक सार्वभौम सत्ता हा भेद मान्य नाही. त्याच्यामध्ये राज्यामधील सरकार हे विधिमयही नाही तर वास्तविक असू शकते. परंतु सार्वभौमसत्तेसाठी विधीमय आणि वास्तविक या शब्दांचा उपयोग करणे योग्य नाही, कारण प्रत्येक देशात शांतता आणि सुव्यवस्था टिकवणे ठेवण्यासाठी सर्वश्रेष्ठ सत्ता असणे आवश्यक ठरते. बहुसंख्य लोक ज्या सत्तेच्या आज्ञांचे पालन करतात ती सार्वभौम सत्ता सर्वश्रेष्ठ असते. मग ती वैधानिक असो की नसो. आस्टीनच्या मते, ज्याने आज्ञा पालन मिळवण्याची शक्ती गमावली, तो सार्वभौम उरतच नाही. **ज्याच्या आज्ञांचे पालन बहुसंख्य लोक आपण होऊन करतात, तो त्या क्षणीच सार्वभौम होतो. म्हणून सार्वभौम सत्तेला वास्तविक आणि विधीमय अशी दोन लेबले लावणे पूर्णपणे निरर्थक आहे.**

# सार्वभौमसत्तेचे सिद्धांत

## ऑस्टीनचा सार्वभौमत्वाचा सिद्धांत किंवा सार्वभौमसत्तेचा एकतावादी सिद्धांत :-

हा सिद्धांत सार्वभौमसत्तेचा एकतावादी सिद्धांत आणि ऑस्टीनचा सिद्धांत या दोन्ही नावांनी ओळखला जातो. जॉन ऑस्टीन हा इंग्लंडमधील कायद्याचा अभ्यासक व न्यायपंडित. त्याने 1832 मध्ये लिहिलेल्या न्याय शासनावरील व्याख्याने (लेक्चर्स ऑन ज्यूरिस्प्रुड) या ग्रंथात हा सिद्धांत मांडला. इंग्लंडमधील कायद्याच्या क्षेत्रात असलेली अव्यवस्था दूर करून कायद्याची घडी नीट बसवणे, हा त्याच्या ग्रंथलेखनामागील प्रमुख हेतू होता. ब्रिटिश समाजाच्या मानगुटीवरून रुढीचे ओझे काढून टाकावे, असे झाले तरच कायद्याच्या क्षेत्रात असलेली अव्यवस्था दूर होऊन केवळ लिखित स्वरूपातील कायद्यालाच महत्त्व प्राप्त होऊ शकेल, असे ऑस्टीनला वाटत होते. ब्रिटिश समाजात एकात्म आणि संघटित स्वरूपाची अधीसत्ता असावी. या अधीसत्तेने केलेल्या आज्ञा मधून समाजाची विधीव्यवस्था उभी रहावी, अशी ऑस्टीनची इच्छा होती. सार्वभौमत्वाचा एकतावादी सिद्धांत मांडून त्याने हीच गोष्ट साध्य करण्याचा प्रयत्न केला. राज्यशास्त्राच्यादृष्टीने सार्वभौमत्वाचे मुद्देसूद आणि शास्त्रशुद्ध स्वरूपाची मांडणी सर्वप्रथम ऑस्टीनने सिद्धांत मांडून केली, असे म्हणता येईल.

### सिद्धांताची मांडणी :-

ऑस्टीन राज्याला **‘स्वतंत्र राजकीय समाज’** या नावाने संबोधतो. त्या समाजात एक निश्चित व्यक्ती किंवा व्यक्तीसमूह सार्वभौम असतो. **सार्वभौमाने दिलेल्या आज्ञा हाच कायदा असतो, आणि त्याचे पालन बहुसंख्य लोक स्वाभाविकपणे करतात.** सार्वभौम असणारे व्यक्ती किंवा व्यक्तीसमूह अन्य कोणाच्याही आज्ञा पाडत नाही. तो केवळ आज्ञा देण्याचेच कार्य करतो, असे ऑस्टीनचे म्हणणे आहे. सार्वभौम कोणास म्हणावे?, या प्रश्नाचे ऑस्टीनने दिलेले उत्तर पुढील प्रमाणे आहे, ऑस्टीन म्हणतो, **‘ज्याला आपल्यासारख्या दुसऱ्या श्रेष्ठीच्या आज्ञा पाळण्याची सवय नसेल पण त्याच्या आज्ञा समाजातील बहुसंख्य लोक स्वाभाविकपणे पाडत असतील तर ते निश्चित अशी श्रेष्ठ व्यक्ती त्या समाजात सार्वभौम असते आणि तो समाज एक स्वतंत्र राजकीय समाज असतो.’** हा सिद्धांत मांडताना ऑस्टीनने कायद्याची **दोन आधारभूत तत्वे** स्पष्ट केले आहेत, एक म्हणजे **आज्ञा** आणि दुसरे म्हणजे आज्ञाच्या मागे असलेले **सक्ती करण्याचे पाठबळ.** रूढी व परंपरा हे कायदे नाहीत, ते नुसते नियम आहेत. कारण त्यांच्या मागे सक्ती करण्याचे पाठबळ नसते. जेव्हा राज्यसंस्था रूढी व परंपरा परंपरांना कायदे म्हणून घोषित करते तेव्हा त्यांचे रूपांतर कायद्यात होते. कायद्यात रूपांतर झाल्यानंतरच त्यांच्या मागे सक्ती करण्याचे पाठबळ उभे राहते, असा कायद्याच्या स्पष्ट अर्थ स्पष्ट करणारा सर्वसाधारण सिद्धांत मांडून त्याच्या आधारे सार्वभौमत्वाची एकतावादी संकल्पना ऑस्टीनने स्पष्ट केली आहे.

## ऑस्टीनच्या सिद्धांतातील मूलतत्त्वे:-

या सिद्धांतातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

1) प्रत्येक राजकीय व स्वतंत्र समाजात एक स्पष्टपणे दिसणारा मानवी श्रेष्ठी असतो. त्याच्यावर अन्य कोणाच्याही आज्ञा पाडण्याचे बंधन नसते. मात्र तो आज्ञा करतो, त्याचे आपण होऊन पालन करण्याची सवय त्या समाजातील बहुसंख्य लोकांना असते.

2) हा निश्चित श्रेष्ठी कायदयाचा कर्ता असतो. त्याची प्रत्येक आज्ञा ही कायदाच असते. त्याच्या आज्ञखेरीज दुसऱ्या कशालाही राज्याचा कायदा असा दर्जा मिळू शकत नाही.

3) या श्रेष्ठीची सत्ता म्हणजेच सार्वभौमत्व किंवा सार्वभौमसत्ता होय. ती निरंकुश असते, अविभाज्य असते.

4) राजकीय व स्वतंत्र समाजातील बहुसंख्य लोक श्रेष्ठींच्या आज्ञांचे पालन स्वभावत: आणि सराईतपणे करत असतात.

5) हा सिद्धांत मांडताना निश्चित सर्वोच्च मानवी सत्ता असा शब्दप्रयोग ऑस्टीनने केला आहे. ही सत्ता एका व्यक्तीमध्ये आणि काही व्यक्तींच्या समूहामध्ये असू शकते, असा अर्थ त्या शब्दप्रयोगावरून काढता येतो. फक्त ती सत्ता 'मानवी' असली पाहिजे, एवढेच ऑस्टीन म्हणतो. सार्वभौमसत्ता ही नैतिक, अध्यात्मिक किंवा आधीभौतिक संकल्पना नसून ती एक प्रत्यक्ष वस्तुनिष्ठ स्थिती आहे, असे त्याने मानवी या शब्दप्रयोगाद्वारे सूचित केले आहे. सार्वभौमसत्ता ही एकमेव असते व निरंकुश असते असा निष्कर्ष या सिद्धांतावरून निघतो.

# ऑस्टीनच्या सिद्धांतावरील टीका

टीकाकारांनी या सिद्धांतावर घेतलेल्या अक्षय पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**1) मानवी श्रेष्ठी सर्वश्रेष्ठ नसतो :-**

टीकाकारांच्या मते, ऑस्टीन म्हणतो तसा सर्वोच्च मानवी श्रेष्ठी म्हणजे ज्याच्यावर कोणत्याही रूढी, परंपरा, नितीनियम इत्यादींचे पालन करण्याचे बंधन नाही, असे कोणत्याही समाजात आढळून येत नाही. अगदी सर्वोच्च स्थानावर असणाऱ्या मानवी श्रेष्ठीलाही रूढी, परंपरा, नितीनियम आदींचे पालन करावे लागते. त्यांना नाकारून अथवा झुगारून देऊन आज्ञा देता येत नाही. तसा प्रयत्न त्याने केल्यास त्याविरुद्ध बंड पुकारले जाण्याची शक्यता असते. सर हेन्रीमेंटने इतिहासात प्रसिद्ध असणाऱ्या निरंकुश व अत्यंत क्रूर राजांचे उदाहरण देऊन त्यालाही समाजातील रूढी, परंपरा, धार्मिक मान्यता आदींचे पालन करावे लागले होते, हे सिद्ध केले आहे.

**2) सार्वभौमसत्तेचे स्थान निश्चित करणे कठीण आहे :-**

टीकाकारांच्या मते, सार्वभौमसत्तेचे स्थान निश्चित असते आणि ते दर्शवता येते. हे ऑस्टीनचे विधान इंग्लंडच्या बाबतीत खरे असले, तरीही अमेरिकेच्या व अन्य देशांच्या राज्यव्यवस्थेत सार्वभौमसत्तेचे स्थान निश्चित करणे अवघड आहे. अमेरिकेच्या राज्यव्यवस्थेत कार्यकारी मंडळाचा प्रमुख अध्यक्ष, कायदे मंजूर करणारे काँग्रेस आणि सुप्रीम कोर्ट या तिघांपैकी सार्वभौमसत्ता कोणाजवळ आहे? याचा निर्णय करता येत नाही.

**3) हा सिद्धांत अतिवैधानिक व अमूर्त आहे :-**

टीकाकारांच्या मते, ऑस्टीनने केवळ कायद्याच्या अंगाने सार्वभौमसत्तेचा विचार केला आहे. तत्वज्ञानाच्या अंगाने ही सार्वभौम सत्तेचा विचार करता येतो, याकडे ऑस्टीनने दुर्लक्ष केले आहे. उदा. जनतेची सर्वसाधारण ईहा(इच्छा) ही आज लोकशाही पद्धतीचा कणा ठरली आहे. परंतु ऑस्टीन सामान्य ईहेचा विचारच करत नाही. तो कायद्याचा अभ्यासक असल्यामुळे त्याने सार्वभौमसत्तेचा विचार केवळ वैधानिकदृष्टीने करणे स्वाभाविक ठरते. ऑस्टीन वर्णन करतो तसा व स्पष्ट दाखवण्याजोगा मानव श्रेष्ठी आधुनिक राज्यात सोडूनही सापडत नाही. म्हणून हा सिद्धांत अतिवैधानिक आणि अमूर्त आहे, असे टीकाकारांना वाटते.

### 4) निरंकुश तसा घातक असते :-

ऑस्टीन वर्णन करतो तेवढ्या प्रमाणात निरंकूश सत्ता असूच शकत नाही. देशाच्या अंतर्गत असणारा घटनात्मक किंवा संविधानिक कायदा आणि बाह्य क्षेत्रात असणारा आंतरराष्ट्रीय कायदा राज्याचे सार्वभौमत्व स्वीमित करीत असतात निरकुंश सत्ता घातक असते असा अनुभव आहे राज्यसंस्थेजवळ निरकुंड सत्ता केंद्रित झाली तर अन्य संस्थांच्या दृष्टीने घातक ठरते असे अनेक सत्तावादी विचारवंतांचे म्हणणे आहे.

### 5) हा सिद्धांत लोकशाही विरोधी आहे :-

जनतेचे सार्वभौमत्व, मतदाराला असणारे मतदानाचे स्वातंत्र्य, जबाबदार शासन पद्धती, नागरिकांचे मूलभूत अधिकार, वृत्तपत्र स्वातंत्र्य यापैकी कशाचीही दखल ऑस्टीनने घेतली नाही. या सर्व बाबी आधुनिक काळातील लोकशाही शासन व्यवस्थेची वैशिष्ट्ये मानली जातात. ऑस्टीनने त्यांची दखल न घेतल्यामुळे हा सिद्धांत लोकशाही विरोधी आहे, असे टीकाकारांना वाटते.

### 6) आज्ञा हाच कायद्याचा एकमेव स्त्रोत नाही :-

ऑस्टीनच्या काळात इंग्लंडमध्ये रुढी, परंपरा, धर्म, नियम, कायदे या सर्वांची सळमिसळ होऊन  अव्यस्थितपणा आणि विस्कळीतपणा निर्माण झालेला होता. तो दूर करण्याच्या उद्देशाने ऑस्टीनने सार्वभौमसत्तेच्या आज्ञा म्हणजे कायदे, असे म्हटले आहे. परंतु कायदा एवढेच महत्त्व संकेत, रूढी, परंपरा आदिनाही असते. आजच्या काळात त्यांना कायद्याचे उगमस्त्रोत असेही मानले जाते. म्हणून टीकाकारांच्या मते, ऑस्टीनने कायद्याच्या अन्य स्त्रोतांचा विचारच केला केलेला नाही.

### 7) सार्वभौम सर्वश्रेष्ठ कायद्यापेक्षा नसतो :-

कास्टिंगच्या मते सार्वभौम हा निरकुंश असल्यामुळे त्याच्यावर कायदे पाळण्याचे बंधन नाही. परंतु ऑस्टीनची ही धारणा चुकीची आहे. कायदे हे विवेक व न्यायबुद्धीतून निर्माण झालेले असतात. कायदे हे राज्याचा आधार असतात. यामुळे कायद्याची बंधने शासक व शासित अशा दोघांवरही असतात.  प्रजेप्रमाणे राज्यकर्त्यांनाही कायद्याचे पालन करावे लागते.

## 8) आज्ञा व कायदा यात फरक आहे :-

ऑस्टीनने सार्वभौमत्वाचे आज्ञा म्हणजे कायदा अशी कायद्याची व्याख्या केली म्हणजे आज्ञा व कायदा एकच आहे असे असतील मानतो परंतु आज्ञा व कायदा यात फरक आहे आज्ञा हे ज्यांना दिले जाते त्यांना त्यानुसार वागावे लागते परंतु आज्ञा देणाऱ्या वर त्या आज्ञेप्रमाणे वागण्याची बंधन नसते मात्र कायद्याबाबत असे म्हणता येत नाही कायदा सर्वांना सारख्या प्रमाणात लागू होतो कायदा करणाऱ्या लोकांवर देखील तो बंधनकारक असतो.

# ऑस्टीनच्या सिद्धांताचे महत्व :-

ऑस्टीनच्या सिद्धांतावर अनेक विचारवंताने टीका केलेली आहे. तरीही ऑस्टीनचा सिद्धांत आजही मान्य करण्यात येतो. ऑस्टीनच्या सिद्धांताचे महत्त्व पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

1) ऑस्टीनने सार्वभौम संकल्पनेची शास्त्रशुद्ध आणि मुद्देसूद मांडणी केली. त्यामुळे या संकल्पनेसंबंधीचा वैचारिक गोंधळ बराच कमी झाला आहे.

2) ऑस्टीनने वैधानिक दृष्टिकोन स्विकारून सार्वभौमसत्तेला विधीमान्य रूप दिले आहे. गेटेल आणि कुकर यांच्या मते, राज्याला सर्वकषसत्ता आहे. असे ऑस्टीनने कुठेही म्हटलेले नाही. अनेकसत्तावाद्यांनी जी टीका केलेली आहे, ती वस्तुतः हेगेलने मांडलेल्या एकसत्तावादावर आहे.

3) वैधानिक दृष्टिकोनातून विचार केल्यास प्रत्येक राज्यांमधील सार्वभौमसत्ता आणि तिचे स्वरूप ऑस्टीनने केलेल्या वर्णनाप्रमाणेच आहे, हे अमान्य करता येत नाही. आज त्यांच्या विचारांमधील शास्त्रशुद्धता, स्पष्टता आणि निश्चितता या गुणांमुळे हा सिद्धांत सर्वत्र मान्यता पावला आहे.

# सार्वभौमत्वाचा अनेकसत्तावादी सिद्धांत

हा सिद्धांत नावाप्रमाणेच *अनेक विचारवंतांनी* व्यक्त केलेल्या विचारांमधून विकसित झाला आहे. **सर्वप्रथम** **ओटो गिर्क** आणि **एफ.डब्ल्यू.मेटलँड** यांनी अनेकसत्तावादी विचार मांडले. त्यानंतर **डॉ. फीगिस, डॉ. लिंडसे,मॅक आयव्हर, बार्कर, लास्की, जी.डी.एच. कौल** आदि विचारवंतांच्या योगदानातून अनेकसत्तावादी विचारप्रवाह विकसित झाला. काही अभ्यासकांच्या मते, अनेकसत्तावादी सिद्धांत हा ऑस्टीनच्या सिद्धांतापेक्षा वेगळा आणि स्वतंत्र असा सिद्धांत नाही, तर एकसत्तावादी सिद्धांतावरील टीका आणि त्यांचे खंडन करण्यामधून हा सिद्धांत विकसित झाला आहे. प्रामुख्याने हेगेलने पुरस्कृत केलेल्या राज्याच्या एकसत्तावादावर अनेकसत्तावाद्यांचा तीव्र आक्षेप आहे.

अनेकसत्तावादी सिद्धांताची पार्श्वभूमी ऑस्टीनने ज्या काळात सिद्धांत मांडला, त्या काळात राज्यसंस्था आणि चर्च (धर्मसंस्था) या दोनच समाजातील प्रमुख संस्था होत्या. मध्ययुग संपून  औद्योगिक क्रांतीची सुरुवात झाली होती. यामुळे मध्ययुगात सक्रिय असणाऱ्या व्यापारी संस्था व अन्यसमूह बदललेल्या परिस्थितीत निष्क्रिय झाले होते. समाज हा एकसत्ताक आहे. राज्य हेच समाजातील सत्तेचे एकमेव केंद्र आहे. असा आशय असणारा सिद्धांत ऑस्टीनने मांडला. औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळात समान हितसंबंधाच्या आधारावर अनेक समूह व संघटना निर्माण झाल्या. समाजातील विभिन्न समूह, संस्था आणि संघटना यांचे व्यक्ती आणि समाज जीवनात कोणते स्थान आहे?, त्याची उपयुक्तता काय?, हे समाजशास्त्रीय संशोधन अध्ययनातून समोर आले. त्याचा प्रभाव राजकीय विचारांवर पडू लागला. थोडक्यात 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक व आर्थिक क्षेत्रात अनेक समूह आणि संघटना सक्रिय झाले होते. त्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील कामकाज नियंत्रित करण्याचा अधिकार आपणास आहे, असा दावा करण्यास सुरुवात केली. उदा. समाजात कुटुंब, धर्म, व्यापारी संघटन, युवक संघ, कामगार संघटना अशी सत्तेचे अनेक केंद्र असतील तर समाज एकसत्ताक नसून अनेकसत्ताक आहे, असे म्हणता येईल. समाजाचे स्वरूप मुळात एकसत्ताक नसून अनेकसत्ताक आहे, असे मत काही विचारवंत मांडू लागले. त्यांना **अनेकसत्तावादी विचारवंत** असे संबोधले जाते.

# अनेकसत्तावादी सिद्धांताचा आशय आणि त्यातील मतप्रवाह :-

सार्वभौमसत्तेचा अनेकसत्तावादी सिद्धांत हा कोणी एका विचारवंतांनी मांडलेला नाही. ओटो गिर्के व मेटलँड पासून लास्की पर्यंत अनेक विचारवंतांनी मांडलेले विचार साचेबद्ध स्वरूपाचे नाहीत. *राज्याच्या सार्वभौमसत्तेवर काही बंधने असावीत. ती निरकुंश व अमर्याद असू नये, अशी त्यांची समान भूमिका आहे.* परंतु काही विचारवंत **वैधानिक** व **कायद्याच्या** दृष्टिकोनातून अनेकसत्तावादी विचार मांडतात, तर काही विचारवंत **आंतरराष्ट्रीय** दृष्टिकोनातून अनेकसत्तावादी विचार मांडतात. या दोन प्रमुख प्रवाहापेक्षा आणखी भिन्न असा मतप्रवाह ही काहींनी मांडला आहे. उदा. काही विचारवंतांनी **समुहवादी** व **व्यवसाय संघवादी** विचार मांडला आहे. तर काहींनी **तात्वीक अराज्यवादी** विचार मांडले आहेत. हे भिन्न मतप्रवाह बाजूला ठेवून या सिद्धांताचा आशय पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

अनेकसत्तावाद 'राज्यसंस्था' ही समाजातील एकमेव द्वितीय संस्था आहे, असे मानत नाही. राज्य आवश्यक असले तरीही कुटुंब, धर्म यासारख्या संस्था व समूह राज्यापेक्षा ही प्राचीन व पुरातन आहेत. आपली कार्य आणि अधिकार याबाबत ते राज्यावर अवलंबून नाही. म्हणून राज्याची सत्ता ही सर्वश्रेष्ठ व निरंकुश राहू शकत नाही. लास्कीच्या मते, समाजाचे स्वरूपच संघात्मक आहे, एकसत्तात्मक नाही. प्रत्येक व्यक्तीला आपल्या व्यक्तित्वाचा विकास घडवून आणण्याचा नैतिक अधिकार आहे. व्यक्तीच्या व्यक्तीत्वाचा विकास घडवून आणण्याचे कार्य कोणतीही एकच संस्था व संघटना करू शकत नाही. या कार्यात सहभागी असणाऱ्या सर्व संस्था व समूहांना स्वायत्तता असली पाहिजे. म्हणून राज्याचा अधिकार मर्यादित असावा, असे अनेकसत्तावादी विचारवंताचे म्हणणे आहे.

## अनेकसत्तावादाची मूलतत्वे :-

अनेकसत्तावादी सिद्धांताचा आशय व मध्यवर्ती कल्पना पाहिल्यानंतर या सिद्धांतातील प्रमुख तत्वे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

### 1) राज्य ही अन्य संस्था सारखीच एक संस्था आहे :-

मानवाने आपल्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय अशा विभिन्न गरजा भागवण्यासाठी वेगवेगळ्या संस्था व समूह निर्माण केले आहेत. राज्य ही अन्य संस्था व संघटनांसारखीच एक संघटना आहे.

### 2) मानवी जीवनाच्या विकासामध्ये विभिन्न संस्थांचे योगदान :-

व्यक्तीच्या व्यक्तीत्वाचा विकास घडवून आणण्यामध्ये कुटुंब, धर्म यासारख्या अनेक संस्था व समूहाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. राज्याच्या कार्याएवढेच अन्य संस्था व समूहाच्या कार्यालाही महत्त्व आहे.

### 3) राज्यापेक्षाही पुरातन :-

समाजातील कुटुंब, धर्म यासारख्या संस्था राज्यापेक्षा प्राचीन व पुरातन आहेत. त्या राज्याने निर्माण केलेल्या नाहीत तसेच त्या आपल्या कार्यासाठी राज्यावर अवलंबून देखील नाहीत. प्रथम समाज व नंतर राज्य निर्माण झाले हा क्रम लक्षात घेतला की, समाजातील काही संस्था व समूह राज्यापेक्षाही पुरातन व प्राचीन आहेत, हे स्पष्ट होते.

### 4) राज्य निरंकुश व सर्वश्रेष्ठ नाही :-

राज्य निरंकुश नाही तसेच ते कायद्यापेक्षा श्रेष्ठही नाही. कारण राज्यापेक्षा विधीनियमांची सत्ता श्रेष्ठ आहे. राज्यसंस्था निर्माण होण्याच्या अगोदर देखील समाजात काही प्रथा, परंपरा व नियम होतेच. त्यांच्यामागे राज्याच्या शक्तीचे पाठबळ नसले तरीही ते आपले अस्तित्व आणि प्रभाव कायम राखून असतात, असे अनेकसत्तावाद्यांचे म्हणणे आहे.

### 5) व्यक्ती व समाजाच्या स्वाभाविक विकासात राज्याचा अडथळा :-

राज्यसंस्था व्यक्ती व समाजाच्या स्वाभाविक विकासामध्ये अडथळे निर्माण करते. म्हणून राज्याचे सार्वभौमसत्ता समाजातील निरनिराळे समूह आणि संस्था यांच्यामध्ये विभाजित करून टाकावी. राज्याने समाजातील विविध संस्था व समूह यांच्यामध्ये समन्वय घडवून आणण्याचे कार्य करावे.

## अनेकसत्तावादी सिद्धांतावरील टीका :-

टीकाकारांनी या सिद्धांतावर घेतलेल्या आक्षेप पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**1) राज्यसंस्थेचे वेगळेपण :-**

टीकाकारांच्या मते, 'राज्य' ही अन्य संस्थांसारखेच एक संस्था आहे, हे अनेकसत्तावाद्यांचे म्हणणे चूक आहे. कारण काही बाबतीत अन्य संस्थापेक्षा राज्यसंस्था वेगळी आहे. उदा. राज्याचे सदस्यत्व अनिवार्य आहे, अन्य सर्व संस्थांपेक्षा राज्याचे कार्यक्षेत्र व्यापक आहे, कायद्याचा भंग करणाऱ्या व्यक्तीला राज्यसंस्था कठोर दंड देऊ शकते. या सर्व कारणांमुळे राज्यसंस्था ही अन्य संस्थांच्या समकक्ष आहे, असे समजणे चूक ठरते.

**2) अराजकतेला प्रोत्साहन :-**

हा सिद्धांत अराजकतेला बढावा देणार आहे, असे टीकाकारांना वाटते. कारण अनेकसत्तावादी म्हणतात, त्याप्रमाणे राज्याची सार्वभौमसत्ता अन्य संस्थांमध्ये विभाजित केली की, अराजकतेची व गोंधळाची स्थिती निर्माण होईल.

**3) पर्याय दिला नाही :-**

राज्याची सार्वभौमसत्ता विभाजित करावी, असे अनेकसत्तावादी म्हणतात. परंतु ती नष्ट झाल्यानंतर पर्यायी व्यवस्था काय करावी?, हे मात्र अनेकसत्तावादी स्पष्ट करत नाहीत. म्हणून टीकाकारांच्या मते, अनेकसत्तावादी यांनी सार्वभौमसत्तेला कोणताही नवीन पर्याय सुचवलेला नाही.

**4) राज्याच्या भूमिकेसंबंधीचा वैचारिक गोंधळ :-**

टीकाकारांच्या मते, सार्वभौमसत्तेचे विभाजन केल्यानंतर राज्याची भूमिका कोणती असावी, याबाबत अनेकसत्तावाद्याच्या विचारांमध्ये स्पष्टता नाही, गोंधळ आहे.अन्य संस्थांमधील संघर्ष दूर करून त्यांच्यामध्ये समन्वय साधण्याचे कार्य राज्याने करावे, असे अनेक सत्तावादी म्हणतात. परंतु राज्यसंस्था ही अन्य संस्थांपेक्षा श्रेष्ठ संस्था नसेल तर हे कार्य ती करू शकणार नाही.

**5) कायद्याच्या संकल्पनेसंबंधीची अस्पष्टता :-**

राज्य कायद्याचा निर्माता नाही. राज्य कायद्यापेक्षा श्रेष्ठ नाही. असे अनेकसत्तावादी म्हणतात, परंतु कायद्याचा निर्माता कोण आहे ?, कायदे पालनाचे आधार कोणते ?, याबाबत त्यांचे विचार स्पष्ट नाहीत, असे टीकाकारांना वाटते.

**6) सार्वभौमसत्तेचे अवास्तव चित्रण :-**

टीकाकारांच्या मते, सार्वभौमसत्तेचे अवास्तव चित्रण अनेकसत्तावाद्यांनी केलेले आहे. कारण हेगेलच्या विचारांचा अपवाद सोडला तर राज्याची सत्ता निरंकुश आहे, असे अन्य कोणत्याही विचारवंतांनी म्हटले नाही. राज्याच्या सार्वभौमसत्तेचे अवास्तव चित्रण अनेकसत्तावाद्यांनी केले आहे, असे टीकाकारांना वाटते.

**7) आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सार्वभौमसत्तेचे महत्त्व :-**

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात राज्याला समानतेचा दर्जा आणि प्रतिष्ठा सार्वभौमसत्तेमुळे प्राप्त होत असते. राज्याला आपल्या अस्तित्वाचे रक्षण करणे सार्वभौमसत्तेमुळे शक्य होते. थोडक्यात टीकाकारांच्या मते, अनेकसत्तावादाने आंतरराष्ट्रीय क्षेत्रात असलेले राज्याच्या सार्वभौम सत्तेचे महत्त्व लक्षात घेतले नाही.

## अनेकसत्तावादी विचारांचे महत्त्व

सिद्धांत आणि विचारावर काही आक्षेप घेतले आहेत, म्हणून त्याचे महत्त्व कमी होत नाही. या सिद्धांताचे महत्त्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

1) **ऑस्टीनचा एकत्तावादी सिद्धांत कालबाह्य आहे. आजच्या बदललेल्या परिस्थिती त्याची उपयुक्तता संपुष्टात आली आहे, हे सर्वप्रथम अनेकसत्तावादाने स्पष्ट केले.**
2) **अनेकसत्तावादी विचारवंतांनी राजकीय प्रक्रियेचे अधिक वास्तववादी आणि सर्वसमावेशक असे चित्र सादर केले आहे. त्यांनी राजकीय प्रक्रियेत सामाजिक संबंधाचाही समावेश केला आहे.**
3) **राजकीय सत्तेच्या विकेंद्रीकरणाची त्यांनी केलेली तरफदारी अयोग्य आहे, असे म्हणता येत नाही. अनेकसत्तावाद्यांनी सामाजिक जीवनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या विभिन्न संस्था, समूहाचे महत्त्व अधोरेखांकित करण्याचे कार्य केले आहे.**
4) **वर्तमान काळातील राज्य हे निरंकुश सार्वभौमसत्ता असणारे राज्य नाही, हे अनेकसत्तावाद्यांनी स्पष्ट केले.**

# गोविंदराव वारजूकर महाविद्यालय, नागभीड

## राज्यशास्त्र विभाग

# राजकीय सिद्धांत

B.A. भाग 2 (सेम.III)

युनिट 4

प्रा.मंगेश टी.देवढगले

# सामाजिक परिवर्तन

परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे. आपल्या आजूबाजूला सजीव सृष्टीत निरंतर बदल होत असतात. निसर्गात आज जे आहे ते उद्या राहणार नसते. हा नियम मानवी समाजालाही तितकाच लागू असतो. आदिम अवस्थेपासून आजतागायत सर्व समाज बदलत आले आहेत. समाजात आज आहे, ती परिस्थिती टिकून राहावी, सातत्य आणि स्थैर्य कायम असावे, यासाठी कितीही प्रयत्न केले तरीही कमी-अधिक प्रमाणात बदल घडतच असतात. वर्षानुवर्षेपासून पारंपरिक जीवनपद्धती जपून ठेवणारा आदिवासी समाज देखील याला अपवाद नाही. आदिवासींच्या जीवन पद्धतीत व समाज रचनेत काही ना काही बदल घडवून आले आहेत. शहरी व ग्रामीण समाजाच्या तुलनेत आदिवासी समाजातील परिवर्तनाची गती मंद आहे. एवढाच काय तो फरक. संपूर्ण स्थितीशील असा एकही समाज नाही.

सभोवतालच्या बदललेल्या परिस्थितीशी प्रत्येक सजीवाला जुळवून घ्यावेच लागते. बदललेल्या परिस्थितीसोबत ज्यांना जुळवून घेत येत नाही, त्यांना विकास प्रक्रियेपासून दूर राहावे लागते. नियोजनबद्ध प्रयत्न करून परिवर्तन घडवून आणणे हाच विकासाचा उद्देश असतो. विकासामुळे समाज जीवनाच्या विभिन्न क्षेत्रात परिवर्तन घडवून येत राहणे अपरिहार्य असते. त्यामुळे परिवर्तनाचे स्वरूप व दिशा परिवर्तन घडवून आणणारे कारक, परिवर्तनाचे परिणाम हे सर्व लक्षात घेतल्याशिवाय समाजजीवनाचा अभ्यास पूर्ण होऊ शकत नाही. या प्रकरणात आपण सामाजिक परिवर्तनाची ओळख करून घेणार आहोत.

## सामाजिक परिवर्तनाचा अर्थ :-

सर्व प्रकारच्या परिवर्तनाचा अभ्यास करणे सामाजिक शास्त्रामध्ये अपेक्षित नाही. उदा. नैसर्गिक बदल हा सामाजिक शास्त्राचा अभ्यास विषय नाही. सामाजिक शास्त्रामध्ये केवळ समाज जीवनात घडून आलेल्या बदलांचेच अध्ययन केले जाते. त्यांना सामाजिक परिवर्तन असे संबोधले जाते. सामाजिक परिवर्तन या संज्ञेनेतील **परिवर्तन** व **सामाजिक** या दोन संज्ञाचा अर्थ सर्वप्रथम लक्षात घेऊ.

'परिवर्तन' ही संज्ञाच मुळात **तुलनात्मक** आहे. दोन भिन्न परिस्थितीची तुलना केल्याशिवाय आपण कोणताही बदल सुचवू शकत नाही. उदा. ग्रामीण जीवनात किंवा खेड्यात बदल झाले आहेत, असे आपण म्हणतो. असे विधान करताना आपण अप्रत्यक्षपणे किंवा मनातल्या मनात तुलना केली आहे, पूर्वी खेड्यामध्ये वीज नव्हती, घरोघरी पाण्यासाठीचे नळ नव्हते, शाळा नव्हत्या यासारख्या काही ना काही गोष्टींमध्ये बदल झाला आहे. हे सुचित करण्यासाठी आपण विधान करीत असतो. तुलना न करता आपण कोणत्याही बदलाचे वर्णन करू शकत नाही. म्हणून बदल किंवा परिवर्तन ही संज्ञा मुळातच तुलनात्मक आहे, असे म्हणता येते. परिवर्तन ही संज्ञा तुलनात्मक आहे तसेच ती **काळसापेक्ष** आहे. म्हणजे आपण जी तुलना करतो, त्या तुलनेला दोन भिन्न काळाचा संदर्भ असतो. उदा. खेड्यामध्ये बदल झाला असे म्हणताना, जेव्हा खेड्यामध्ये वीज नव्हती, नळ नव्हते, शाळा नव्हत्या अशा काळाचा संदर्भ असतो. हा काळ दोन वर्षांपूर्वीचा किंवा पंचवीस वर्षांपूर्वीचा असू शकतो. किती वर्षांपूर्वीची स्थिती आहे हे महत्त्वाचे नसून ती परिस्थिती दोन भिन्न काळामधील आहे, हे जास्त महत्त्वाचे आहे. भारतीय समाजात परिवर्तन किंवा बदल झाले हे विधान करताना, आपण 5- 25 वर्षांपूर्वीचा भारतीय समाज आणि आजचा भारतीय समाज अशा दोन भिन्न काळातील भारतीय समाजाची तुलना केलेली आहे.

अशाप्रकारे बदल किंवा परिवर्तन ही संज्ञा तुलनात्मक आणि काळसापेक्ष स्वरूपाची आहे. **सामाजिक** या संज्ञेचा संख्येची काहीही संबंध नाही. म्हणजे दोन व्यक्तींमधील संबंधांना सामाजिक संबंध असे म्हटले जाते. तसेच 50, 100 किंवा त्यापेक्षा अधिक मोठा आकार असणाऱ्या समूहातील सदस्यांच्या संबंधांनाही सामाजिक संबंध असेच म्हटले जाते. **पती-पत्नी संबंध, गुरु-शिष्य संबंध, माता-पुत्र संबंध, मित्र-मित्र संबंध, शत्रु-मित्र संबंध** अशा सर्वच संबंधांना सामाजिक संबंध असेच म्हणण्याचा प्रघात आहे. **आर्थिक संबंध, सांस्कृतिक संबंध, राजकीय संबंध** हे सर्व सामाजिक संबंधाचे वेगवेगळे पैलू आहेत. यादृष्टीने सामाजिक संबंध किंवा सामाजिक जीवन ही व्यापक अर्थाची संज्ञा आहे असे म्हणता येईल.

## सामाजिक परिवर्तनाची व्याख्या :-

1) मॅक आयव्हर आणि पेज यांच्या मते,

"सामाजिक संबंधात होणारे बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय."

2) हॅरी जॉन्सन यांच्या मते,

"सामाजिक संरचनेतील बदलांना मूलभूत अर्थाने सामाजिक परिवर्तन असे म्हटले जाते."

3) गिलिन आणि गिलिनच्या मते,

"सामाजिक परिस्थितीतील, सांस्कृतिक विश्वातील, लोकसंख्येच्या रचनेतील किंवा विचारप्रणालीतील बदलांमुळे मानवी जीवनाच्या स्वीकृत पद्धतीत दिसून येणाऱ्या वेगळेपणाला सामाजिक परिवर्तन असे म्हणतात."

4) फेअर चाईल्डच्या मते,

"सामाजिक प्रक्रिया सामाजिक वर्तनाचे प्रकार आणि आकृतीबंध यामधील कोणत्याही पैलूत झालेला बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय."

## सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप :-

सामाजिक परिवर्तन ही सतत सुरू असणारी प्रक्रिया आहे. हे समजून घेतले की उत्क्रांती (हळूहळू होणारा बदल), क्रांती (कृषीक्रांती, औद्योगिक क्रांती व त्यानंतरच्या काळात इलेक्ट्रॉनिक्सची क्रांती), प्रगती, सुधारणा ही सर्व सामाजिक परिवर्तनाची विभिन्न रुपे आहेत हे लक्षात येते. आदिम अवस्थेपासून आजच्या औद्योगिक अवस्थेपर्यंत समाजाची वाटचाल ही उत्क्रांतीतूनच झाली आहे. शेती करण्याच्या कलेचा शोध लागला आणि मानवाचे भटके जीवन संपले. तो एकाच ठिकाणी राहू लागला. वाफेच्या इंजिनाचा शोध लागला आणि व्यक्ती व समाजजीवनात कितीतरी बदल घडून आले. अस्पृश्यतेचे उच्चाटन, आणि स्त्रियां दर्जा वा अधिकार आणि दलितांच्या जीवनात आमूलाग्र असे बदल घडून आले आहे म्हणूनच क्रांती, उत्क्रांती, सुधारणा, प्रगती ही सर्व सामाजिक परिवर्तनाची रूपे सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप स्पष्ट करीत असतात असे म्हटले जाते. हॅरि जॉन्सनने आपल्या ग्रंथात सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

### (१) मूल्यात्मक बदल :-

हॅरि जॉन्सनच्या मते, मूल्यात्मक बदल हा सर्वात मोठा असा संरचनात्मक बदल असतो. राजा राममोहन रॉयपासून महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत असंख्य समाजसुधारकांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमधून समता व स्वातंत्र्य ही दोन्ही मूल्ये भारतीय जनमानसात पक्की रूजली. समाजसुधारकांनी केलेल्या प्रयत्नांना सती बंदीचा कायदा, शारदा कायदा, अस्पृश्यतेचे निमूर्लन करणारा कायदा यासारख्या कायद्यांमुळे बळकटी आली. स्त्री-पुरुष **समानता** हे मूल्य म्हणजेच हा आदर्श मान्य केल्यामुळे स्त्रियांसाठी शिक्षणाची वाट मोकळी झाली. सती जाण्याची, विधवांच्या केशवपनाची, विधवा विवाहाला बंदी असण्याची अशा अनेक घातक प्रथा बंद झाल्या. भारतीय स्त्रियांच्या जीवनात बदल घडून आले. भारतीय समाजरचनेत परिवर्तन झाले. शिक्षण घेण्याचा अधिकार, व्यवसायाची निवड करण्याचा अधिकार यासारखे अनेक महत्वपूर्ण अधिकार दलितांना मिळाले, ते **स्वातंत्र्य** व **समता** ही मूल्ये भारतीय समाजात रूजवण्यामधूनच मिळाले आहेत. म्हणूनच मूल्यात्मक बदल हे सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप स्पष्ट करणारे महत्वपूर्ण अंग असल्याचे जॉन्सनने म्हटले आहे.

## (२) संस्थात्मक बदल :-

**कुटुंब, विवाह, धर्म, शिक्षण** आणि **राज्य** या पाच मूलभूत अशा सामाजिक संस्था आहेत. या पाच सामाजिक संस्था सर्व समाजांमध्ये आहेत. वैयक्तिक आणि सामूहिक अशा दोन्ही स्तरावरील वर्तनक्रियाबाबत रूढ झालेल्या वर्तन नियमांच्या चाकोरीला किंवा आकृतीबंधाला सामाजिक संस्था असे म्हणतात.

पती-पत्नी, भाऊ-बहिण, पिता-पुत्र,नेता-अनुयायी यांनी एकमेकांशी कसे वागावयाचे याबाबत च्या नियमांची एक चाकोरी वा आकृतीबंध सर्व समाजांमध्ये आहे. म्हणूनच कुटुंबसंस्था सर्व समाजामध्ये आहे असे आपण म्हणत असतो. कुटुंबसदस्यांच्या वर्तननियमांची चाकोरी सर्व देशांमध्ये तंतोतंत एकसारखी नाही. समाजानुसार त्यात काही बाबतीत वेगळेपणा आहे. म्हणून भारतीय समाजातील कुटुंबसंस्था आणि पाश्चिमात्य देशांमधील कुटुंबसंस्था वेगवेगळी आहे असे आपण म्हणू शकतो.

पती-पत्नी, पिता-पुत्र, गुरू-शिष्य, नेता-अनुयायी यासारख्या दोन भिन्न दर्जांनी एकमेकांशी जोडल्या गेलेल्या व्यक्तींना सर्व समाजांमध्ये एका विशिष्ट प्रकारे वागावे लागते. त्यांनी एकमेकांशी विशिष्ट प्रकारे वर्तन करण्यामधून जे संबंध होतात त्यांना 'संस्थीकृत सामाजिक संबंध' असे म्हणतात. सर्व सामाजिक संस्था या संस्थीकृत सामाजिक संबंधातूनच निर्माण होत असतात. भारतीय समाजासह सर्व समाजांमध्ये वर्तननियमांच्या चाकोरीत अनेकविध बदल झालेले आहेत. म्हणूनच संस्थात्मक बदलांच्या अध्ययनातून समजिक परिवर्तनाच्या स्वरूपाचा बोध आपणास होतो, असे हॅरि जॉन्सनने म्हटले आहे.

### (३) मालकी हक्क आणि पारितोषके यात होणारे बदल :-

मालमत्तेची संकल्पना समाजाइतकीच प्राचीन आहे. प्रत्येक व्यक्ती आपल्या आयुष्यात काही ना काही तरी मालमत्ता जमविते. त्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर ती मालमत्ता तिच्या वारसदारांना प्राप्त होत असते. व्यक्ती- व्यक्तींमधील संबंधाचे स्वरुप निश्चित व निर्धारित करणारा एक महत्वपूर्ण घटक म्हणून मालकी हक्कांचा विचार केला जातो. उदा. एकेकाळी संपूर्ण राज्य म्हणजे त्या भूप्रदेशातील सर्व गावे, जमिन व प्रजा ही राजाच्या मालकीची आहे अशी धारणा होती. राजाला दुसऱ्या राजाशी तह करतांना किंवा वाटाघाटी करतांना किल्ले, गावे, जमीन देण्याचा अधिकार होता. एखाद्या गावामधील संपूर्ण शेतजमिन ही सरदार, सरंजामदार, मालगुजार यांच्या मालकीची आहे असे मानले जात असे. आता 'कसेल त्याची जमिन' हे तत्व मान्य झाले आहे. राजेशाही, सरंजामशाही, लोकशाही, कुळकायदा या सर्वांच्या मुळाशी मालकी हक्काविषयक धारणा किंवा विचार आहेत हे स्पष्ट होते. म्हणूनच मालकी हक्कांमधील बदलातून सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप स्पष्ट होते असे जॉन्सनने म्हटले आहे.

कामाचा मोबदला हा देखील सत्तेचा एक प्रकार आहे. कारण त्यात वेतनाचाच नव्हे कामाचा मिळणारा मोबदला हे श्रम केल्याबद्दल श्रमिकाला देण्यात आलेले पारितोषक तर प्रतिष्ठा, कीर्ती यासारख्या बाबींचाही समावेश होत असतो. मोबदलाविषयक विचारांमधील बदलांमुळेच गुलामगिरीचा अंत झाला. स्त्री-पुरुषांनी केलेल्या कामाबात 'समान काम समान 'वेतन' हे तत्व अद्यापही पूर्णपणे रूजले असल्याचे कोणत्याही समाजात आढळून येत नाही. कामाचा मोबदला वा वेतनविषयक धारणा किंवा विचार यामधील बदलांमधून सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप स्पष्ट होत असते असे हॅरि जॉन्सनने म्हटले आहे.

### (४) व्यक्तीच्या व्यक्तिमत्वात होणारे बदल :-

शिक्षण, वाचन, प्रवास, अन्य व्यक्तींशी संपर्क, व्यक्तिगत अनुभव यासारख्या असंख्य कारणांमुळे व्यक्तीच्या अभिवृत्तींमध्ये वा बौध्दिक व मानसिक स्तरावर काही बदल होत असतात. व्यक्तीच्या व्यक्तीमत्वात होणाऱ्या बदलांमधूनही सामाजिक परिवर्तनाला दिशा मिळाल्याची उदाहरणे इतिहासाच्या पुस्तकात पानोपानी आढळतात. झारविरोधी चळवळीत सामील नसतांनाही झारच्या सेवकांनी आपल्या भावाला ठार मारले ही बाब लेनिनच्या विचारांची व जीवनाची दिशा बदलविण्यास कारणीभूत ठरली. दक्षिण आफ्रिकेत रेल्वेने प्रवास करतांना मिळालेला अनुभव महात्मा गांधीच्या विचारांना नवीन दिशा देण्यास कारणीभूत ठरला.

# सामाजिक परिवर्तनाचे प्रकार :-

## 1)तात्कालिक परिवर्तन आणि दूरगामी परिवर्तन :-

समाजजीवनात झालेले काही बदल हे **तात्कालीक** किंवा **प्रासंगिक** स्वरूपाचे असतात. **फॅशन्स** हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. पोषाखांच्या व केशभूषेच्या फॅशन्समध्ये सातत्याने बदल होत असतात. तात्कालिक बदलांचा समाजजीवनावर फारसा परिणाम होत नाही. यामुळे तात्कालिक परिवर्तनाचा संरचनात्मक बदल या दृष्टिने फारसा विचार केला जात नाही. कोणते परिवर्तन हे तात्कालिक आहे वा दूरगामी आहे हे काळच निश्चित करीत असतो. दूरगामी परिवर्तन महत्त्वपूर्ण असते. **मूल्यात्मक परिवर्तन, संस्थात्मक परिवर्तन, मालकी हक्कांमधील बदल** ही सर्व **दूरगामी परिवर्तना**ची उदाहरणे आहेत. संरचनात्मक बदल हे दूरगामी बदलातूनच घडून येत असतात. उदा. विभक्त वा केंद्र कुटुंबाने संयुक्त कुटुंबाची जागा घेतली आहे. प्रारंभी शहरी भागातील संयुक्त कुटुंबे मोडकळीस आली. त्यानंतर अल्पकाळातच त्याचे लोण खेड्यापर्यंत पोहचले. आता आदिवासी, ग्रामीण व नागरी अशा सर्व समाजांमध्ये विभक्त वा केंद्र कुटुंबाचे प्राबल्य वाढले आहे. आई-वडील आणि कर्ता मुलगा-मुलगी यांच्यामधील संबंधावर विभक्त कुटुंबपध्दतीचा प्रभाव वाढत आहे. यामुळे वृध्दाश्रम ही :समाजाची एक आवश्यक अशी गरज होत असल्याचे सर्वत्र दिसून येते.

## 2) समग्र परिवर्तन आणि आंशिक परिवर्तन :-

आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय यासारख्या **समाजजीवनाच्या विभिन्न अंगांमध्ये होणारे बदल** म्हणजे समग्र परिवर्तन होय. **कृषी क्रांती, औद्योगिक क्रांती** ही समग्र परिवर्तनाची उदाहरणे आहेत. **शिकारी अवस्था, पशूपालन अवस्था, कृषी अवस्था आणि औद्योगिक अवस्था** ही देखील समग्र परिवर्तनाचीच उदाहरणे होय. प्रत्येक समाजव्यवस्था इतिहासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर बदललेली आढळते.समाजाच्या एखाद्या क्षेत्रात बदल होतो. परंतु उर्वरित समाज मात्र जेथे होता तेथेच राहतो. १९५० नंतरच्या काळात नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांमध्ये नवीन राज्यघटना तयार करण्यात आली. राज्यघटनेनुसार कार्य करणारी **लोकशाही शासनसंस्था** निर्माण झाली. परंतु ती दीर्घकाळ टिकली नाही. कारण शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, धार्मिक अशा विभिन्न अंगात लोकशाही शासनव्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक असणारे बदल झालेच नाही. सरजमी मनोवृत्तीमध्ये बदल झाल्याशिवाय लोकशाही व्यवस्था रुजणे  आणि यशस्वी होणे जवळजवळ अशक्य असते, असे म्हणता येते. लोकशाही यशस्वी होण्यासाठी राजकीय संस्कृतीत बदल होणे आवश्यक असते हे अनुभववादी संशोधन अध्ययनातून स्पष्ट आहे.

### 3) रेखीय परिवर्तन आणि चक्राकार परिवर्तन :-

जे परिवर्तन **एका सरळ रेषेत पुढचे टप्पे गाठत सुरू असते**, त्याला **रेखीय परिवर्तन** असे म्हणतात. उत्क्रांतीच्या रूपाने होणारे परिवर्तन हे रेखीय परिवर्तनच असते. *आदिम अवस्थेपासून औद्योगिक अवस्थेपर्यंत समाजाची वाटचाल ही रेखीय परिवर्तनातूनच घडून आलेली आहे असे म्हणता येईल.* रेखीय परिवर्तन या प्रकारात **आधी घडलेल्या कोणत्याही गोष्टीची पुनरुक्ती होत नाही.** तसेच **परिवर्तनाच्या प्रक्रियेत खंडही पडत नाही**.चक्राकार परिवर्तनात **ठराविक कालखंडानंतर जुन्या गोष्टी पुन्हा पुन्हा समोर येतात**. **फॅशन्स** हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. कधी काळी कालबाह्य झाल्यामुळे लोकांनी टाकून दिलेल्या फॅशन्स पुन्हा नव्याने समाजात प्रचलित होत असतात. काही अभ्यासकांना रेखीय परिवर्तन आणि चक्राकार परिवर्तन असे प्रकार पाडणे योग्य वाटत नाही. कारण त्यांच्या मते सामाजिक घटना जशाच्या तशा कधीच पुनरुक्त होत नाहीत. एखादे परिवर्तन हे रेखीय आहे की चक्राकार परिवर्तन आहे हे विशिष्ट कालखंडाचा संदर्भ आणि तेव्हाची परिस्थिती लक्षात घेऊनच ठरवावे लागते.

## सामाजिक परिवर्तनास कारणीभूत होणारे घटक :-

सामाजिक परिवर्तन ही बहुमुखी प्रक्रिया आहे. म्हणजे सामाजिक परिवर्तनामुळे समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा विविध अंगात बदल घडून येते. यामुळे सामाजिक परिवर्तनाची कारणे देखील अनेकविध असणे स्वाभाविक ठरते. सामाजिक परिवर्तन घडून येण्यास जबाबदार असणाऱ्या प्रमुख घटकांचे किंवा कारकांचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

### 1) भौगोलिक घटक :-

भूमी, हवामान, नद्या, पर्वत, जलाशय, वनस्पती, समुद्र या सर्वांचा समावेश भौगोलिक घटकामध्ये होतो. भौगोलिक परिस्थितीला अनुकूल असणारी भौगोलिक परिस्थितीशी जुळवून घेणारी जीवनपद्धती लोकांची असते. चालीरीती, संस्कृती, स्वभाव वैशिष्ट्ये या सर्वांवर त्या त्या परिसरातील भौगोलिक परिस्थितीचा प्रभाव असतो. काही प्रसंगी भौगोलिक परिस्थिती मानवी जीवन उद्ध्वस्त ही करून टाकते. भुकंप, महापूर, सुनामी यासारख्या नैसर्गिक संकटांनी संपूर्ण जनजीवन उद्ध्वस्त झाल्याची उदाहरणे इतिहासात मोठ्या संख्येने आढळतात, भौगोलिक परिस्थितील चढ-उतारावरून सामाजिक परिवर्तनाची दिशा व गती निश्चित होत असते.

## 2) लोकसंख्या विषयक घटक :-

लोकसंख्या हे कोणत्याही समाजाचे एक महत्वाचे वैशिष्ट्य असते. उदा. फारच कमी लोकसंख्या असणारे देश स्वसंरक्षणाबाबत दुबळे असतात. या उलट भौगोलिक आकाराच्या तुलनेत प्रचंड लोकसंख्या असणाऱ्या देशात दारिद्र्य, बेरोजगारी, साथीचे रोग यासारख्या विभिन्न समस्यांचे थैमान घालणे सुरू असते. कमी लोकसंख्या किंवा फार विरळ लोकसंख्या असणारे देश कोणत्याही दृष्टीने शक्तीशाली राष्ट्रे होऊ शकत नाही. युरोपियन वा पाश्चिमात्य राष्ट्रांना १०० वर्षांपूर्वी लोकसंख्येची भरमसाठ वाढ थांबविणे शक्य झाले. आशियायी देशांनी लोकसंख्येची भरमसाठ वाढ थांबविण्यासाठी फार उशिरा प्रयत्न सुरू केले. यामुळे पाश्चिमात्य देशांपेक्षा आशियायी देशांमधील सामाजिक परिवर्तनाची गती अत्यंत मंद आहे, असे निश्चितपणे म्हणता येते.

लोकसंख्येच्या संख्यात्मक पैलूप्रमाणेच गुणात्मक पैलूचाही सामाजिक परिवर्तनाची दिशा व गती निर्धारित करण्याशी निकटचा संबंध आहे. कष्ट किंवा परिश्रम करण्याची क्षमता, चिकाटी, धैर्य, शिस्त, राष्ट्रप्रेम किंवा राष्ट्रनिष्ठा यासारखे अनेक गुण जपान, जर्मनी व काही युरोपियन राष्ट्रातील लोकांमध्ये आहेत. महायुद्धामुळे कारखानदारी व एकूण अर्थव्यवस्थाच मोडकळीस आली असतांनाही जर्मन व जपानी लोकांनी १५-२० वर्षांच्या अल्पकाळात आपआपल्या राष्ट्रांना समृद्ध व शक्तिशाली बनविले. लोकसंख्येत १८ ते ४० या वयोगटातील तरुणांचे प्रमाण किती याचाही सामाजिक परिवर्तनाच्या गतीवर प्रभाव पडत असती. तरुण लोकसंख्या असणाऱ्या देशात विकासाची आणि परिवर्तनाची गती तुलनात्मकदृष्ट्या जास्त असते.

## 3) तंत्रज्ञानात्मक घटक :-

शास्त्रज्ञ नवनवीन शोध लावतात. मानवी जीवन अधिक सुखदायक आणि सुरक्षित करण्याच्या हेतूने त्यांचा उपयोग वस्तूच्या निर्मितीसाठी केला जाने याला तंत्रज्ञान म्हणतात. उदा. वाफेमध्ये व वाऱ्यामध्ये शक्ती आहे हा वैज्ञानिक शोध आहे. वाफेवर चालणारे इंजिन तयार करणे व वाऱ्याच्या शक्तिचे वीजनिर्मितीमध्ये रूपांतर करणे हे तंत्रज्ञान आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांनी विविध प्रकारच्या गरजेच्या वस्तू आणि अत्यंत आधुनिक शस्त्रास्त्रे तयार करण्याचे तंत्रज्ञान विकसित केले आहे. यामुळे तेथे विभिन्न क्षेत्रात यांत्रिकीकरणाचे प्रमाण अधिक आहे. याचा प्रभाव त्या देशांमधील सामाजिक परिवर्तनाची गती वाढण्यात झाला आहे. रेडीओ, दूरचित्रवाणी, संगणक, मोबाईल यानी सामाजिक परिवर्तनाच्या गतीचा वेग वाढतो, असा अनुभव सर्वच देशांच्या गाठी जमा झालेला आहे, असे म्हणता येईल.

## 4) सांस्कृतिक घटक :-

संस्कृती ही व्यापक अर्थ असणारी संज्ञा आहे. भौतिक वस्तू व साधने ही कालसापेक्ष असल्यामुळे त्यात बदल होऊ शकतो. परंतु ज्ञान, विश्वास, मूल्ये व संकेत या चार घटकांनी मिळून बनलेल्या अभौतिक संस्कृतीत सामान्यपणे बदल होत नाही. प्रत्येक समाज आपआपली अभौतिक संस्कृती टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो. समाजाचा सांस्कृतिक वारसा हा नवीन पिढीला हस्तांतरीत केला जातो. त्यामुळे पिढ्यानुपिढ्या संस्कृती टिकून असल्याचे दिसून येते. असे असले तरीही प्रत्येक समाजाच्या संस्कृतीमध्ये परिवर्तनाची प्रक्रिया सातत्याने सुरू असते. सांस्कृतिक बदलांची प्रक्रिया फार मंद गतीने सुरू असते. सांस्कृतिक बदलांचा सामाजिक परिवर्तनावर फार मोठा प्रभाव पडतो. "सांस्कृतिक संघर्ष आणि संस्कृतीचा प्रसार या दोन गोष्टी सामाजिक परिवर्तनासाठी सहाय्यभूत ठरतात" असे डब्ल्यू. ई. मुरेने म्हटले आहे.

## 5) आर्थिक घटक :-

समाजाच्या अर्थव्यवस्थेत बदल झाला की, त्याच्या प्रभावाने सामाजिक जीवनात अनेकविध बदल घडून येतात. कृषिप्रधान अर्थव्यवस्थेची जागा उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेने घेतली. कृषिप्रधान अर्थव्यवस्था असतांना सरंजामशाही स्वरूपाची समाजव्यवस्था होती. उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेमुळे भांडवलशाही समाजव्यवस्था अस्तित्वात आली. आर्थिक घटकामुळे सामाजिक परिवर्तन कसे घडून येते याचे तर्कशुद्ध स्पष्टीकरण मार्क्सने केले आहे. "सामाजिक परिवर्तन म्हणजे उत्पादन संबंधातील बदल होय." असे मार्क्सने म्हटले आहे.मार्क्स

# सामाजिक परिवर्तनाचे सिद्धांत :-

सामाजिक परिवर्तन ही एक सार्वत्रिक प्रक्रिया आहे. समाज आदिम असो की, विकसित किंवा अविकसित असो, प्रत्येक समाजात सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया सुरूच असते. अर्थात परिवर्तनाची गती आणि परिवर्तनाचा आकृतीबंध सर्व समाजामध्ये एकसारखा नसतो. विभिन्न समाजामधील सामाजिक परिवर्तनाचे अध्ययन करून सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप, आकृतिबंध, दिशा आणि सामाजिक परिवर्तनास कारणीभूत ठरणाऱ्या प्रेरणा कोणत्या याचे स्पष्टीकरण करणारे सिद्धांत विचारवंतांनी मांडले आहेत. त्यातील तीन सिद्धांताचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

## 1) चक्राकार सिद्धांत :-

सामाजिक परिवर्तनाचा हा सिद्धांत **'इतिहासाची पुनरावृत्ती होते'** या तत्वावर आधारित आहे. वाईट अवस्थेतून चांगल्या अवस्थेकडे आणि चांगल्या अवस्थेतून वाईट अवस्थेकडे अशा पद्धतीने सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया निरंतरपणे सुरू असते. असे या सिद्धांताचे प्रतिपादन आहे. चक्राकार गतीने सामाजिक परिवर्तन होत असते ही संकल्पना बरीच प्राचीन आहे. कलियुग संपल्यानंतर पुन्हा सत्ययुग अवतरणार असल्याचे हिंदू प्राचीन परंपरेत मानले जाते. प्राचीन ग्रीक आणि रोमनकालीन साहित्यमध्येही या संकल्पनेचे समर्थन केले आहे. आधुनिक काळात या सिद्धांताची सूत्रबद्ध मांडणी सर्वप्रथम **स्पेंगलर**ने केली. प्रसिद्ध इतिहासकार **आर्नोल्ड टॉयनबी** आणि **सोरोकिन** यांनीही या सिद्धांताचे समर्थन केले आहे.

## सिद्धांताचे प्रतिपादन :-

स्पेंगलरने प्राचीन काळातील इजिप्त,ग्रीक,रोम इत्यादी ठिकाणच्या सभ्यतांचा अभ्यास केला. या अभ्यासातून त्याने असा निष्कर्ष काढला की, जगातील सर्व समाजाच्या सभ्यतांना **उदय, विकास** आणि **विनाश** या अवस्थेमधून जावे लागते. **विकासाचे बालपण, तारुण्य** आणि **प्रौढावस्था** असे भाग पाडता येतात. हे चक्र सातत्याने फिरत राहते. त्यांच्या मते, आताची पाश्चिमात्य सभ्यता प्रौढावस्थेनंतरच्या अटळ अधःपतनाच्या अवस्थेपर्यंत येऊन पोहचली आहे. तिचा विनाश होणे अपरिहार्य आहे. पाश्चात्य सभ्यतेची जागा नवविचारांनी भारलेला समाज येईल. जुने समाज, जुन्या संस्कृती व जुनी साम्राज्य लयास जाऊन त्यांची जागा नव्या विचाराच्या समाजाने घेणे हा सृष्टीचा नियम आहे. विश्वाचे चक्र हे याच पद्धतीने अविरत फिरत असते, असे स्पेंगलर म्हणतो.

प्रसिद्ध इतिहासकार आर्नोल्ड टॉयनबी यांनीही या सिद्धांताचे समर्थन केले आहे. जगातील सर्व सभ्यतांना **युवावस्था, प्रौढावस्था** आणि **वृध्दावस्था** अशा तीन अवस्थामधून जावेच लागते, असे त्यांचे मत होते. **"आव्हानांना सामोरे जाणे"** हे युवावस्थेचे वैशिष्ट्य आहे. तर प्रौढावस्था **"अडीअडचणींच्या जंजाळात अडकत असते "** तिसऱ्या अवस्थेला **" क्रमाक्रमाने अधोगतीकडे जाणे क्रमप्राप्त असते.”** पाश्चात्य समाजाची सभ्यता अधोगतीच्या उतारावर घसरू लागत असली तरीही "मूठभर सृजनशील ईश्वर प्रेरित व्यक्ती अजूनही तिला सावरु शकतील" असा विश्वास टॉयनबीने व्यक्त केला आहे.

सोरोकिन यांनी **कल्पना प्रक्रियात्मक, आदर्शात्मक** आणि **इंद्रियागम्य** अशा तीन संज्ञा वापरून समाजातील परिवर्तनाच्या तीन सांस्कृतिक टप्प्याचा निर्देश केला आहे. तिसऱ्या टप्यानंतर पुन्हा पहिला टप्पा येतो असे सोरोकिनचे म्हणणे आहे. सोरोकिनच्या मते, कल्पनाप्रक्रियात्मक समाजात व्यक्तीला आपल्या सभोवतालची परिस्थिती अगम्य व अदभुत वाटते,त्याला अनेक गोष्टींच्या कार्यकारणभावाचे स्पष्टीकरण करता येत नाही. त्यामुळे प्रत्येक गोष्ट त्याला दैवी चमत्कार वाटते. दुसऱ्या टप्यामध्ये व्यक्तीला आजूबाजूच्या वस्तुस्थितीतील काही गोष्टी पंचेद्रियांद्वारे प्रतीत होतात. तर काही गोष्टी अद्यापही अगम्य असल्याने त्यांना तो अतींद्रिय अनुभव मानतो. तिसऱ्या टप्यावर समाज आला की, त्यातील व्यक्ती,वस्तुस्थितीचे आणि मूल्यांचेही आकलन करू शकतात. सोरोकिनच्या मते, पाश्चात्य सभ्यता आज तिसऱ्या टप्यावर असून पुन्हा पहिला टप्पा आल्याशिवाय राहणार नाही.

टीकाकारांच्या मते, या सिद्धांतातील मांडणीला शास्त्रीय संशोधनाचा आधार नाही. ही मांडणी म्हणजे हा सिद्धांत मांडणाच्या विचारवंताच्या कल्पनाशक्तीचा विकास आहे.

## 2) आदर्शवादी सिद्धांत :-

**'इमैन्युअल कॉट'** हा सामाजिक परिवर्तनाच्या आदर्शवादी सिद्धांताचा **मुख्य प्रवर्तक** मानला जातो. सामाजिक परिवर्तनाबाबतचे आदर्शवादी विचार विकसित करण्यामध्ये **हेगेल** योगदानही महत्वपूर्ण मानले जाते. नैतिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक स्वरूपाच्या प्रेरणांमधून घडून येणाऱ्या परिवर्तनाचे स्वरूप स्पष्ट करण्यावर या सिद्धांताचा मुख्य भर आहे.

**सिद्धांताचे प्रतिपादन :-**

कांटच्या मते, इतिहासात घडून आलेली परिवर्तनाची प्रत्येक घटना काही 'क्रांतिकारक परिवर्तन' असे म्हणून घेण्यास पात्र नसते. इतिहासातील ज्या ज्या घटनांना आपण क्रांतिकारक म्हणजे नवीन दिशा वा नवीन वळण देणाऱ्या घटना असे संबोधतो. त्यांचे मूल्यमापन करण्याची पुढील कसोटी कांटने आपल्या सिद्धांतात मांडली. **ज्या बदलांद्वारे समाजाची उच्चतर नैतिक स्तराच्या दिशेने वाटचाल होते तेच बदल 'क्रांतिकारक 'बदल' या संज्ञेस पात्र ठरतात** असे कांटचे म्हणणे आहे.

अशाप्रकारे आदर्शवादी सिद्धांताचा मुख्य भर नैतिक, आध्यात्मिक वा सांस्कृतिक प्रेरणांमधून घडून येणाऱ्या परिवर्तनाचे स्वरूप स्पष्ट करण्यावर आहे. म्हणूनच परिवर्तनाची प्रक्रिया ही केवळ सामाजिक व राजकीय क्षेत्रापुरतीच मर्यादित असते असे आदर्शवाद्यांना वाटत नाही. त्यांच्या मते मानवाच्या मनातील सुप्त क्षमतांचे प्रगटीकरण असे स्वरूप परिवर्तनाला प्राप्त होते. मानवी जीवनाचे ध्येय कोणते? माणसाचे अस्तित्व का टिकून आहे? यासारख्या प्रश्नांची उत्तरे नव्याने शोधण्याच्या पद्धतीत माणसे बदल घडवून आणत असतात. म्हणून परिवर्तन घडवून आणण्यासाठी कारणीभूत ठरणाऱ्या प्रेरणांचा शोध नैतिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात घेतला पाहिजे असे आदर्शवाद्यांना वाटते.

**हेगेलने** मांडलेला **विरोधविकासवादाचा सिद्धांत** देखील सामाजिक दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. विरोधविकासवादाचा सिद्धांत मांडतांना हेगेल म्हणतो, मानवी इतिहासातील कोणतीही अवस्था कायम स्वरूपाची नसते. प्रत्येक अवस्था निर्माण झाली की तिच्यामध्ये अंतर्विरोध हळूहळू निर्माण होऊ लागतो. परस्परविरोधी शक्ती समोर येतात आणि त्यांच्यामधील संघर्षातून अंतर्विरोधांचे निराकरण होते. यानंतर आज आहे त्याच्यापेक्षा वेगळी अशी स्थिती निर्माण होते. आज जे आहे त्याला आपण **'स्थिती'** असे नाव दिले तर तिच्यात निर्माण होणाऱ्या अंतर्विरोधांना **'प्रतिस्थिती'** असे म्हणता येईल. यानंतर प्रतिस्थितीतून जो अंतर्विरोध निर्माण होतो त्यातून निष्पन्न होणाऱ्या वास्तवाला **'संस्थिती'** असे म्हणता येईल. हेगेलने वापरलेले मूळ शब्द **थेसिस, अँटिथेसिस** व **सिंथेसिस** असे आहेत.

स्थिती, प्रतिस्थिती आणि संस्थिती (थेसिस, अँटिथेसिस व सिंथेसिस) हे सामाजिक परिवर्तनाचे अटळ असे **तीन टप्पे** आहेत, असे हेगेलचे म्हणणे आहे. पहिल्या टप्प्यापेक्षा तिसऱ्या टप्प्यावर समाज जेव्हा पोहचतो तेव्हा त्याचा नैतिक स्तर उंचावलेला असतो. याला विरोधविकासवादाचा सिद्धांत असे नाव हेगेलने दिले. या सिद्धांताच्या आधारे भौतिक आणि अभौतिक म्हणजे वैचारिक व आध्यात्मिक अशा दोन्हीही स्तरावर होणाऱ्या बदलांचा एकत्रितपणे विचार करणे हेगेलला शक्य झाले होते. त्याच्या मते, परिवर्तनात सर्वात महत्त्वाची ऊर्जा माणसाची **विवेकशक्ती** हीच असते. टीकाकारांच्या मते हा सिद्धांत खूपच तात्विक आणि संदिग्ध स्वरूपाचा आहे. या सिद्धांतातून क्रांतिकारक परिवर्तनाची संकल्पना पुरेशा स्पष्ट होत नाही.

## 3) क्रांतिकारी परिवर्तनाचा मार्क्सवादी सिद्धांत :-

सामाजिक क्रांतीचे वेगळेपण आणि महत्त्व प्रतिपादित करण्यासाठी मार्क्सने हा सिद्धांत मांडला. **क्रांतीतून सामाजिक परिवर्तन घडून येते,** हे या सिद्धांताचे मुख्य सूत्र आहे. म्हणूनच या सिद्धांताला क्रांतिकारी परिवर्तनाचा मार्क्सवादी सिद्धांत असे संबोधिले जाते. हा सिद्धांत मांडण्यासाठी मार्क्सने हेगेलने मांडलेल्या विरोधविकासवादाच्या तत्त्वाचा किंवा सिद्धांताचा मुख्य आधार घेतला आहे. हा आधार घेताना मार्क्सने हेगेलच्या तत्त्वात थोडासा बदल केला आहे. तो म्हणजे हेगेल आपल्या विरोधविकासवादामध्ये द्वंद्वशक्तीला मध्यवर्ती स्थान देतो. मार्क्स मात्र भौतिक शक्तींना म्हणजेच **आर्थिक घटकांना** आपल्या सिद्धांतात **मध्यवर्ती** स्थान देतो.

### सिद्धांताचे प्रतिपादन :-

मार्क्सच्या मते, **उत्पादनाच्या साधनात बदल** झाला की, समाजात विद्यमान असलेल्या उत्पादन संबंधात अंतर्विरोध निर्माण होतो. यामुळे उत्पादन शक्तींच्या विकासात अडथळा निर्माण होतो, तेव्हा या संघर्षातून सामाजिक क्रांती घडून नव्या समाजव्यवस्थेचा उदय होतो. आजपर्यंतच्या मानवी इतिहासातील समाजाची वाटचाल याच मार्गाने झालेली आहे व सुरू आहे असे सांगून मार्क्सने इतिहासातील सर्व क्रांतिकारी टप्प्यांचे विश्लेषण विरोधविकासवादाच्या आधारे करून दाखविले आहे.प्राचीन काळात गुलामगिरीवर आधारित समाजव्यवस्थेचा विनाश झाला. त्यातून सरंजामशाही समाजव्यवस्थेचा उदय झाला. औद्योगिक क्रांतीने उत्पादनाची नवीन साधने निर्माण झाली. उत्पादनसंबंध बदलले. उत्पादनशक्तीच्या विकासाला सरंजामशाही व्यवस्थेचा अडथळा होऊ लागला. या संघर्षातून पुन्हा नव्या समाजव्यवस्थेचा म्हणजे भांडवलशाही समाजव्यवस्थेचा उदय झाला. भांडवलशाहीची स्थापना होणे ही मार्क्सच्या दृष्टीने मानवी समाजाची पूर्वीपेक्षा अधिक उच्चतर पातळीकडे झालेली वाटचाल होती.सरंजामशाही व्यवस्थेचा अंत होऊन भांडवलदारांची म्हणजे मार्क्सच्या भाषेत बूजर्वा वर्गाची सत्ता प्रस्थापित झाली. यामुळे साहजिकच नव्या सत्ताधारी वर्गाला सोयीची असेल अशा राजकीय आणि वैधानिक संस्था स्थापन केल्या गेल्या.

नवीन उत्पादन पद्धतीं, वितरण पद्धती, नव्या परिवहन सोयी-सुविधा आणि संज्ञापन यंत्रणा निर्माण होणे ही सर्व नवीन राजवटीची गरज होती. नव्या सत्ताधारकांच्या आणि भांडवलदारांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी आणि भांडवलदारी कारखाने सुरू राहण्यासाठी कच्च्या मालाचा ज्या ठिकाणाहून पुरवठा होऊ शकेल अशा प्रदेशांचा शोध सुरू झाला. त्याचबरोबर कारखान्यातून निर्माण होणाऱ्या तयार मालासाठी बाजारपेठांचा शोध घेणे ही सुरू झाले. यातून उत्पादनवाढीचा वेग वाढला. नवीन आणि मोठी अशी औद्योगिक केंद्रे शहरांमध्ये उभी राहिली. ज्यांच्याजवळ श्रमाशिवाय विकण्यासारखे दुसरे काहीही नव्हते अशा व्यक्तींना या केंद्रांमध्ये रोजगार मिळाला.

ही नवीन भांडवलशाही समाजव्यवस्थाही क्रांतीच्या मार्गानेच बदलणार आहे, असा ठाम विश्वास मार्क्स व्यक्त करतो. कारण एका छत्राखाली काम करणारे हजारो श्रमिक परस्परांच्या जवळ आले आहेत. त्यांच्यामध्ये वर्ग जाणिवा निर्माण होऊन त्यांच्याजवळ ऐक्य भावना दृढ होऊ लागली आहे. हेच कामगार क्रांती घडवून आणणार आहेत. मार्क्स या क्रांतीला **'समाजवादी क्रांती'** असे संबोधतो. या समाजवादी क्रांतीचे वेगळेपण सांगताना मार्क्स म्हणतो, ही माणसाचे अखेरचे दास्य संपवून त्याला मुक्त करणारी क्रांती असेल. या क्रांतीतून खाजगी मालमत्तेचे पूर्ण उच्चाटन होईल. ही क्रांती वर्गरचनेचा म्हणजेच वर्गव्यवस्थेचा पूर्ण नायनाट करणारी असेल. ही क्रांती नवीन समाजव्यवस्था निर्माण करणारी असेल. ही क्रांती केवळ एका देशापुरती सीमित नसेल तर संपूर्ण जगातून भांडवलशाहीचे उच्चाटन करणे हेच तिचे ध्येय असेल. यासाठीच मार्क्स जगभरच्या सर्व कमगारांना एकजुटीचे आणि संघर्षाचे आवाहन करतो.

**All the best**